किंमत १ रुपया

REG. No. B. 3434

दिवाळी अंक

# अर्थ

दिवाळी अंक

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीयः अर्थशास्त्र

वर्ष १३ अंक ४६

पुणें, बुधवार ता १२ नोव्हेंबर १९४७




प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर

[ भोर संस्थान ]

### भाटघर धरणाचे विजेचे शक्तीवर चालणारी सुताची गिरणी

- अधिकृत भांडवल १५,००,००० रु.
- विकलेलें भांडवल ८,५०,००० रु.

★ नवीन विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,००० रु.

३ लाख रुपयांचे ६½ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, प्रत्येकीं १०० रुपयांचा व

२ लाख रुपयांचे ऑर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. १० चा.

★ वरील सर्व शेअर्सची विक्री चालू झाली आहे.

ह्या गिरणींत सध्यां सुमारें ४,००० चात्या चालू आहेत. नवीन ३,९८८ चात्या व ९५ पॉवरलूम्स बसविण्यास सरकारी परवानगी मिळाली आहे.

नवीन मशिनरी बसविण्याचें काम सुरू झालें आहे.

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

१ श्रीमंत **बापूसाहेब विंचूरकर**, फर्स्ट क्लास सरदार.
२ श्री. **गणपतराव साठे**, प्रसिद्ध बिस्किटें व कोकोचे कारखानदार, पुणें.
३ श्री. **हरिहर रामकृष्ण करंदीकर**, कापडाचे व्यापारी, पुणें.
४ श्री. **माधव गणेश देसाई**, प्रोप्रायटर, एस्. एन्. राजर्षि आणि कंपनी, मुंबई व असोसिएटेड रिसर्च लॅबोरेटरीज् कारखान्याचे पार्टनर.
५ श्री. **द. बा. फाटक**, व्यवस्थापक, पायोनियर डाइंग हाऊस लि., पुणें.

नवीन विक्रीस काढलेल्या शेअर्सची मागणी लवकर करावी. विशेष माहिती खालील ठिकाणीं मिळेल.

१ मॅनेजिंग एजंट्स, दि भोर मर्कंटाइल एजन्सी, लि., भोर. ❁ २ पायोनिअर डाइंग हाऊस, लि. पुणें.
३ एस्. एन्. राजर्षि आणि कंपनी, शेख मेमन स्ट्रीट, मुंबई नं. २.

श्री श्री श्री

# दि प्रोग्रेसिव्ह अग्रिकल्चरल् इंडस्ट्रीज् लि.

पर्दे भुवन, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

**अधिकृत भांडवल : : ५ लक्ष रु.**

( १०० रुपयांच्या ५,००० ऑर्डिनरी भागांत विभागलेलें )

शास्त्रीय पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर शेतीचा धंदा करण्यासाठी व साखर कारखाना काढण्यासाठी स्थापन झालेली कंपनी.

श्री श्री

केंद्र कचेरीचें उद्घाटन विजयादशमीचे सुमुहूर्तावर प्रि. सोनोपंत दांडेकर ह्यांचे हस्तें झालें.

चेअरमन :

**डॉ. ग. पु. फडके,** एम. बी. बी. एस., डी. पी. एच.,
आरोग्याधिकारी, पंढरपूर म्युनिसिपॅलिटी.

मॅनेजिंग एजंट्स :

**देशमाने, कुलकर्णी आणि कं.**

श्री श्री श्री



# दि भारत इंडस्ट्रीयल बँक लिमिटेड

## हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा: पुणें शहर, लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक): खोपोली-पे-ऑफिस

—चेअरमन—

श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B., वकील.

ठेवी : चालू खातीं पाव टक्का, सेव्हिंग्ज १½ टक्का, सेव्हिंग्ज स्त्री खातेदार २ टक्के.

कायम ठेवी : मुदत महिने ६ ते ५ वर्षें, व्याज २-२-० टक्के ते ४½ टक्केपर्यंत.

★सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.

★शॉर्ट टर्म डिपॉझिट्स् स्वीकारली जातात.

★बँकेच्या मुख्य कचेरींत स्त्री-खातेदारांकरितां स्वतंत्र स्त्री-शाखेची व्यवस्था.

★गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर ४॥ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.

★सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★जास्त माहितीसाठी मुख्य कचेरी अगर शाखा यांच्याकडे चौकशी करावी.

**एन्. एन्. क्षीरसागर** ★ **आर. बी. साळवेकर**
B. A., LL. B.

—मॅनेजिंग डायरेक्टर्स—

# स्वतंत्र भारताची पहिली दिवाळी.....

म्हणून यंदाच्या दिवाळीला जास्त महत्त्व आहे. लहान मुलांना तर दिवाळीचा सण अधिक आनंदाचा ..... फटाके उडवावे, किल्ले करावे किंवा 'स्वस्तिक'च्या फुग्यांचीं तोरणें उभारावीं! 'स्वस्तिक'चे दिवसेंदिवस लोकप्रिय होत असलेले साधे किंवा छापील रंगीबेरंगी फुगे त्यांना दिवाळीच्या फराळापेक्षांही गोड वाटतील. दिवाळीच्या फटाक्यावरोबरच 'स्वस्तिक'चे फुगेही खरेदी करण्यास विसरूं नका.

★ ★ ★

दिवाळीपासून बऱ्याच व्यापाऱ्यांचे नवीन वर्ष सुरू होतें. ज्यांनीं 'स्वस्तिक'चे फुगे विकले असतील त्यांना त्याबद्दल पुनश्च आठवण करून देण्याची आवश्यकताच नाहीं. योग्य दर, सढळ कमिशन व इतर सवलतीमुळें 'स्वस्तिक'चे फुगे विक्रीस ठेवणें फायद्याचें आहे हें त्यांना पटलें आहे. नवीन ग्राहकांनींही दिवाळीच्या मुहूर्तावर 'स्वस्तिक'चे फुगे मागवून व्यापार वाढवावा.

★ ★ ★

फुग्याच्या आणि रबरी वस्तूंच्या कारखान्यांना स्वतंत्र हिंदुस्तानच्या औद्योगिक योजनेंत महत्त्वाचें स्थान आहे. त्याच दिशेनें आपली जबाबदारी पार पाडण्यासाठीं स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् हा कारखाना नुकताच लिमिटेड करण्यांत आला असून त्याची प्रगति अधिक वेगानें व जोमानें चालूं आहे. लवकरच सर्व प्रकारच्या रबरी वस्तू 'स्वस्तिक'च्या बोध चिन्हानें मिळूं लागतील.

# स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.

—पुणें २—

**यंदाची दिवाळी आमच्या हितचिंतकांना आनंदाची व भाग्याची जावो**

## युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

(वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची सबसिडिअरी कंपनी)

हेड ऑफिस—सातारा शहर

स्थापना १९३६

शाखा—मुंबई (सेंट्रल ऑफिस) फोर्ट
" — " (गिरगांव " )
" —पुणें-लक्ष्मीरोड
" —बार्शी
" —नासिक, मेन रोड

—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

विशेष माहितीसाठीं शाखाधिकाऱ्यांना अगर हेड ऑफिसकडे लिहा अगर भेटा.

वा. ग. चिरमुले, चेअरमन :: ना. म. जोशी, सेक्रेटरी

## सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनी लिमिटेड, सातारा

हेड ऑफिसः—सातारा शहर

स्थापना सन १९०७

शाखाः—कराड, कराड रेल्वे स्टेशन, मसूर

—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

विशेष माहितीसाठीं शाखाधिकाऱ्यांना अगर हेड ऑफिस येथें लिहा अगर भेटा

वा. ग. चिरमुले, चेअरमन | वृ. के. जोगळेकर, मॅनेजर

# पूना केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड

रजि. ऑफिस $\frac{२४।९५}{३}$ नारायण पेठ, पुणें नं. २

अधिकृत भांडवल ... ... रु. ३,००,००० रु. तीन लाख

विक्रीस काढलेलें भांडवल ... रु. ३,००,००० रु. तीन लाख

खालील शेअर्समध्यें विभागलें आहे.

१००० = ५ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकीं रु. १०० चा

४००० = ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. ५० चा

**वरील सर्व शेअर्स विक्री चालू आहे**

कंपनीचा कारखाना लोणंद (एम. एस. एम.) येथें सुरू होणार असून त्यांत शेतीस लागणारीं रासायनिक मिश्र खतें, बोनमील, सुपर फॉस्फेट, शेंगदाणा, एरंडी पेंड, शुद्ध व उत्कृष्ट तेलाचे पॅकबंद डबे, साबण व इतर केमिकल्स वगैरेंचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणार आहे.

**● कंपनीचीं कांहीं वैशिष्ट्यें ●**

(१) कंपनीचा प्रत्येक शेअर होल्डर हा मालकाप्रमाणें एक गणला जाईल.

(२) कंपनीचे शेतकरी, बागाईतदार व व्यापारी शेअर होल्डर्स यांना शेअरचे प्रमाणांत मालाचा वेळचेवेळीं निःपक्षपातीपणानें व सवलतीचे दरानें एजंटमार्फत होणारा पुरवठा.

(३) ऑर्डिनरी शेअर होल्डर्स यांस पहिलेच वर्षापासून दिलें जाणारें सहा ६ टक्क्यांवर डिव्हिडंड.

(४) एजंट यांना दिलेल्या आकर्षक सवलती.

(५) कंपनी आपले मालाची विक्रीबाबत सोल एजन्सी कोणासही देणार नसून सर्व विक्री एजंटामार्फत डेपो ठेवून करविणार आहे, त्यामुळें नफ्याचें मान कायम वाढतें प्रमाणांत राहील. तरी शेतकरी, बागाईतदार, व्यापारी व सुखवस्तु यांनीं अद्याप आमचे शेअर्स घेतले नसल्यास खरेदून आम्ही देत असलेल्या सवलतीचा जरूर फायदा घ्यावा.

शेअर्सकरितां लागणारे अर्ज, प्रॉस्पेक्टस, माहितीपत्रकें कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिसकडे मागणी केल्यास मिळतील.

मे. लोणकर अँड को., मॅनेजिंग एजंट्स.



—पेटंट—

# ★ बेळगांव इस्तरी ★

G. & S.

(प्लेन आणि टेपर डिझाइन्स)

## फ्यामिली, शिंपी आणि धोबी यांचेकरितां

हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या कोणत्याही इस्तरीपेक्षां सर्व तऱ्हेनें उत्कृष्ट.

त्याचप्रमाणें फॅक्टरींजना लागणाऱ्या फायर ब्रिक्स तयार करून मिळतील.

—: बनविणार :—

## मेसर्स गरगट्टी आणि सन्स मेटल वर्क्स

शहापूर—बेळगांव S. M. C.

# दि हिंदुस्थान स्पन पाइप्स लि., पुणें २.

सिमेंट कांक्रीट पाईप्सचे कारखानदार

शेअर विक्री सुरू आहे

| अधिकृत भांडवल | विक्रीस काढलेलें भांडवल |
|---|---|
| रु. १५,००,००० | रु. ५,००,००० |

प्रत्येकी शेअर रु. १००

अर्जासोबत रु. २५ अर्जमंजुरीनंतर रु. २५

चेअरमन : श्री. ग. वि. साळवेकर, मुंबई.

सिमेंट पाईप्सची निर्मिती कऱ्हाड, जि. सातारा येथील आमचे फॅक्टरींत सुरू असून विक्रीही सुरू आहे.

राष्ट्रहिताचा धंदा म्हणून हिंदुस्थान सरकारनें तिमाही १०० टन लोखंड मंजूर केलें आहे.

शेअर विक्रीकरितां एजन्टस् नेमणें आहेत.

गोरे अभ्यंकर आणि कं. लि.
मॅनेजिंग एजन्टस,
गोखले हॉलसमोर, लक्ष्मीरोड, पुणें २.





# किर्लोस्कर

स्वातंत्र्यांतली पहिली दिवाळी
आमच्या
ग्राहकांस व हितचिंतकांस
सुखाची जावो.

Kirloskar

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड
किर्लोस्करवाडी



आमच्या ग्राहकांस यंदाची दिवाळी सुखाची जावो

# पटवर्धन ज्युवेलर्स लि.

लेडी जमशेटजी रोड, दादर, ६०४९६

श्री. नी. पाटणकर, मॅ. डायरेक्टर



# स्वातंत्र्याच्या नव्या युगाचें

जबाबदारीच्या जाणिवेनें स्वागत करणाऱ्या

आमच्या ग्राहकांना नूतन वर्ष सुखाचें जावो !

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.



केसांत उवा मारण्यासाठीं
कायसाफ

घरांतील सर्व ढेकूण, मुंग्या झुरळें मारण्यासाठीं
ए.बी.सी.पावडर

मागोरा केमिकल कं. लि. पुणें २



—आमच्या—
असंख्य ग्राहकांस, एजंटांस व हितचिंतकांस
दिवाळी व नूतन वर्ष
आनंदाचें, सुखाचें व भरभराटीचें जावो.
प्रोप्रायटर—दि न्यू इंडिया लेदर वर्क्स
मॅन्युफॅक्चरर्स ऑफ हायक्लास लेदर गुड्स
—भोजगल्ली, बेळगांव—

ही पहिली स्वातंत्र्य दिवाळी व नवीन वर्ष आमच्या सर्व भागीदारांस,
हितचिंतकांस व ग्राहकांस आनंदाचें जावो.

# विजय टेक्स्टाईल्स लि.

—पुणें ४—

सर्व प्रकारच्या कापडाचे कारखानदार

—संचालक मंडळ—

श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए. ( चेअरमन )

श्री. एम. आर. जोशी, बी. ए., कागद व्यापारी, पुणें.
श्री. एन. के. बावडेकर, बी. एससी., लँडलॉर्ड, पुणें.
श्री. पी. सी. बेन्द्रे, बी. ए., एलएल. बी., वकील, पुणें.
श्री. एस. एम. पाटकर, लँडलॉर्ड, मुंबई.
श्री. जी. एन. जोशी, बी. एससी., कॉन्ट्रॅक्टर, पुणें.
श्री. के. पी. परांजपे, बी. ई., एल. सी. ई., रि. सिव्हिल इंजिनियर, पुणें.
श्री. डब्ल्यू. डब्ल्यू. वाघ, कापड व्यापारी, मुंबई.
श्री. जी. डी. कवळीकर, (प्रसिद्ध) कारखानदार, पुणें.


—मॅनेजिंग एजंटस्—

महाकवळीकर आणि कंपनी.

शेअर्स व ठेवीकरितां पत्रव्यवहार करावा.

देशी धंद्यास उत्तेजन द्या.

# दांडेकर यंत्र सामुग्री




अर्कस कामाकरितां सरक्युलर सॉ बेंच

# टूलग्राइंडर्स — उसाचे चरक

तांदुळ व डाळ तयार करण्याच्या गिरण्या, तसेंच स्पेशल ओतकामें, इंजिनकरितां पिस्टन व सिलेंडर हेडस वगैरे आमचे येथें तयार होतात.

★ पत्ता:—जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लि., भिवंडी-ठाणे ★

## ह्या अंकांतील कांहीं लेख व त्यांचे लेखक


| | पृष्ठ |
|---|---|
| १ वेतनाची शाश्वति आणि आरोग्याची काळजी (मि. द. गो. कर्वे) | ४२० |
| २ महाराष्ट्राचें आर्थिक जीवन (श्री. शं. वा. किर्लोस्कर) | ४२१ |
| ३ आपल्या आर्थिक परिस्थितींतील गोंधळ (प्रो. स. वा. कोगेकर) | ४२३ |
| ४ स्वदेशीला विसरणार काय ? (श्री. व. वि. लोणकर) | ४२४ |
| ५ म्हैसूरमधील औद्योगीकरणाचें रहस्य (श्री. शं. प्र. ओगले) | ४२५ |
| ६ हिंदी कोको-चॉकोलेटचा धंदा (श्री. ग. रा. साठे) | ४२६ |
| ७ मुंबई सरकारचे समाज सुधारणेचे कायदे (श्री. के. बा. गजेंद्रगडकर) | ४२७ |
| ८ सहकारी चळवळीची प्रगति एवढी मंद कां ? (श्री. प. द. सोले) | ४३१ |
| ९ नागरी सहकारी पतपेढ्यांमध्यें सामान्य माणसाची पत (श्री. एस. व्ही. संगमगिरी) | ४३३ |
| १० पुरवठ्यामध्यें वाढ कधीं होणार ? (श्री. शं. ज. जोशी) | ४३७ |
| ११ हिंदुस्थानांतील अन्नधान्याचा प्रश्न कसा सुटेल ? (श्री. वि. त्र्यं. शेटे) | ४४१ |
| १२ मुंबई प्रांतांतील शेतकरी व कर्जें ("दत्तशर्मा") | ४४५ |
| १३ औद्योगिक नियोजन आणि शास्त्रीय संशोधन (डॉ. मो. वा. चिपळूणकर) | ४४८ |
| १४ राष्ट्रीय पुनर्घटना व संरक्षण (कॅ. शं. गं. चाफेकर) | ४५१ |
| १५ आंतरराष्ट्रीय व्यापारी धोरणाचीं आंदोलनें (श्री. भा. म. काळे) | ४५५ |
| १६ मुंबई प्रांतांतील खाद्य पदार्थांचा पुरवठा (श्री. न. गं. आपटे) | ४५६ |
| १७ कंपनी कायद्यांतील एक शंका स्थान (श्री. स. वा. दातार) | ४६५ |



| वर्ष | अर्थ | अंक |
|---|---|---|
| १३ वें | बुधवार, ता. १२ नोव्हेंबर १९४६ | ४६ वा |


# स्वतंत्र भारताची पहिली दीपावलि

### यशश्चिंतन

स्वतंत्र हिंदुस्थानच्या पहिल्या दिवाळीचा हा अंक आमच्या वाचकांस सादर करण्यास आम्हांस अत्यंत आनंद होत आहे. ह्या सुप्रसंगीं, ज्यांनीं हें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां अपरिमित स्वार्थत्याग केला, अशा आपल्या लक्षावधि देशबांधवांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करणें आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्सवाच्या मागोमाग नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत व होत आहेत. लक्षावधि हिंदी नागरिकांचें जीवित धोक्यांत आलें असून सर्वच परिस्थिति बिकट व अनिश्चित अशी आहे. ह्या कारणानें, आर्थिक व औद्योगिक प्रगतींच्या योजना मागें पडल्या आहेत. स्वातंत्र्याच्या प्राप्तीमुळें जनतेंत निर्माण झालेला उत्साह व आत्मविश्वास निरंतर टिकावयाचा असेल, तर मूळ अपेक्षा कांहीं प्रमाणांत तरी सिद्धीस जाणें अगत्याचें आहे. तथापि, स्वातंत्र्यरक्षण व त्याची जोपासना हा हिंदुस्थानापुढील सर्वांत महत्त्वाचा आणि निकडीचा प्रश्न असल्याकारणानें, सरकारी प्रयत्नांमध्यें त्यास अग्रस्थान मिळणें क्रमप्राप्तच आहे. ज्या नेकीनें स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लोकांनीं स्वार्थत्याग केला, त्यापेक्षा अधिक नेटानें व पद्धतशीरपणें हिंदी राष्ट्राचें लष्करी, औद्योगिक व आर्थिक सामर्थ्य वाढविण्यासाठीं संघटित प्रयत्न केले जातील आणि प्रत्येक जण आपल्या वांट्याची जबाबदारी हौसेनें उचलून कार्यक्षमतेनें ती पार पाडील, अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थान देशांत, समृद्धीस आवश्यक तीं सर्व साधनें उपलब्ध असल्याकारणानें, हिंदी राष्ट्राचा उद्धार सर्वस्वीं आपल्या कर्तृत्वावरच आतां अवलंबून आहे. दिवाळीच्या सणासारखा आनंद वर्षभर उपभोगता येण्याजोगा काळ हिंदवासीयांस लवकरच येवो, असें आम्ही इच्छितों.

"अर्था"च्या ह्या दिवाळी अंकांत वेगवेगळ्या आर्थिक व औद्योगिक विषयांवर तज्ज्ञांचे लेख देण्यांत आले आहेत, त्यांवरून सद्यःस्थितीचें व्यापक चित्र वाचकांच्या नजरेसमोर येईल. उत्पादनवाढीचा प्रश्न आज अत्यंत महत्त्वाचा आणि निकडीचा आहे. त्यामुळें त्याची छाया सर्वच ठिकाणीं पडलेली आहे. "अर्था"स महाराष्ट्रांतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञांचें, व्यावसायिकांचें आणि कारखानदारांचें सहाय नेहमीच होत आलेलें आहे. १९३५ सालीं "अर्था"ची स्थापना झाली. वेळोवेळीं उपस्थित होणाऱ्या आर्थिक प्रश्नांबाबत संगतवार माहिती पुरवून वाचकांस योग्य निर्णय स्वतःच घेतां यावेत अशी पार्श्वभूमि निर्माण करण्याचा "अर्था"चा प्रयत्न तेव्हांपासून चालू आहे. त्या वेळेच्या मानानें आतां महाराष्ट्रीय मनोवृत्ति उद्योगधंद्यांस पुष्कळच अनुकूल झालेली आहे. लोकांमध्यें आर्थिक विषयांची गोडी वाढत आहे आणि व्यापार व कारखानदारी ह्यांकडे महत्त्वाकांक्षी तरुण आकर्षित होऊं लागले आहेत. प्रस्तुत दिवाळी अंक हें ह्या सुधारत चाललेल्या परिस्थितीचें निदर्शक आहे. "अर्था"चे सहाय्यक व हितचिंतक ह्यांच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करून, त्या सर्वांस नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो, असें आम्ही चिंतितों.

# वेतनाची शाश्वति आणि आरोग्याची काळजी

## आशियांतील राष्ट्रांची परिषद

लेखकः—प्रि. द. गो. कर्वे, एम. ए.

अमेरिका, कॅनडा, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड व औद्योगिक बाबतींत पूर्णावस्थेस पोहोचलेली इतर पाश्चात्य राष्ट्रें ह्यांमध्यें सरासरीनें दरमाणशीं उत्पन्न हिंदुस्थानापेक्षां पुष्कळ अधिक आहे. इंग्लंडमध्यें सरासरी उत्पन्न हिंदुस्थानपेक्षां दसपट, कॅनडांत पंधरापट, आणि अमेरिका व न्यू झीलंडमध्यें वीसपट आहे. हिंदुस्थानचें सर्व वार्षिक उत्पन्न सर्व नागरिकांस सारखें वांटून दिलें तर जेमतेम त्यांच्या अन्नखर्चाची तेवढी बेगमी होईल. ह्या उलट, वरील इतर देशांत उत्पन्नाची समान वांटणी केल्यास, सर्व नागरिकांस अन्न, वस्त्र, घर, शिक्षण, करमणूक, प्रवास इत्यादिकांचा चांगला उपभोग घेतां येईल. सामाजिक समता आणि स्वास्थ्य ह्यांची वाढ करण्याकरितां पुढारलेल्या राष्ट्रांत जे संघटित प्रयत्न होत आहेत, त्यांचा ओघ सहाजिकपणें श्रीमंतांकडून अनेक मार्गांनीं पैसा घेऊन तो गरीबांस मदत म्हणून खर्च करण्याकडे वळतो, तो त्यांच्या सुबत्तेमुळें होय.

### जागतिक मजूर परिषदेचें कार्य

तसेंच, त्या राष्ट्रांत लोकसंख्या व जमीन, खनिज पदार्थ, भांडवल आणि यांत्रिक ज्ञान ह्यांचें परस्पर प्रमाण अधिक समाधानकारक आहे, असें दिसून येईल. विशेषतः एकंदर रोजगारांच्या मानानें लोकसंख्या कमी आहे. अशा परिस्थितींतही व्यापाराच्या चढउतारांमुळें कधी कधी विशिष्ट धंद्यांत बेकारी माजते. परंतु नेहमींची कमाई किमान राहणीच्या खर्चापेक्षां अधिक असल्यानें आणि एकंदर राष्ट्रीय उत्पन्न पुष्कळ असल्यानें रोजगार गेला तरी कमाई बंद होऊं नये अशी व्यवस्था करतां येते. चालू रोजगारांच्या कमाईतून कांहीं भाग विम्याच्या हप्त्यासारखा बाजूला काढून, मालक वर्गाकडून नियमित वर्गणी घेऊन आणि त्यांत सरकारी मदतीची भर घालून, रोजगार नसणाऱ्यांनाहीं किमान वेतन चालू ठेवतां येते. शेतकी, कारखाने, खाणी, वहातुक, व्यापार, इत्यादिकांची संघटना प्रगमनशील आणि कार्यक्षम असल्यानें बेकारी मर्यादित आणि हंगामी स्वरूपाची असते. औद्योगिक पुनर्घटनेनें तिचें निवारण होईपर्यंतच बेकारांस रहाणी–भत्ता द्यावा लागतो व राष्ट्राच्या संपन्न स्थितीमुळें तो देणें परवडतें.

पहिल्या महायुद्धानंतर जी एक जागतिक मजूर परिषद निर्माण झाली तिचे प्रयत्न सर्व राष्ट्रांत शक्य तों सारख्या प्रकारचे संरक्षक कायदे असावे ह्या धोरणानें चालू आहेत. दुसऱ्या महायुद्धाचे सुरुवातीनंतर जीनीव्हा येथील राष्ट्रसंघ बरखास्त केला गेला. परंतु जागतिक मजूर परिषदेचें कार्य तेथून अमेरिकेंत हलविलें गेलें. महायुद्धानंतर ह्या कार्यांत पुन्हां जोम उत्पन्न झाला आणि सर्व देशांत गरीब व कामकरी वर्गास न्याय्य हक्क व संरक्षण प्राप्त व्हावें ह्या धोरणानें परिषदेचे प्रयत्न सुरू झाले. हिंदुस्थान प्रथमपासूनच ह्या परिषदेच्या कार्यांत प्रामुख्यानें भाग घेत आहे आणि गेल्या पाव शतकांत आपल्या देशांत कामकरी–संघटना, कामगार–विषयक कायदे आणि मजुरांच्या हितांचें संरक्षण ह्या बाबतींत जी प्रगति झालेली आहे, तिचें पुष्कळसें श्रेय जागतिक परिषदेच्या प्रेरणेस दिलें पाहिजे. अमेरिकेंत फिलाडेल्फिया व युरोपांत पॅरिस येथें भरलेल्या जागतिक परिषदांत, मजुरांस वेतनाची शाश्वति असावी आणि त्यांना कांहीं रोग झाल्यास त्यांची काळजी घेतली जावी असें धोरण सर्व राष्ट्रांनीं पाळणें योग्य आहे अशी शिफारस करण्यांत आली.

जागतिक परिषदेंत पुढारलेल्या राष्ट्रांचें वजन अधिक आणि त्या देशांतील आर्थिक परिस्थिति वर वर्णन केल्याप्रमाणें संपन्नतेची, ह्यामुळें पॅरिस परिषदेच्या शिफारसी मुख्यत्वेंकरून त्यांना अनुलक्षून होत्या. रोजगार नसला तर रहाणी भत्ता मिळावा आणि आजारीपणांतहि वैद्यकीय मदत व भत्ता मिळावा ह्या धोरणानें त्यांपैकीं बहुतेक राष्ट्रांत आधींच विम्याच्या स्वरूपाच्या योजना आहेत. त्याच सुधारून व वाढवून, आणि कामकरी, मालक व सरकार ह्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून परिषदेची शिफारस अंमलांत आणणें त्यांस सुलभ होतें; व त्याप्रमाणें बहुतेक राष्ट्रांनीं आपापल्या कायद्यांत सुधारणा केल्याहि आहेत. परंतु हिंदुस्थान आणि आशियांतील इतर देश ह्यांना शिफारसींचें तत्त्व मान्य असलें तरी मजुरांनीं विम्याचा हप्ता द्यावा व त्यांस बेकारी आणि आजार ह्यांबद्दल भत्ता मिळावा अशा तपशिलाची योजना त्यांस अंमलांत आणणें शक्य नव्हतें.

### आशियांतील विशिष्ट परिस्थितीवर उपाययोजना

आशियांतील सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींची निराळी बैठक बोलावून ह्या व इतर महत्त्वाच्या बाबतींत त्यांच्या विशिष्ट परिस्थितीला अनुरूप अशा कोणत्या शिफारसी करणें योग्य आहे तें ठरवावें असा जागतिक परिषदेनें निश्चय केला. दोन्ही राष्ट्रांच्या गटांत जो आर्थिक फरक आहे, तो ध्यानांत घेतां हा निश्चय योग्यच आहे हें दिसून येईल. पुढें होणाऱ्या मोठ्या परिषदेची तयारी करण्याकरितां आणि परिषदेपुढें कोणते ठराव मांडणें योग्य आहे ह्याबद्दल चर्चा करण्याकरितां दिल्ली येथें एक छोटेखानी परिषद नुकतीच भरली होती. ह्या परिषदेनें विचार–अशा ज्या तीन मुद्यांचा विचार केला त्यांवरून आशिआंतील परिस्थिति कशी भिन्न आहे व वेतन आणि आरोग्य ह्या दोन्हीं बाबतींत येथील सरकारांचें कसें विधायक धोरण असावयास पाहिजे तें दिसून येईल.

येथील मुख्य रोजगार शेतकीचा. खंडकरी, कूळ, स्वतः जमीन कसणारा मालक अगर शेतकी कामांत धंदा पहाणारा मजूर, ह्या सर्वांची कमाई प्रायः इतकी कमी आहे कीं त्यांकडून विम्याचा हप्ताही घेतां येणार नाहीं व त्या सर्वांस बेकारी भत्ता द्यावा तर त्यास आपल्या सर्व राष्ट्राचें उत्पन्नहि पुरणार नाहीं. ह्या वर्गास वेतनाची अधिकांत अधिक शाश्वति प्राप्त करून देण्याचा अधिक निकडीचा उपाय म्हणजे शेतांच्या क्षेत्रांत वाढ, पाण्याचा पुरवठा, खतें व बीं ह्यांची वांटणी, विक्री व भांडवल ह्यांच्या योजना आणि शेतमालाच्या किंमतींत स्थिरता आणण्याचें धोरण ह्या मार्गानेंच योजिला पाहिजे. आरोग्याचे बाबतींतही दवाखाने व रुग्णालयें ह्यांची सोय खेडेगांवी व शहरांत सध्याहून फार मोठ्या प्रमाणांत केली पाहिजे. मोठमोठ्या कारखान्यांत काम करणाऱ्या मजूरवर्गाकरितां वेतन आणि आरोग्य ह्या बाबतींत कांहीं योजना जागतिक परिषदेच्या शिफारसीनुसार आंखतां येईल. परंतु येथील बहुजनसमाजाकरितां सर्वांगीण शेती सुधारणा व आरोग्यवर्धक सोयींची प्रत्यक्ष वाढ ह्याच गोष्टी आधीं करावयास हव्या आणि ह्या बाबींवर होणारा वाढता खर्च सर्वमान्य करपद्धतीच्या तत्त्वांनुसार उभारलेल्या पैशांतून भागविला पाहिजे. सामाजिक समता व स्वास्थ्य हीं तत्त्वें जरी जागतिक असलीं तरी त्यांची अंमलबजावणी देशकालानुरूप प्रादेशिक मार्गानींच करावी लागते हें वरील विवेचनावरून दिसून येईल.

# महाराष्ट्राचें आर्थिक जीवन

## औद्योगिक मुलुखगिरीचा धंडा शिकण्याची आवश्यकता

लेखकः—श्री. शं. वा. किर्लोस्कर, जनरल मॅनेजर, किर्लोस्कर बंधू लि., किर्लोस्करवाडी; अध्यक्ष, मराठा चेंबर् ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें.

जगांतील कोणत्याहि राष्ट्राकडे आज नजर फेकली तर आर्थिक स्थैर्य व विकासासाठीं प्रत्येक राष्ट्राची अविश्रांत धडपड चालू आहे हेंच दिसून येईल. दुसऱ्या महायुद्धामुळें प्रत्येक राष्ट्राच्या आर्थिक जीवनांत प्रचंड घडामोडी झाल्या. आज युद्ध संपून दोन वर्षांचेवर अवधि लोटला तरी देखील अद्यापी कोठेही स्थिरस्थावर झालेलें दिसत नाहीं. इंग्लंडसारख्या राष्ट्राची तर आज मोठीच दैन्यावस्था झाली आहे. त्या राष्ट्राची सर्व अर्थव्यवस्थाच कोलमडून पडते कीं काय असें वाटूं लागलें आहे.

आपल्या राष्ट्रामध्येंहि युद्धकालापेक्षां युद्धोत्तर कालांतच परिस्थिति बिकट होऊं लागल्याचें अनुभवास येत आहे. युद्धकालांत चलनाची खूपच वाढ झाली होती. देशांतील राजकीय घडामोडी, जातीय दंगे, संप, टाळेबंदी यामुळें आर्थिक परिस्थिति अधिकच बिघडली. तिचा अनिष्ट परिणाम साऱ्या जनतेला भोगण्याची पाळी आली आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचा विचार करतांना या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करणें प्राप्तच आहे.

### निष्क्रिय वृत्तीचा परिणाम

प्रत्येक प्रांतांतील लोकांचे कांहीं स्वभावविशेष सांगितले जातात. बंगाली मनुष्य अधिक भावनाप्रधान, पंजाबी शूर, त्याप्रमाणें महाराष्ट्रीय बुद्धिप्रधान मानला जातो. या स्वभावाचा परिणाम प्रत्यक्ष रीत्या समाजाची व पर्यायानें महाराष्ट्राची आर्थिक घडी बसविण्याकडे निश्चित झाला आहे. महाराष्ट्रामध्यें, शिक्षण घेऊन नोकरी करणारेच बहुसंख्य आहेत. मावळे, मराठा, कुणबाऊ लोक शेतकी करतात. फारच थोडे, अगदीं हाताच्या बोटावर मोजण्याइतके महाराष्ट्रीय स्वतंत्रीत्या कारखाना अगर व्यापारउदीम व्यवसायांत आहेत. त्यामुळें आपल्या आर्थिक जीवनांत वाढ योग्य रीतीनें होऊं शकली नाहीं. युद्धकालांत कठीण व युद्धोत्तर कालांत तें अत्यंत कष्टप्रद झालें आहे. महाराष्ट्रीयांची वृत्ती नोकरपेशाची होण्याला नोकरशाही पुष्कळ अंशानें कारणीभूत झाली आहे. या वृत्तीमुळें शिक्षण घेतल्यानें व्यक्तीवर होणाऱ्या संस्काराचा उपयोग व्यक्तिविकासाकडे कधींच झाला नाहीं. साहेबाची नोकरी करून, समाजांत प्रतिष्ठा राखून संसारशकट हांकणें यांतच बहुसंख्य सुशिक्षित महाराष्ट्रीयांची बुद्धिमत्ता व चातुर्य खर्ची पडूं लागलीं व यांतच त्यांना आयुष्याची इतिकर्तव्यता वाटूं लागली. बुद्धिवादी व बुद्धिजीवी या शब्दप्रयोगानें आत्मवंचना तर झालीच; पण एक प्रकारचा निष्क्रिय वाद महाराष्ट्रीयांमध्यें बोकाळला. अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणें ज्या समाजामध्यें अगर राष्ट्रामध्यें कामांतून संपत्ती निर्माण करणारा वर्ग अधिक, त्या प्रमाणांत तो समाज अगर तें राष्ट्र संपत्तीमान् असतें. याच न्यायानें पहातां महाराष्ट्रीय व्यक्तींच्या या निष्क्रिय वृत्तीमुळें बहुसंख्य महाराष्ट्रीयांचें सांपत्तिक जीवन अधिकाधिक दुःसह होत चाललें आहे.

आज आपला मुंबई प्रांत व हिंदुस्थान राष्ट्र यांचें आर्थिक जीवन कसें सुधारता येईल ;यासंबंधीं विचार व योजना चालू आहेत. याच वेळीं महाराष्ट्राच्या भवितव्याविषयीं आपल्यापुढें आपोआप प्रश्न उभा रहातो. कारण, महाराष्ट्राचें आर्थिक जीवन सुसह्य व समृद्ध व्हावयाचें झाल्यास त्याबद्दल योजनाबद्ध आंखणी व त्या योजनेची त्वरित अंमलबजावणी यांची अत्यंत जरूरी आहे.

महाराष्ट्राची लोकसंख्या व महाराष्ट्रांतील पिकाऊ (बागाईत व जिराईत) जमीन यांचें प्रमाण विषम आहे. लोकसंख्येच्या मानानें जमिनीचें मान तोकडें पडतें. निव्वळ शेती चांगल्या प्रकारें करून आपलें आर्थिक जीवन सुधारूं शकेल, अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. आज आपल्याकडे शेतीचे लहान लहान तुकडे आहेत. शिवाय, शेतीसुद्धा अगदीं निकृष्ट पद्धतीनें केली जाते. त्यामुळें परिस्थिती अधिकच बिकट होते. आधुनिक यांत्रिक पद्धतीनें शेती करावयाची झाल्यास तितकी यंत्रसामुग्री आज आपल्याकडे तयार होत नाहीं, परदेशांतून आणून ती वापरणें शेतकऱ्यांस फायदेशीर होत नाहीं आणि जमीनीचे तुकडे झाल्यानें यंत्रसामुग्रीचा उपयोगही चांगल्या प्रकारें करतां येत नाहीं. तेव्हां अल्पशा शेती जमीनींतून आधुनिक कृषिशास्त्राचा उपयोग करून जास्तींत जास्त पीक काढलें पाहिजे.

### औद्योगिक मुलुखगिरी

अमेरिकेंत अर्धा एकर जमीनींत हजारो पौंड टोम्याटो एक वर्षांत काढतात व त्या उत्पन्नावर चार माणसांचें कुटुंब अमेरिकन रहाणीनें राहूं शकतें. तेव्हां महाराष्ट्रामध्यें शेती तर चांगल्या प्रकारें झालीच पाहिजे. पण निव्वळ शेतीच्या सहायानें आमचा आर्थिक दर्जा सुधारेल असें म्हणतां येत नाहीं. कारण, निव्वळ शेती वाढवून आजपर्यंत जगामध्यें कोणतेंही राष्ट्र पहिल्या प्रतीचें होऊं शकलें नाहीं.

आपला महाराष्ट्र सुसंपन्न व्हावयाचा असेल व त्याला आर्थिक दृष्ट्या आघाडीवर रहावयाचें असेल तर आपल्या प्रांताचें औद्योगीकरण झालें पाहिजे. एवढ्याचसाठीं पूर्वीचे काळांत मुलुखगिरी केल्याशिवाय महाराष्ट्राला गत्यंतर नव्हतें. पण आजच्या मुलुखगिरीचें तत्व आणि तंत्र दोन्हींही निराळीं आहेत. पूर्वीप्रमाणें तोफखाना, घोडदळ, पायदळ घेऊन जाऊन खंडणी वसूल करतां येणार नाहीं. आतां त्यासाठीं नवें तंत्र पत्करलें पाहिजे.

आपल्या महाराष्ट्रांत आपण अधिक माल तयार करून तो इतर प्रांतांत व देशांत खपवून तिकडील संपत्तीचा ओघ आपल्या प्रांताकडे वळविला पाहिजे. प्रत्येक महाराष्ट्रीयानें काटकसरीनें वागून, चैनीच्या व फालतु वस्तूंसाठीं आपल्या देशांतून इतर देशांत चाललेला संपत्तीचा ओघ एवढ्यासाठीं कटाक्षानें बंद केला पाहिजे.

या मार्गाचा यशस्वी अवलंब आज कित्येक पुढारलेलीं राष्ट्रें करीत आहेत. इंग्लंड, हॉलंड, जर्मनी, हीं राष्ट्रें त्यांच्या देशांत वैपुल्यानें असलेल्या कच्च्या साधनसामुग्रीपासून पक्का माल तयार करतात. अशा तऱ्हेचा पक्का माल इतरत्र बाजारपेठांतून पाठवून त्यांच्या बदला आपल्या राष्ट्रास जरूर असणारा इतर माल ते खरीदतात. पक्क्या मालाची निर्यात वाढवूनच आपले देशांतील आर्थिक जीवन अधिक सुखावह करण्याकडे त्यांचा प्रयत्न असतो. निर्यात न वाढवितां देशांतील निव्वळ रोकड नाणें देऊन परदेशांतून दैनंदिन गरजेच्या वस्तू आणाव्या लागल्या तर केवढा अनवस्था प्रसंग ओढवतो हें आज आपल्या देशाच्या परिस्थितीवरून सहज ध्यानांत येईल. फक्त अन्नधान्यासाठीं वर्षाला कोट्यावधी रुपये परदेशाला धाडावयाचे, ही देशाच्या अर्थव्यवस्थेंतील मोठी समाधानाची बाब आहे असें कोण म्हणेल ?

तेव्हां महाराष्ट्रांत तयार झालेला माल इतर बाजार पेठांतून दिसावयाचा म्हणजे महाराष्ट्रांत मालाची निपज खूपच मोठ्या प्रमाणांत झाली पाहिजे व हें होण्यासाठी पुष्कळच नवीन कारखाने सुरू होणें क्रमप्राप्तच आहे.

आतांपर्यंत आपण कोणते उद्योगधंदे सुरू करावेत हें आमच्या इच्छेवर अवलंबून नव्हतें. परकीय सरकारनें या व अशा अनेक राष्ट्रहिताच्या बाबतींत कोलदांडा घातला होता. पण मागच्या या खेदजनक आठवणी काढून आजच्या स्वातंत्र्यकालांत आपोआप कारखाने निघणार नाहींत अगर जे आहेत, त्यांची वाढ होणार नाहीं. आपणांस १५ ऑगस्टला स्वातंत्र्य प्राप्त झालें; आपल्या राष्ट्राचे हक्क व दर्जा वाढला. पण त्याबरोबर स्वतःवरील जबाबदारीही खूपच वाढली आहे, ही गोष्ट प्रथमतः लक्षांत आणली पाहिजे. आतां आपणांस सरकार उत्तेजन देत नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. कारण, महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाला जनता तर उत्सुक आहेच व सरकारहि त्याला उत्तेजन देईल.

### निसर्गाची देणगी

औद्योगिक वाढीच्या दृष्टीनें महाराष्ट्राकडे पाहिलें असतां क्षणभर शंका येईल कीं या कडेपठाराच्या व दऱ्याखोऱ्याच्या महाराष्ट्रांत उद्योगधंद्यांचीं बीजें कशी रुजतील ? आपल्याकडे लोखंडाच्या खाणी आहेत, कां शक्ती उत्पादनासाठी कोळसा भरपूर आहे ? कां तेलाच्या खाणी मुबलक आहेत ? आजच्या युगांतील मूलभूत वस्तूच आपल्याकडे नाहींत तर कारखाने काढणार कसे ?

पण निसर्ग इतका पक्षपाती नाहीं. प्रत्येक प्राण्याला स्वसंरक्षणाचीं साधनें जशी निसर्गानें दिलीं आहेत त्याप्रमाणें प्रत्येक प्रांताला देखील त्याची एखादी देणगी आहेच. मात्र त्या देणगीचा योग्य रीतीनें उपयोग करणें हें शेवटीं मानवाच्याच हातीं आहे. इजिप्तला नाईलची, पंजाबला पांच नद्यांची, त्याप्रमाणें महाराष्ट्राला सह्याद्रीच्या रांगेची व कृष्णा, कोयना सारख्या नद्यांची देणगी मिळाली आहे. आतां या साधनांचा उपयोग कशा प्रकारें करून घ्यावयाचा हें आम्हीच ठरविलें पाहिजे.

आपल्या महाराष्ट्रांत कारखान्यांची वाढ होण्यास ज्या अडचणी आहेत त्यांत हे कारखाने चालविण्यास लागणारी शक्ती ही प्रमुख अडचण आहे. ऑईल इंजिन्स अगर कोळसा यांच्यापासून शक्ती निर्माण करावयाची तर आपणाला मुलभूत गोष्टीसाठींच दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागतें व अर्थदृष्ट्या ती शक्ती काटकसरीचीही होत नाहीं. तेव्हां निसर्गदत्त असा सह्याद्री सारखा पहाड पाठीशीं उभा असतांना जलशक्तीचा उपयोग करून घेणें हेंच युक्त ठरेल.

यांत्रिक युगाचें महत्व ओळखून महाराष्ट्रानें पूर्वींच त्या दिशेनें पाऊल टाकण्यास सुरवात केली आहे. आपल्या महाराष्ट्रांत आज कापड, होजिअरी, रेशमी सूत व कापड यांच्या गिरण्या, कांतडीमाल, साखर, शेतीची आऊतें व यंत्रें, शास्त्रीय व शस्त्रक्रियेचीं उपकरणें, कांच व कंदील, कागद व पुठ्ठा, औषधें यांचे कारखाने चालू आहेत. परंतु एवढ्यावरच महाराष्ट्राला विसंबून चालणार नाहीं. ही सुरवात आहे. परंतु वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें मूलतः मुख्य शक्ती उत्पादनाची अडचण दूर केली पाहिजे.

### कोयना धरणाची योजना

या दृष्टीनें पाहतां हेळवाक जवळ कोयनेला धरण घालून एक प्रचंड विद्युत् शक्ती केंद्र सुरू करण्याची मुंबई सरकारची जी योजना आहे, तिचें प्रत्येक महाराष्ट्रीय मोठ्या उत्कटतेनें स्वागत करीलच. पाण्यापासून वीज निर्माण करणें हें अनेक दृष्टीनें कसें फायद्याचें आहे हें टाटा व म्हैसूर संस्थान यांच्या उदाहरणावरून स्पष्टच झालें आहे.

कोयनेच्या धरणाची उंची ३०० फूट व लांबी ३,५०० फूट आहे. या प्रचंड धरणांत १३२ अब्ज घनफूट पाणी राहूं शकेल व तळ्याचा विस्तार धरणाच्या मागें ४० मैलांपर्यंत जाईल. या जलशक्ती केंद्रात २,००,००० किलोवॅट्स शक्ती निर्माण होईल. ही वीज एका बाजूस पुणें, दुसऱ्या बाजूस सोलापूर, विजापूर व खालीं कोकणांत एवढ्या विस्तृत प्रदेशांतून पुरवितां येईल. या शक्तीच्या जोरावर हल्लीं या प्रदेशांतून चालू असलेले सर्व कारखाने व नवीन चालू होणारे हवे तेवढे मोठे कारखाने चालवितां येतील.

ही योजना पूर्ण झाल्यानंतर खेड्यापाड्यांतून उत्पादक शक्तीची वीज खेळवितां येईल. शेतकऱ्यांच्या झोपडीपाशीं वीज पोचल्यानंतर शेतकऱ्यांस योग्य ती माहिती व जरूर ती साधनसामुग्री देणें एवढेंच काम उरतें. अशा प्रकारें त्याला संधी मिळाल्यानंतर तो नवीन माल तयार करील. शेतकी कामांत आधुनिकपणा आणून आपली सांपत्तिक स्थिति तो बदलूं शकेल. ग्रामोद्योग व घरगुती उद्योगधंदे यांना चांगला वाव मिळेल. खेडेनखेडें आणि गांवनगांव सुसंपन्न व्हावा असें जें पुढाऱ्यांचें आजचें स्वप्न आहे, तें सत्यसृष्टींत येईल. या प्रकारें महाराष्ट्राचा कायाकल्प होण्यास मुळीच उशीर लागणार नाहीं.

या योजनेसाठी खूपच पैसा लागणार हें उघड आहे, पण म्हणून योजना मागें पडूं नये.

राष्ट्रावर परचक्र आलें असतां खर्च अधिक येतो किंवा इतर कांहीं अडचणी आहेत म्हणून आपण गप्प कां बसतो ? परचक्रापेक्षांही बिकट अशी परिस्थिति आज आपणांवर आली आहे. अशा वेळी कोयनेचें शक्ती केंद्र व या सारख्या इतर योजना तांतडीनें हातांत घेऊन अंमलांत आणणेस सुरवातच झाली पाहिजे. आतांच नाहीतर पुनः कधींही नाहीं असा क्षण येऊन ठेपला आहे. कोयनेच्या शक्ती केंद्रांतून जितक्या लौकर शक्ती निर्माण होण्यास सुरवात होईल तितक्या प्रमाणांत आपली उन्नति होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक वाढींतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. हें शक्ती केंद्र हें त्यांचें एक मुख्य अंग आहे. या धरणामुळें शेतीस पाणीपुरवठा होईल, नवीन कारखाने निघण्यास मदत होईल, कारखान्यांतून इतर वस्तूंबरोबरच शेतीला उपयोगीं अशीं अवजारें, खतें यांची निपज करून त्याचा खात्रीनें शेती सुधारणेंकडे उपयोग होईल.

### सहकार्य व कसोशीचे प्रयत्न ह्यांची आवश्यकता

परस्परावलंबित अशा या गोष्टी आहेत. कॉंग्रेसच्या चळवळीचें १५ ऑगस्टपर्यंत स्वातंत्र्य हें साध्य होतें पण त्यानंतर तें एक साधनच रहाणार. त्याचप्रमाणें, महाराष्ट्रांतील खेड्यापाड्यांतून उद्योगधंद्यांचें जाळें पसरविण्यास व शेतीला पाणी देण्यास हें शक्ती केंद्र एक मुख्य साधन म्हणूनच रहाणार. त्यानंतर उद्योगधंदे वाढविणे, आधुनिक पद्धतीनें शेती करून त्यांतून मालाची निपज वाढविणें, हींच महत्त्वाचीं कामें ठरतात. महाराष्ट्राचें नंदनवन बनविणें शेवटीं जनतेच्या हातीं राहील. कोयनेचें धरण परिपूर्ण झाल्यावर महाराष्ट्र अनेक बाबतींत स्वयंपूर्ण तर होईलच आणि आर्थिक चढाओढींत तो आघाडीवरच राहील. अशा प्रकारें यशस्वी होण्यास जनता, कामगार, कारखानदार, शेतकरी व मालक आणि सरकार यांनीं यापुढें अत्यंत सहकार्यानें वागून अशा प्रकारें योजना तडीस नेण्यास कसोशीनें प्रयत्न केल्यास, सध्याच्या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगांतून विजयी मुद्रेनें आपणांस बाहेर पडतां येईल अशी खात्री वाटते.

# आपल्या आर्थिक परिस्थितींतील गोंधळ

## निश्चित योजनांच्या अभावाचे दुष्परिणाम

लेसक:—प्रो. स. वा. कोगेकर, बी. ए. ( मुं. ); बी. एससी. [ अर्थ ] (लं.)

युद्ध समाप्त होऊन दोन वर्षानंतरहि आज आपली आर्थिक स्थिति अत्यंत बिकट झालेली आहे. ‘होणार, होणार’ म्हणून गाजलेल्या युद्धोत्तर पुनर्घटनेचा मागमूसहि दृष्टीस पडत नाहीं. उलट, युद्धकालापेक्षाहि अधिक हलाखींत आपणांस दिवस काढावे लागत आहेत. किंमतींचें मान सारखें चढतें राहिल्यामुळें उत्पन्न आणि खर्च यांची तोंडमिळवणी करणें कठीण होऊन बसलें आहे. उत्पादनांत वाढ होण्याऐवजीं तें घटतच चालल्यामुळें किंमती कमी होण्याची शक्यता नाहीं. बरें, परदेशाहून मोठ्या प्रमाणावर आयात होईल म्हणावें तर त्या बाबतींतहि निराशाच पदरीं येते. एक तर परदेशांतील उत्पादन देखील अजून फारसें वाढलेलें नाहीं; आणि दुसरें असें कीं आपल्या देशांतील उत्पादन-वाढीस आवश्यक अशी यंत्रसामुग्री परदेशांतून आणणें जरूर असल्यामुळें परदेशी चलनाचा उपयोग काटकसरीनें व काळजीपूर्वक करणें प्राप्त आहे; त्यासाठी इतर वस्तूंच्या आयातीवर आपणांस निर्बंध घातले पाहिजेत. या परिस्थितींत अंतर्गत उत्पादनांत वाढ हाच मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. पण त्यांत फारशी प्रगति होत आहे असें दिसत नाहीं. उलट गेल्या वर्ष दोन वर्षांत त्यांत घटच झाली. धान्याचें उत्पादन पुरेसें झालें नाहीं, त्यामुळें परदेशांतून धान्य आणण्यासाठीं जवळ जवळ १०० कोटी रुपये गेल्या एका वर्षांत खर्ची पडले. औद्योगिक उत्पादनाची तीच तऱ्हा. कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, मजुरीचे वाढते दर आणि फायद्याची वाढती आकांक्षा यामुळें किंमती वर नेण्याकडेच प्रवृत्ति. पण किमती चढल्या कीं रहाणीच्या खर्चांत वाढ होऊन मजुरीचे दर वाढविण्याची मागणी पुढें येते आणि ती मान्य न झाल्यास संप वगैरे अस्त्रांचा उपयोग केला जातो. त्यामुळें उत्पादनाच्या कार्यांत खंड पडून वस्तूंची दुर्मिळता अधिकच वाढते व किमती चढविण्यांत तिचा परिणाम होतो. या दुष्टचक्रांतून मार्ग काढणें फार कठीण होऊन बसलें आहे.

### सरकारी धोरणांतील धरसोडपणा

याचें मुख्य कारण म्हणजे आर्थिक व्यवहारांवर जनहिताचे दृष्टीनें नियंत्रण ठेवण्याचें कार्य करणारी जी संस्था, म्हणजे सरकार, तिच्या धोरणांतील धरसोड हें होय. वास्तविक पहातां युद्धासारख्या महान् आपत्तींत झालेली आर्थिक रचनेची उलथापालथ लक्षांत घेऊन ही घडी पुनः व्यवस्थित करण्याचें काम सरकारनें आपल्या शिरावर घ्यावयास हवें. परंतु देशांतील राजकीय घडामोडी व त्यामुळें निर्माण झालेले प्रश्न यांतच सरकार इतकें गुरफटून गेलें आहे कीं, आर्थिक प्रश्नांसंबंधीं एक सुसूत्र धोरण आंखणें त्यास आतांपर्यंत तरी शक्य झालेलें नाहीं. पण त्यामुळें आर्थिक परिस्थिति दिवसेंदिवस अधिकच बिघडत चालली आहे. जीं नियंत्रणें युद्धकालचा वारसा म्हणून चालू आहेत त्यांच्या यशस्वितेबद्दल सर्वत्र साशंकतेचें वातावरण पसरल्यानें त्यांचा दृढ अंमलही होत नाहीं, व तीं काढूनही टाकलीं जात नाहींत. त्यामुळें काळा बाजार आणि नफेबाजी यांना सर्वत्र मोकळीक मिळाली आहे. गतवर्षी झालेल्या करवाढीच्या योजना व्यापारी व उद्योगधंद्यांचे चालक यांस जाचक वाटत असल्यामुळें उत्पादनवाढीच्या योजना हातीं घेण्यास त्यांस उत्साह वाटत नाहीं, असेंही बोललें जातें. ही करवाढ आपण आपल्या हितासाठी नाहींशी करूं अशी उमेद या मंडळींनीं बाळगावी म्हटलें तर सरकार या बाबतींतील आपलें धोरण निःसंदिग्ध शब्दांत अजून जाहीर करीत नाहीं. बरें ही करवाढ चालूच रहाणार असें धरलें तर त्यामुळें निर्माण होणाऱ्या निरुत्साहावर सरकारी उपाय योजना काय आहेत याचा अद्याप कोठेंच पत्ता नाहीं. ‘किंमती वाढूं लागल्या, त्या थांबविल्या पाहिजेत’ असें सरकारकडून सांगितलें जातें पण त्याचवेळीं उत्पादनांत वाढ व्हावी म्हणून कांहीं वस्तूंच्या किंमती सरकारच वाढवून देतें! आणि वाढत्या किंमतीस तोंड देण्यासाठी आपल्या नोकरवर्गासही वेळोवेळीं पगारवाढ, भत्ते वगैरे सरकारकडून दिले जातात. यामुळें सर्वत्र पगारवाढीची मागणी पुढें येते. तिला मान्यता देण्यामुळें उत्पादनाचा खर्च अधिकच वाढला म्हणून उत्पादकांकडून किंमती आणखी वाढविल्या जाव्या अशी खटपट सुरू होते आणि जोंपर्यंत सर्व प्रकारच्या किंमती स्थिर करण्याची खंबीर योजना सरकारकडून केली जात नाहीं तोंपर्यंत ही स्थिति अशीच चालणार यांत शंका नाहीं.

### धान्य वाढीच्या योजनांची प्रगति !

सरकारनें आतांपर्यंत अधिक उत्पादनासाठी जी खटपट केली ती यशस्वी झालेली नाहीं. अन्नधान्याच्या बाबतींत निसर्गावर बऱ्याच अंशीं अवलंबून रहावें लागत असल्यामुळें आहे त्या परिस्थितींत जास्तींत जास्त पिकें काढण्याच्या मोहिमेबरोबरच दीर्घकालीन योजना हातीं घेऊन निसर्गावर मात करण्याची आवश्यकता अनेक वेळां प्रतिपादण्यांत आलेली आहे. पण त्या बाबतींत फारशी प्रगति झालेली नाहीं. आहे त्याच उत्पन्नांतून जास्तींत जास्त लोकांच्या किमान गरजा भागविण्यासाठी वांटप-पद्धति तरी सुरळीतपणें चालेल म्हणावें तर तेंही नाहीं. धान्याची वसुली ठरवून दिलेल्या मानाप्रमाणें होत नसल्यामुळें परदेशी आयातीवरच मदार ठेवावी लागते. वसुली योग्य प्रमाणांत व्हावयाची तर ती देणाऱ्या शेतकऱ्यास ( १ ) सरकार सतत ठराविक प्रमाणांत धान्य पुरवील व ( २ ) काळ्या बाजारांत सहज अधिक किंमत मिळावयाची नाहीं या दोन गोष्टींबद्दल खात्री पटली पाहिजे. आज ती पटूं शकत नाहीं त्यामुळें वाटप पद्धतिच अजिबात काढून टाकावी अशी मागणी पुढें येत आहे. म. गांधींनीं देखील या मागणीचा पुरस्कार केलेला आहे. परंतु पुरवठ्यांत जोंपर्यंत सुधारणा होत नाहीं तोंपर्यंत ही मागणी मान्य करणें म्हणजे भरमसाठ किंमती आणि गरीब जनतेचे हाल यांना आपण होऊन आमंत्रण देण्यासारखें आहे. बंगालचें उदाहरण अजून जनतेच्या स्मरणांतून गेलेलें नाहीं.

### औद्योगिक व मजूरविषयक धोरण

औद्योगिक उत्पादनाच्या बाबतींतही सरकारची मदार अजून मुख्यतः उद्योगधंद्यांच्या खासगी संचालकांवरच आहे. या वर्गास युद्धांत भरमसाठ नफे मिळवता आले. ते तसेच शांतताकालांतही चालूं रहावेत ही त्यांची धडपड. पण युद्धांत सतत चाललेली चलनवाढ शांतताकालांत तशीच चालू नसल्यामुळें किंमतींतील वाढ कायम राहून नफ्याचें प्रमाण टिकावयाचें म्हणजे वस्तूंचें उत्पादन तरी मर्यादित करावयाचें, किंवा मजुरींत तरी काट मारावयाचा. शक्य असेल त्याप्रमाणें या दोन्ही मार्गांचा अवलंब केला जातो. त्यांतून अधिक उत्पादनासाठी सरकारकडून टोंचणी आल्यास ‘किंमती वाढवून द्या’ असा सवाल तयारच. यावर तोड म्हणजे सरकारनें फायद्याचें प्रमाण हें देखील वेळोवेळीं होणाऱ्या

मजुरीच्या दरासंबंधीच्या लवाद निर्णयाप्रमाणेंच निश्चित केलें पाहिजे. पण तसें करण्यास सरकारची तयारी दिसत नाहीं. जोंपर्यंत खाजगी फायद्यावर आधारलेली अर्थव्यवस्था प्रचलित आहे तोंपर्यंत सरकारला या मार्गानें जाऊन उत्पादन वाढविता येणार नाहीं. असें ठरल्यास कांहीं उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याची तयारी ठेवली पाहिजे. पण त्या गोष्टीसही आज सरकारची तयारी दिसत नाहीं.

उत्पादनाच्या कार्यांत भांडवलदारांबरोबरच कामगारवर्गाचाही भाग असतो. परंतु केवळ नफे टिकविण्यासाठी मजुरी कमी घेण्यास किंवा काम जास्त करण्यास हा वर्ग तयार असणें शक्य नाहीं. जनतेच्या गरजा भागविण्यासाठी नियंत्रित दरानें माल उत्पन्न करण्याच्या कामीं आपण संपूर्ण सहकार्य करूं असें ट्रेड युनियन काँग्रेसनें जाहीर केलें असून सरकारनें आपलें सहकार्य घ्यावें अशी मागणी केली आहे. परंतु सरकारचें धोरण आतांपर्यंत तरी मजूर संघटनांना विश्वासांत घेण्याचें दिसून आलें नाहीं. उलट संप, सावकाशी वगैरे मार्गांचा नेहमीं निषेध करण्यांत मालक वर्गाच्या बरोबरीनें सरकारनें पुढाकार घेतलेला आहे. अलीकडे पुनः या बाबतींतही सरकारचें धोरण बदलूं लागलेलें दिसतें. नुकतेंच मुंबईचे मजूर मंत्रि श्री. नंदा यांनीं मजुरांचा कैवार घेऊन मालकांवर टीकास्त्र टाकलें. आपल्या आर्थिक साधनसामुग्रीचा जास्तींत जास्त कार्यक्षमतेनें उपयोग करण्याचे कामीं भांडवलदार अडथळे आणतात असा त्यांनीं स्पष्टपणें आरोप केला. पण असें आहे, तर हे अडथळे दूर करण्यासाठी सरकारची कांहीं योजना आहे कीं काय हें मात्र त्यांनीं सांगितलें नाहीं. त्यामुळें सोयीप्रमाणें कधीं मजूर तर कधीं मालक यांना दोष देऊन सरकार आपल्यावरील जबाबदारी टाळीत आहे असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. आपल्या प्रांतिक सरकारपुरतीच ही गोष्ट मर्यादित नसून मध्यवर्ती सरकारलाही ती लागू आहे. नियंत्रणाच्या बाबतींत हीं सरकारें परस्परांचा हवाला देऊन कशीबशी वेळ मारून नेत असतात असा अनुभव आलेला आहे, तो वेगळाच.

### हलाखी वाढणार काय ?

देशाच्या फाळणीमुळें आर्थिक व्यवस्थेवरील ताण अधिकच वाढलेला आहे. अन्नधान्याच्या बाबतींत पाकिस्तान हें स्वतंत्र राष्ट्र झाल्यामुळें हिंदुस्थानांतील तुटीच्या प्रांतांची कुचंबणा जास्त प्रमाणांत होणार आहे. त्यांतच जातीय दंगलीमुळें झालेल्या पिकांच्या नासाडीची भर पडली आहे. तसेंच येथील मध्यवर्ती सरकारचा संरक्षण, सुव्यवस्था व निर्वासितांची सोय या खात्यांवरील खर्चही वाढणार असल्यामुळें आर्थिक व्यवस्थेवरील बोजाही वाढल्याशिवाय रहाणार नाहीं. स्टर्लिंग शिल्लक गोठून पडली असल्यामुळें परदेशी व्यापारासाठी देखील चालू उत्पादनांतूनच कांहीं भाग काढून ठेवावा लागणार आणि या सर्वांची तरतूद घटणाऱ्या उत्पादनांतून करावयाची म्हणजे जनतेचें रहाणीचें मान आज आहे तितक्या अल्प प्रमाणांतही टिकविणें अशक्य होईल.

एकूण, जनतेच्या गरजा, भांडवलदारांच्या अपेक्षा, मजुरांच्या मागण्या आणि सरकारचें धोरण यांची सांगड घालणें आज अशक्यप्राय झालेलें आहे. हीच परिस्थिति आणखी अशीच चालू राहिली तर दिवसेंदिवस हलाखीचें प्रमाण वाढत जाईल, विषमतेंत अधिकच भर पडेल आणि स्वतंत्र हिंदुस्थानवर चँग–के–शेकच्या चीनची कळा आल्याशिवाय रहाणार नाहीं अशी भीति वाटते.

---

# स्वदेशीला विसरणार काय ?

लेखक:—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें.

परकीय सत्तेशीं झुंज देतांना लोकमान्यांनीं स्वदेशीच्या अस्त्राचा पुरस्कार केला. स्वातंत्र्य हें ईप्सित साध्य झाल्यानंतर आतां हें अस्त्र आमचा देश एकाद्या शमीवृक्षाच्या ढोलींत कायमचेंच नेऊन ठेवून देऊन त्याला विसरून जाणार कीं काय, अशी भीति वाटूं लागली आहे.

युद्ध चालू असतांच्या काळांत आयातीच्या टंचाईमुळें सरकारला लागणारा माल व जनतेच्या रोजच्या गरजा भागविण्याकरतां लागणाऱ्या जिनसा शक्य तितक्या इथल्या इथें निर्माण करण्याचा जोराचा प्रयत्न होऊन आमच्या उद्योगधंद्यांना जोराची चालना मिळाली व परिस्थितीमुळें स्वदेशीचें तत्त्व प्रसृत होऊन त्याचा मुद्दाम पुरस्कार करण्याची जरूरी राहिली नाहीं. इकडे नाना तऱ्हेच्या परकी वस्तू वापरणाऱ्या शहरी जनतेची, आयात थांबल्यामुळें, फारच कुंचबणा होत गेलेली आहे. ज्यांना वस्तू स्वदेशी आहे किंवा नाहीं याचा विधिनिषेध कधीच नव्हता ते आतां देशांत आयात होऊं लागलेल्या जिनसांवर बुभुक्षिताप्रमाणें तुटून पडूं लागले आहेत; इतकेंच काय पण सर्व जिनसांच्या मध्यंतरीच्या कमालीच्या टंचाईमुळें स्वदेशीबद्दल आस्था बाळगणारे सुद्धा मिळतें आहे तर घ्या, या प्रवृत्तींत आलेले आहेत.

युद्धापूर्वीच्या काळांत परदेशी वस्तू स्वस्त आणि सुबक, तर देशी वस्तू ओबड धोबड आणि महाग, अशी परिस्थिति असतांना स्वदेशप्रेमानें प्रेरित होऊन जनता देशीला प्राधान्य देऊन परवडली तर देशीच वस्तू घ्यावयाची, नाहीं तर गरजच सोडून द्यावयाची, इतकी तिची मानसिक मजल मारून राहिली होती. पण आतां महाग असल्या तरी परदेशी वस्तू खरीदण्याची प्रवृत्ति एकदम बोकाळूं पहात आहे. याचें प्रत्यंतर अलीकडे पुण्या-मुंबईसारख्या शहरांत नव्यानें उघडल्या जाणाऱ्या शेकडो दुकानांत होणाऱ्या गर्दीवरून दिसून येईल आणि ही प्रवृत्ति अशा रीतीनें परिस्थितीमुळें दृढमूल झाली म्हणजे लोकमान्यांनीं अट्टहास केलेली व जनतेनें मानलेली 'स्वदेशी' कायमची गाडली जाईल.

आमच्या कारखानदारांनीं यांतून बोध घेण्यासारखा आहे. मिळालेल्या संधीचा, म्हणजे आयातीचें प्रमाण अल्प असतांना व जनतेच्या हातांत पैसे खेळत असतांना, स्वदेशीचें बस्तान पक्कें करण्याचा चंग बांधला पाहिजे. परदेशी वस्तूप्रमाणें सुबकता प्रथम आपल्या उत्पादनांत आणली गेली पाहिजे. ती आणण्याचा प्रयत्न, वेळ मिळून सुद्धा, झालेला नाहीं याबद्दल खेद वाटतो. युद्धकालांत भरपूर पैसा मिळवलेले आमचे कारखानदार काय करत बसले आहेत, याचा विस्मय वाटतो.

युद्ध संपताच पैसा हातीं असणाराची नजर लवकर टक्के देऊं शकणाऱ्या परदेशी वस्तूंच्या एजन्सीजवर गेलेली आहे; कारखानदारी वाढवण्याकडे अगर सुधारण्याकडे नाहीं. पण आमच्या सुदैवानें डॉलरच्या दुष्प्राप्यतेमुळें एजन्सीच्या धंद्यावर नुकतेंच नियंत्रण आलेलें असून चैनीच्या वस्तूंची आयात करणें कठिण झालेलें आहे. तेव्हां पुनश्च संधि उपलब्ध होत आहे आणि तिचा उपयोग करून घेतला गेला नाहीं तर येरे माझ्या मागल्या होऊन, आमच्या कारखानदारांना पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येऊन, आमच्या पुढाऱ्यांची स्वदेशीची तपश्चर्या विफल होईल. तुलनेनें, ब्रिटिश लोकांनीं सध्या स्वदेशीबद्दल चालविलेली आटापीट आपणांस उद्बोधक होण्यासारखी आहे.

# म्हैसूरमधील औद्योगीकरणाचें रहस्य

## नैसर्गिक संपत्तीस प्रगतिपर धोरणाची जोड

लेखकः—श्री. शंकरराव प्र. ओगले, मॅ. एजंटस, ( ओगले ग्लास वर्क्स लि. ), म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि., बंगलोर., अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स, बंगलोर

हिंदुस्थानांतील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या प्रांतांचा व संस्थानांचा विचार करूं लागलों, कीं म्हैसूर संस्थानाचें नांव सर्वांच्या डोळ्यासमोर प्रथम येतें. ह्या संस्थानांत ३०० चे वर मोठे कारखाने असून त्यांत १,००,००० वर कामगार गुंतलेले आहेत. २६ कारखान्यांनीं १९४४ साल अखेर ११ कोटी रुपये किंमतीच्या युद्धोपयोगी जिनसांची निर्मिती करून हिंदुस्थान सरकारास पुरविली. नैसर्गिक संपत्ति व भौगोलिक परिस्थिति ह्या बाबतींत म्हैसूरला अत्यंत अनुकूलता आहे. उत्कृष्ट हवा, भरपूर पाणीपुरवठा, मौल्यवान जंगलें व खनिज संपत्ति, ह्याहि बाबतींत म्हैसूरची परिस्थिति फारच समाधानकारक आहे. सोनें, लोखंड, पोलाद, सिमेंट, कागद, साखर, कापड, रेशीम, साबण, लाख, पोर्सेलिन, पॉटरीज, तंबाखू, ग्लास, एनामल, आगपेट्या, मशीन टूल्स, विमानें, इत्यादींचे कित्येक सुप्रसिद्ध कारखाने म्हैसूरमध्यें स्थापन होऊन दृढमूल झाले आहेत. ह्याचें कारण केवळ नैसर्गिक संपत्ति व सोई हें नसून, सरकारचें हार्दिक प्रोत्साहन व प्रत्यक्ष मदत ह्यांमुळेंच म्हैसूरचें औद्योगीकरण अत्यंत झपाट्यानें आजवर झालेलें आहे. म्हैसूर सरकारनें जमीन, पाणी, बिगर शेती सारा कर, इत्यादि बाबतींत अत्यंत दिलदारपणें नव्या उद्योगधंद्यांस सवलती दिल्या, इतकेंच नव्हे, तर कांहीं महत्त्वाच्या कंपन्यांचे ठराविक प्रमाणांत स्वतः भाग खरेदी करून त्यांचे बाबत लोकांत विश्वास निर्माण केला. त्यांच्या संचालक मंडळांवर आपला एक एक प्रतिनिधि नेमल्याचाहि इष्ट असाच परिणाम झाला. म्हैसूर सरकारनें उद्योगधंद्यांच्या बाबतींत अत्यंत प्रगमनशील धोरण ठेवल्या कारणानें म्हैसूरच्या बाहेरील कित्येक कारखानदार तेथें आकर्षिले गेले. त्यांनीं तेथें आपले कारखाने यशस्वी करून स्थानिक लोकांत उद्योगधंद्यांबाबत आवड वाढविण्याचें महत्त्वाचें कार्य केलें. महाराष्ट्रीयांपुरतें पाहिलें, तर मुंबईच्या एन्. शिरूर आणि कं. लि. नें कापडाच्या गिरण्यांचे धंद्यांत म्हैसूरमध्यें अग्रस्थान मिळविलेलें आहे. रेशमाच्या धंद्यांतील श्री. नारायणराव नाईक ह्यांची कीर्ति सर्वत्र आहेच. ओगले ग्लास वर्क्स लि. नें बंगलोर येथें १९४० सालीं ग्लास व एनामलचा मोठा कारखाना काढला असून हरिहर येथें किर्लोस्कर बंधू लि. ची म्हैसूर किर्लोस्कर कं. लि. मशीन टूल्सचें उत्पादन यशस्वी रीतीनें करीत आहे. महाराष्ट्रीयांच्या ह्या कर्तृत्वामुळें खुद्द महाराष्ट्रांतील लोकांतही आत्मविश्वास निर्माण होण्यास मोठेंच सहाय झालें आहे.

### विद्युत् योजनांचें महत्त्व

म्हैसूरमधील औद्योगीकरणास तेथील विद्युत् शक्तीच्या योजनेमुळें फारच चालना मिळालेली आहे. संस्थानांतून वहाणाऱ्या कावेरी, शिमशा, शरावती व भद्रा ह्या चारहि नद्यांवर हायड्रो इलेक्ट्रिसिटी निर्माण करण्यास सोईचीं ठिकाणें आहेत. कावेरी पॉवर योजना ही सबंद हिंदुस्थानांतील पहिली हायड्रो-इलेक्ट्रिक योजना असून तिचें श्रेय सर शेषाद्रि अय्यर ह्यांस आहे. शिवसमुद्रम् येथील पॉवर हाउस सुरू झालें, त्यास आतां ५० वर्षें होतील. अशा तऱ्हेच्या विद्युत् उत्पादनाची योजना अयशस्वी झाल्यासर्व ज राहाणार नाहीं, ह्या विरोधास न जुमानता सर शेषाद्रींनीं ती तडीस नेली, त्याचीं गोड फळें आतां म्हैसूरला चाखावयास मिळत आहेत. सर शेषाद्रींच्या दूरदर्शीपणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी, तेवढी थोडीच होईल. शिवसमुद्रम् येथील विजेचा उपयोग कोलार येथील खाणींत मोठ्या प्रमाणावर होऊं लागला. कृष्णराजसागर धरणामुळें शिवसमुद्रम् येथील वीजगृहाची उत्पादनशक्ति आतां ४२,००० किलोवॅटपर्यंत वाढली आहे. शिमशा योजना पुरी झाली असून शरावतीवरील जोग पॉवर स्कीमचें काम पुरें होत आलें आहे. म्हैसूरमधील २२६ गांवांतून विजेचा प्रसार झाला असून विद्युत्-शक्तीचा यंत्रें चालविण्यासाठी ६,००० ठिकाणीं उपयोग होत आहे. शेतीसाठी ७०० वर विजेचे पंप चालू आहेत. विजेच्या प्रसारामुळें कारखाने उभारणारांना सुलभ व सोईस्कर प्रेरक शक्तीच्या पुरवठ्याची काळजी करावी लागत नाहीं, हा फारच मोठा फायदा आहे. म्हैसूरचें उदाहरण इतर प्रांतांतून गिरवलें जात आहे, त्यास मूर्त स्वरूप येण्यास अद्याप किती तरी वर्षें लागतील. महाराष्ट्रांत वीजनिर्मितीच्या दृष्टीनें अनुकूल नद्यांचे प्रवाह व उतार आहेत. तेव्हां त्या योजना ह्यापूर्वींच प्रत्यक्ष चालू झाल्या असत्या तर महाराष्ट्रांतील कारखानदारांची फारच मोठी सोय झाली असती आणि त्यांचें पाऊल पुढें पडण्यास मोठीच मदत झाली असती.

म्हैसूर सरकार खासगी औद्योगिक प्रयत्नांस सहाय करूनच थांबलें नसून त्यानें स्वतःच्या मालकीचे व नियंत्रणाखालील कारखाने काढून उद्योगधंद्यांस चालना दिली आहे. भद्रावती येथील लोखंड-पोलादाचा आणि सिमेंटचा, बंगलोर येथील साबणाचा आणि पोर्सेलिनचा, व म्हैसूर येथील लाख, रंग, रेशीम, चंदनी तेल इत्यादींचे कारखाने वरील प्रकारचे आहेत. सरकारी मदतीनें चाललेले व खासगी कारखाने ह्यांची यादी तर पुष्कळच मोठी होईल व त्यांत सोन्याच्या खाणी, साखर, कागद, तंबाखू, विजेचे दिवे, पॉटरीज, सिल्क फिलेचर्स, कॉफी, वनस्पती तूप, ग्लास, एनॅमेल्स, आगपेट्या, मशीन टूल्स, कापडाच्या गिरण्या, इत्यादींचें उत्पादन करणारे कारखाने आढळतील. ह्या मोठाल्या कारखान्यांच्या अनुषंगानें अनेक दुय्यम उद्योगधंदे निर्माण झालेले आहेत व होत आहेत. बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समुळें शास्त्रीय संशोधनाचें केंद्र तेथें निर्माण झालें आहे, त्याचा प्रत्यक्ष फायदा कारखानदारांस फारसा मिळत नसला तरी सुद्धां त्याचें सान्निध्य त्यांस अतिशय उपकारक झालें आहे. म्हैसूरच्या संस्थानास एकामागाहून एक असे उद्योगधंद्यांत लक्ष घालणारे अत्युच्च दर्जाचे दिवाण लाभले, हें खरोखरच त्या संस्थानाचें भाग्य होय. सर एम्. विश्वेश्वरय्या व सर मिर्झा इस्माईल ह्यांच्या कारकीर्दींची छाप म्हैसूरच्या औद्योगिक जीवनावर कायमची राहील, ह्यांत आश्चर्य नाहीं. महाराष्ट्रीय कारखानदारांस तेथें केवळ वावच नव्हे तर प्रत्यक्ष उत्तेजन मिळत गेलें, म्हणूनच तेथील औद्योगिक प्रगतीचा हा त्रोटक वृत्तांत लिहिण्याची संधी मला मिळत आहे.

---

### “अर्था” चा पुढील अंक

दिवाळीनिमित्त “अर्था” चे दोन अंक दरसालप्रमाणें बंद राहून, त्यानंतरचा अंक ३ डिसेंबर, १९४७ रोजीं प्रसिद्ध होईल.

# हिंदी कोको-चॉकोलेटचा धंदा

लेखकः—श्री. ग. रा. साठे, मालक, साठे चॉकोलेट वर्क्स, पुणें

कोको पावडर व चॉकोलेट हे पदार्थ भिन्न असले तरी ते दोन्हीहि मुख्यतः मूळ कोको बियांपासून केलेले असतात. १४ व्या शतकांत स्पॅनिअर्डस लोकांनीं अमेरिकेचा शोध लावला, तोपर्यंत सुधारलेल्या देशांना कोकोची कांहींच माहिती नव्हती. खुद्द अमेरिकेंतहि, कोकोच्या बिया दुर्मिळ होत्या आणि त्यांचा चलन म्हणून उपयोग केला जाई.

कोकोच्या धंद्याचा इतिहास अगदीं ताजा असला तरी त्या धंद्यानें आतां अतिशय महत्वाचें स्थान मिळविलें आहे आणि कोकोस एक महत्त्वाचें अन्न म्हणून मान्यता मिळाली आहे. इंटरनॅशनल इमर्जन्सी फूड कौन्सिलनें गहूं व तांदूळ ह्या धान्यांप्रमाणें कोकोवर नियंत्रण घातलें आहे आणि इंग्लंडसारख्या देशांत कोकोचा रोजच्या रेशनमध्यें समावेश झालेला आहे. कोको-चॉकोलेटचें, अन्न म्हणून महत्त्व शास्त्रज्ञांनींहि मान्य केलें आहे.

कोको-चॉकलेट इतर सुधारलेल्या देशांत अतिशय लोकप्रिय असलें, तरी हिंदुस्थानांत मोठ्या शहरांतील कांहीं लोकांचे पलीकडे त्याची माहिती गेलेली नाहीं. परंतु, हिंदुस्थानच्या वाढत्या लोकसंख्येस अन्नाच्या तुटवडा भासूं लागल्यानंतर आतां त्याकडे दुर्लक्ष्य करून भागणार नाहीं.

## धंद्याचा इतिहास

हिंदुस्थानांतील ह्या धंद्याचा इतिहास पहाता, पहिल्या महायुद्धाचे काळांत बिलिमोरा येथें एकानें धंद्यास प्रारंभ केला, तो अयशस्वी झाला असें दिसतें. कलकत्ता, मुंबई, मद्रास, इत्यादि ठिकाणीं आयात केलेल्या चॉकोलेटचे पदार्थ करण्याचा उपक्रम चालू होता, परंतु कारखान्याच्या स्वरूपांत कोको-चॉकोलेटचें उत्पादन करण्याचा प्रारंभ १९४१ नंतरच सुरू झाला. साठे चॉकोलेट वर्क्सच्या सतत प्रयत्नांनंतर, ह्या धंद्यास संरक्षण देण्याचा प्रश्न टारिफ बोर्डाकडे सोपविला गेला. टारिफ बोर्डानें अनुकूल मत देऊन कांहीं महत्त्वाच्या शिफारसी केल्या, त्यांपैकी कांहींस सरकारनें मान्यता दिली असून बाकीच्यांचा विचार चालू आहे.

अन्नाच्या तुटवड्यास तोंड देण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें कोको-चॉकोलेटच्या धंद्यास उत्तेजन देणें अत्यावश्यक आहे. हिंदुस्थानांतील निदान कांहीं भागांत कोकोची लागवड चांगली वाढवितां येणें शक्य आहे, असा अभिप्राय ब्रिटिश साम्राज्यांतील कोकोच्या लागवडीचा विचार करण्यासाठी नेमलेल्या कमिशननें व्यक्त केला आहे. परंतु, अद्याप त्या दिशेनें सरकारी प्रयत्न झालेले नाहींत. कोकोच्या लागवडीचा प्रयोग दीर्घकालीन असल्याकारणानें, इंडियन अॅ. रिसर्च इन्स्टिट्यूट किंवा प्रांतिक सरकारांचीं शेतकी खातीं ह्यांच्या मार्फतच हें काम होणें श्रेयस्कर व इष्ट ठरतें. हे प्रयोग यशस्वी ठरल्यास एक-दोन प्रांतांचा तरी आर्थिक दृष्ट्या उत्कृष्ट फायदा झाल्याविना राहणार नाहीं; कारण उसाच्या खालोखाल हें पीक फलदायी असतें.

लष्करी दृष्ट्याहि कोको-चॉकोलेट धंदा महत्त्वाचा आहे. कारण, अडचणीच्या वेळचें रेशन म्हणून कोको-चॉकोलेट देण्यात येतें. जर्मन व अमेरिकन सैनिकांच्या मिलिटरी रेशनमध्यें कोको-चॉकोलेटला महत्वाचें स्थान होतें. प्रस्तुत लेखकानेंहि २ औंस चॉकोलेटच्या तुकड्यावर कित्येक वेळ काढली असून, पोष्टिकपणा व तरतरी राखण्याच्या त्याच्या गुणांचा अनुभव घेतला आहे.

## हिंदुस्थानांतील उत्पादन व वाव

टारिफ बोर्डाच्या रिपोर्टप्रमाणें, हिंदुस्थानांत एकूण ५६० टन उत्पादनशक्तीचे कारखाने आहेत, त्यांचा तपशील असाः—

| कंपनीचें नांव | उत्पादन शक्ति ( टन ) |
|---|---|
| साठे चॉकोलेट वर्क्स, पुणें | ३०० टन |
| साठे सिंध चॉकोलेट वर्क्स, कराची | १०० टन |
| पर्ल प्रॉडक्टस, मुंबई | ७५ टन |
| इतर | ८५ टन |
| एकूण, | ५६० टन |

हिंदुस्थानाची वाढती लोकसंख्या व त्या प्रमाणांत शेतीची उत्पादन शक्ति न वाढण्याचें लक्षण, हीं लक्षांत घेतलीं तर कोको-चॉकोलेटच्या धंद्यास हिंदुस्थानांत केवढा मोठा वाव आहे, हें लक्षांत येईल. आजच टारिफ बोर्डाच्या हिशेबाप्रमाणें, १,००० टनांस मागणी आहे.

कोकोचीं फळें, साखर व दूध हीं कोको-चॉकोलेटच्या धंद्याचा मुख्य कच्चा माल असून त्यांपैकी साखर व दूध ह्या जिनसा मामुली काळांत हिंदुस्थानांत मिळूं शकतात. प्रश्न उरला, तो फक्त कोकोच्या बियांचा; त्या आयात केल्या पाहिजेत. परंतु ज्या देशांत हा धंदा जोमानें चालू आहे; त्या सर्वांचेंच आयात बियांवरच अवलंबून आहे, हें येथें नमूद केलें पाहिजे. कोकोचें उत्पादन सिलोन ह्या शेजारच्या देशांत होतें आणि हिंदुस्थानांतहि तें होण्याजोगें आहे. ग्रेट ब्रिटन आपल्या राजकीय वर्चस्वाचा उपयोग करून, स्वस्त दरानें कोकोच्या बिया खरेदी करूं शकतो, तें मात्र हिंदुस्थानास आज करतां येणार नाहीं. परंतु, आतां स्वायत्त हिंदुस्थानास स्थानिक कोकोच्या लागवडीस संरक्षण देतां येईल व ताग आणि अभ्रक ह्यांसारख्या जिनसांच्या ऐनजिनसी मोबदल्यांत अर्जेंटिना व ब्राझील ह्यांसारख्या कोकोच्या उत्पादकांकडून कोकोच्या बिया मिळवितां येतील. कोको चॉकोलेटच्या धंद्यास लागणारी यंत्रसामुग्री फारशी गुंतागुंतीची नसते, परंतु ती येथें तयार करणें आजच किफायतशीर ठरणार नाहीं.

## उज्वल भवितव्य

युरोपियन देशांत चॉकोलेटचा व चॉकोलेट ह्या खाऊचा, हे दोन स्वतंत्र धंदे मानले जातात. पहिल्या प्रकारचे कारखाने खाऊ करणाऱ्या कारखान्यांसाठी आधारभूत चॉकोलेट तयार करतात. तेथील कित्येक हॉटेलें ह्या चॉकोलेटपासून ताजी मिठाई तयार करून विकतात. ही ताजी मिठाई दिसण्यास अधिक सुंदर असून निरनिराळ्या आवडीप्रमाणें वेगवेगळ्या प्रकारची ती करतां येते. हिंदुस्थानाच्या विशिष्ट हवामानांत, चॉकोलेटच्या मिठाईचे कारखाने अशा रीतीनें निरनिराळ्या शहरांत विखुरले, तर तें अधिक सोईचें होईल. सध्यां मुंबई, कलकत्ता, दिल्ली, सिमला, इत्यादि मोठ्या व श्रीमान शहरांतच असे कारखाने आहेत. इतर हिंदी मिठाईच्या मानानें कोको-चॉकोलेटची मिठाई महाग पडते हें त्याचें कारण आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून उत्पादन खर्च उतरला आणि नफ्याचें प्रमाण कमी केलें तर कोको-चॉकोलेटचा प्रसार सामान्य लोकांतहि पुष्कळच वाढण्याजोगा आहे. इतर मिठाईपेक्षा तिच्यामध्यें पौष्टिकपणा ज्यास्त असतो. ह्या दृष्टीनें तें इष्टच ठरेल. एकट्या ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल १,३०,००० टन कोको-चॉकोलेट खपतें, ह्यावरून ह्या धंद्यास किती उज्वल भवितव्य आहे, हें लक्षांत येईल. इतक्या महत्त्वाच्या धंद्यास प्रोत्साहन द्यावयाचें का त्याच्याकडे दुर्लक्ष्य करावयाचें, हें अर्थातच सरकारचे हातीं आहे.

# मुंबई सरकारचे समाजसुधारणेचे कायदे

लेखक :—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी., सातारा.

१९४५ मार्च पासून देशामध्यें पुन्हां प्रांतांमधून " कॉंग्रेस सरकारें " स्थापन झालीं आहेत. कॉंग्रेस सरकार हें लोकांचें सरकार आहे. कोणत्याही विविक्षित जातीचें, जमातीचें किंवा सामाजिक अगर राजकीय वा धार्मिक अशा कोणत्याही विचाराचें तें नाहीं. त्याला देशांतील सर्व लोकांची उन्नती करावयाची आहे. अर्थात, अधिकारारूढ झाल्यानंतर देशांतील निरनिराळ्या जातींच्या लोकांच्या हिताकरितां त्याला अनेक कायदे करावे लागले. हे कायदे करितांना साहजिकच कांहीं विशिष्ट व्यक्तींचा त्याला तीव्र विरोधही सहन करावा लागत आहे व त्या दृष्टीनें त्याची लोकप्रियता थोडी-फार कमी होत आहे यांत शंका नाहीं. परंतु त्या मोर्चास डगमगून न जातां निरनिराळ्या प्रांतांतील कॉंग्रेस सरकार आपला लोकहित करण्याचा क्रम धीटपणें अनुसरत आहेत, हें खरें. खरोखर, ही गोष्ट फार स्पृहणीय आहे, यांत शंका नाहीं.

मुंबई प्रांतामध्यें आतांपर्यंत सरकारनें जे सामाजिक कायदे केले त्यांचे सामान्यतः तीन भाग पाडतां येतील. कांहीं कायदे शेतकरी व गरीब ऋणको लोकांच्या हिताकरितां केले आहेत. ह्या प्रांतामध्यें बहुजन समाज हा खेडेगांवांत राहून बहुशः शेतकीवर उपजीविका करणारा आहे. अशा लोकांचें जीवन सुखाचें व समाधानाचें करणें हें कॉंग्रेस सरकारचें मुख्य कर्तव्य होतें. हा समाज शेकडा ८० टक्के आहे. ह्या समाजाचें हित करणें हें सरकारनें आपलें पहिलें कर्तव्य ठरविलें. त्या दृष्टीनें मुंबई शेतकरी कर्ज निवारण कायदा १९४७, कुळ कायदा, सावकारी नियंत्रणाचा कायदा, नुकताच झालेला जमिनीच्या तुकडेबंदीचा कायदा, शेतकरी लोकांच्या धान्याच्या विक्रीसंबंधी कायदा, वगैरे अनेक कायदे शेतकरी लोकांच्या हिताकरितां मुंबई सरकारनें केले आहेत व अशा रीतीनें शेतकऱ्यांना भरपूर अन्न व वस्त्र मिळवून व त्यांच्या शिक्षणाची सोय करून, त्यांचें जीवन सुखाचें करण्याचा भगीरथ प्रयत्न आपलें कॉंग्रेस सरकार प्रामाणिकपणें करीत आहे.

## शेतकऱ्यांचें कर्जनिवारण

मुंबई शेतकरी-कर्जनिवारण ( १९४७ चा २८ वा ) कायद्यानें जे खरोखरी शेतकरी असून ज्यांचें कर्ज १५,००० रुपयांपेक्षां जास्त नाहीं अशा शेतकरी कर्जदारांच्या कर्जाचा प्रथम योग्य हिशेब, व्यवहाराच्या प्रारंभापासून घ्यावयाचा; त्यानंतर त्या कर्जापैकीं मुद्दल किती आहे व व्याज किती आहे याची नीट छाननी करावयाची; अशा रीतीनें शेतकऱ्याकडे असलेला कर्जाचा आंकडा निश्चित करावयाचा; हें सर्व झाल्यावर कर्ज देण्याची शेतकऱ्यांची ऐपत किती आहे हें पहावयाचें व मग त्या कर्जामध्यें सूट देऊन राहिलेलें कर्ज सावकारास हप्तेबंदीनें देण्याचा हुकूम करावयाचा. अशा रीतीनें विविक्षित काळांत प्रांतांतील शेतकरी लोक कर्जमुक्त होतील अशी अपेक्षा आहे.

## कुळ कायदा

दुसरा कायदा कुळ कायदा होय. हा कायदा १९३९ चा २९ वा कायदा होय. या कायद्यानें कुळाची इनामदाराच्या जमिनीमध्यें जी कूळ वहिवाट असेल त्याला कायमपणा आणण्याचा प्रयत्न केला आहे. कुळांकडून आतां सरकारनें ठरविलेल्या विविक्षित दरापेक्षां जास्त दरानें जमीनदारांना खंड वसूल करितां येणार नाहीं. अशा रीतीनें जमिनीची सुधारणा करून अधिक चांगलें पीक काढण्यास कुळास उत्तेजन मिळतें. सामान्यतः १९३८ च्या जानेवारीच्या पूर्वी सहा वर्षेपर्यंत अगर १९४५ च्या जानेवारीच्या १ च्या पूर्वीं सहा वर्षेपर्यंत जो कूळ एखाद्या जमिनीवर असेल त्यास त्या जमिनीचें " संरक्षित कूळ " म्हणून समजण्यांत येईल व तो जर ठराविक दरानें जमीनदारास आपला खंड वेळेवर देण्याची खबरदारी घेईल तर जमीनदारांना अशा कुळास जमिनीवरून केव्हांही काढतां येणार नाहीं; याप्रमाणें आपण जी जमीन कसतों त्या जमीनीबद्दल कुळास आत्मीयता वाटून त्यांतून जास्त पीक काढण्याचा कूळ हा कसून प्रयत्न करील व अशा रीतीनें " अधिक धान्य पिकवा " ही जी सरकारची योजना आहे त्या योजनेस चांगलीच मदत होईल.

## सावकारीचें नियंत्रण

सामान्य जनांच्या हिताकरितां केलेल्या कायद्यापैकीं सावकारी नियंत्रणाचा कायदा हा महत्त्वाचा होय. ह्या कायद्यानें सावकारीचा धंदा करणाऱ्या सर्व लोकांनी आपलें नांव नोंदून घेतलें पाहिजे, सरकारने ठरविलेल्या रीतीनें आपले सर्व हिशेब ठेविले पाहिजेत, ठराविक दरानेच व्याज आकारलें पाहिजे व कुळास दरवर्षी त्याचेकडे येणे झालेल्या रकमेची माहिती दिली पाहिजे, वगैरे अनेक निर्बंध सावकार लोकांवर लादले आहेत.

## तुकडेबंदी व एकतळी शेती

कॉंग्रेस सरकारनें कुळ कायदा करून शेतकरी वर्गास सुखी करण्याचा जसा प्रयत्न केला तसाच प्रयत्न नुकत्याच झालेल्या तुकडे बंदीच्या कायद्यानें केला आहे. ह्या कायद्यानें जमिनीच्यामध्यें विविक्षित क्षेत्रापेक्षां कमी क्षेत्राचे तुकडे कोणत्याही कारणाकरितां पाडावयाचे नाहींत असा निर्बंध घालण्यांत आला आहे. तसेंच तुकडेबंदी बरोबरच " एकतळी " शेतीच्या व्यवस्थेचीही योजना केली आहे. एकाच गांवांत, एकाच शेतकऱ्याची, या कोपऱ्याला, त्या कोपऱ्याला अशी विखुरलेली शेतजमिन त्याला सलग मिळण्याची व्यवस्था करणें म्हणजेच एकतळी शेती होय. आयुष्याच्या काळाचा अपव्यय न होतां शेतकऱ्याला आपल्या मालकीचें सारें क्षेत्र नजरेच्या टप्पांत राहून तन्मयतेनें शेत मेहनत करण्यास सोपें जावें व भरीव उत्पन्न काढण्यास मदत व्हावी, हा या एकतळी योजनेचा उद्देश होय.

## दारूबंदी

शेतकरी, मजूर, कामकरी वगैरे लोकांचें जीवन सुखी करावयाचें म्हणजे त्यांचेमध्यें असलेल्या दारू पिण्याच्या भयंकर व्यसनास आळा घालण्याचा प्रयत्न करणें होय. १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत दारू दुकानावर निरोधन करणें ही एक महत्त्वाची बाब होती. त्यामुळें १९३७ सालीं कॉंग्रेसनें निरनिराळ्या प्रांतांत अधिकार हातीं घेतल्यावर दारूबंदीच्या प्रश्नास जोराची चालना मिळाली. मुंबई सरकारनें अहमदाबाद आणि मुंबई शहर व उपनगर येथें १९३९ सालीं संपूर्ण दारूबंदी अमलांत आणली व कांहीं जिल्ह्यांतील विशिष्ट भाग कोरडा विभाग म्हणून ठरविला. दारूबंदीची चळवळ यशस्वी होण्यास सर्व प्रांतभर एकच धोरण असावयास पाहिजे होतें. साहजिकच एका विशिष्ट भागांत संपूर्ण दारूबंदी व शेजारच्या भागांत पूर्ण मोकळीक हें मुंबई सरकारचें १९३८-३९ सालीं स्वीकारलेलें धोरण चुकीचें होतें, असें सिद्ध झालें. १९४६ च्या मार्च महिन्यांत कॉंग्रेस सरकार पुन्हां अधि-

**: अभीष्ट चिंतन :**

स्वतंत्र भारतांतील ही पहिली दिवाळी "सह्याद्रि" चे विमेदार, भागीदार, प्रतिनिधी व हितचिंतक यांस आनंदाची, सुख-समृद्धीची व भरभराटीची जावो अशी सदिच्छा आम्ही प्रकट करतों.

★

संस्थेचें नुकतेंच झालेलें द्वितीय मूल्य-मापन अत्यंत यशस्वी झालें असून खालीलप्रमाणें इंटेरीम बोनस जाहीर करण्यांत आला आहे.

हयातीनंतरचे विमे .... दरसाल दरहजारीं रु. ६
मुदतीचे विमे .... दरसाल दरहजारीं रु. ५

ह्याशिवाय निरनिराळ्या कारणांसाठीं रिझर्व्हज राखूनही रु. ५०,००० निव्वळ नफा झाला आहे. अशा ह्या प्रगती-पर संस्थेची पॉलिसी अगर एजन्सी घेऊन आपला दिपवाळीचा आनंद द्विगुणित करा.

—सविस्तर माहितीसाठीं लिहा—

**गो. ग. सौंदणकर**
मॅनेजिंग डायरेक्टर
दि सह्याद्रि विमा कं. लि., नासिक.

**स्वतंत्र हिंदुस्थानांतील**
**—पहिल्या दिवाळीचा—**
**शुभ संदेश**

१ आरोग्य
**ज्वरामृत**
ANOFELIN Liq.

२ बलसंवर्धन




**आयुर्वेद रसशाळा पुणें लि.**

लहान प्रमाणावर व घरगुती तयार होणाऱ्या वस्तूंस उत्तम प्रकारें प्रसिद्धी-विक्री मिळवून देणारें

★ एकमेव केंद्र ★

**व्यापार-संवर्धन गृह, पुणें**

अधिक माहितीसाठीं
**संस्थेस भेट द्या**
किंवा पत्रव्यवहार करा.

**पारतंत्र्य शृंखला तुटल्या**

राष्ट्रोद्धाराचा एकमेव मार्ग
म्हणजेच
राष्ट्राची सांपत्तिक अभिवृद्धि
—त्यासाठीं अविरत झटणारी—

**दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि.**

८६६ सदाशिव पेठ, पुणें २.

| | |
|---|---|
| एकूण जिंदगी | रु. ३,४१,७३०–५–९ |
| आयुर्विमा निधी | रु. २,४५,५३६–६–९ |
| पूर्ण काम | रु. २३,८५,०००–०–० |

सर्व प्रकारच्या विमा योजनांसाठीं व एजन्सीसाठीं लिहा.

डी. डी. देशपांडे, बी. ए., एलएल. बी., सेक्रेटरी
व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी., मॅनेजर

आमचे सर्व विमेदार, प्रतिनिधी व हितचिंतक यांना स्वातंत्र्याची पहिली दिवाळी भरभराटीची व सुख-समृद्धीची होवो.

कारारूढ झालें व त्याने सर्व प्रांतभर एकच धोरण अमलांत आणण्याचें ठरवून चार वर्षांत संपूर्ण दारूबंदीची मजल गांठण्याचें ठरविलें आहे व तशी तजवीज गेल्या एप्रिल पासून अमलांत आली आहे. आतां संपूर्ण दारूबंदीचा कार्यक्रम चार वर्षांत विभागला असल्याने व सर्व प्रांतभर सारखीच योजना अमलांत येणार असल्यानें संपूर्ण दारूबंदीच्या मोहिमेस यश येईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं.

### हरिजनोद्धार

शेतकरी लोकांप्रमाणेंच समाजानें आजपर्यंत झिडकारलेल्या मागासलेल्या जातींचें म्हणजे हरिजन लोकांचें जीवन सुखी करण्याचा प्रयत्नही काँग्रेस सरकारने चालविला आहे. हिंदु समाजांतील इतर घटकांस समाजांत मोकळेपणानें वावरण्यास, वाटेल तो धंदा करण्यास, वाटेल तेथें घर बांधून रहाण्यास-ज्या ज्या म्हणून सवलती आहेत त्या त्या सवलती अस्पृश्यांना मिळाल्या पाहिजेत. अस्पृश्यांनी हिंदु म्हणून राहिलें पाहिजेच परंतु हिंदु समाजांतील इतर घटकांना जें स्वातंत्र्य आहे तें मात्र त्यांना मिळणार नाहीं असें जर कोणी म्हणेल तर तें अन्यायाचें होईल. असें म्हणणारा इसम दंडास पात्र होणें जरूर आहे असें काँग्रेस सरकारने ठरविलें आहे व हरिजनांच्या उद्धाराच्या बाबतींत त्यानें दोन कायदे केले आहेत. त्यांपैकीं "हरिजन निर्बंध निवारण कायदा" हा एक होय. आतां हरिजन हा हरिजन आहे म्हणून कसल्याही अधिकाराच्या जागेसाठी तो नालायक ठरावयाचा नाहीं. कोणत्याहि जागीं जाण्यास त्याला प्रतिबंध करितां यावयाचा नाहीं. थोडक्यांत म्हणजे, हिंदुपैकी दुसऱ्या कोणत्याही जातीचीं माणसें जेथें व्यवहार करूं शकतात अशा सर्व ठिकाणीं कोणाही हरिजनास तो हरिजन आहे म्हणून आतां बंदी होणार नाहीं. अशी कोणी बंदी केल्यास तो गुन्हा समजून अशा इसमास तीन महिन्यांची कैद, अथवा दोनशे रुपयांपर्यंत दंड, अगर दोनही शिक्षा भोगाव्या लागतील.

### मंदिर प्रवेश

हरिजनांच्या उद्धाराकरितां केलेला दुसरा कायदा म्हणजे "हरिजन मंदिर प्रवेश कायदा" होय. देवळांत जाण्यास मिळणें म्हणजे कांहीं मोक्षप्राप्ति नाहीं. सवर्ण हिंदूंपैकी हजारो लोक वर्षेच्या वर्षें हिंदूंच्या देवळांत जात नाहींत. समाजांतील इतर घटकांप्रमाणेच अस्पृश्यांनाहि समानतेनें वागविण्याची हिंदु समाजाची तयारी आहे एवढेंच अस्पृश्यांना मंदिरप्रवेश दिल्यानें दिसून येणार आहे. या कायद्यानें बाकीच्या सर्व हिंदूंना ज्या तऱ्हेचे व ज्या मर्यादेपर्यंत मंदिरांतून वावरण्याचे आणि पूजनाचे हक्क आहेत त्या त्या तऱ्हेचे आणि त्या त्या मर्यादांपर्यंतचे हक्क हरिजनांना आहेत असें जाहीर केलें आहे. तसेंच, मंदिराला लागून अगर त्याच्या आवारांत असो किंवा नसो, जें तळें, विहीर, झरा अगर पाणीप्रवाह "तीर्थ" म्हणून असेल त्यांत स्नान करण्याचा व त्याच्या पाण्याचा उपयोग करण्याचा हक्कहि हरिजनांना प्रस्तुत कायद्यानें निर्विवाद दिला आहे. आतां ह्या हरिजनांच्या हक्काआड कोणी येईल तर त्याला सहा महिनेपर्यंत कारावासाची शिक्षा, दंड अगर दोनही भोगावीं लागतील. हरिजनांच्या वरील हक्काआड एखाद्या मंदिराचा व्यवस्थापक अगर विश्वस्त आला असेल तर त्याला वरील शिक्षा भोगावी लागून शिवाय त्या मंदिराला सरकारकडून जमिनीच्या उत्पन्नाची अगर कांहीं नगदीची तरतूद असल्यास ती अंशतः किंवा सर्वस्वी बंद केल्याशिवाय सरकार रहाणार नाहीं.

### द्विभार्या प्रतिबंध

समाजांतील स्त्रीवर्ग हाही अनेक अन्यायांनीं त्रस्त झाला आहे. त्यांचे जे वैयक्तिक हक्क आहेत त्यांपैकी विवाह हा मोठा हक्क आहे. त्या बाबतींत दोन फार प्रचंड क्रांतिकारक कायदे करून स्त्रीवर्गावर होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न काँग्रेस सरकारनें मोठ्या धैर्यानें केला आहे. ते दोन कायदे म्हणजे द्विभार्या प्रतिबंधक कायदा व घटस्फोटाचा कायदा, हे होत.

मुंबई प्रांतांत काँग्रेस सरकारनें प्रचंड क्रांति घडवून आणणारा द्विभार्या प्रतिबंधक कायदा ६ नोव्हेंबर १९४६ पासून ह्या प्रांतांत लागू केला आहे. तो फक्त हिंदु लोकांनाच लागू आहे. मुसलमान लोकांना तो लागू नाहीं. जो कोणी मुंबई प्रांताचा रहिवासी एक बायको जिवंत असतांना दुसऱ्या स्त्रीशीं विवाह करील तो ह्या कायद्यानें शिक्षेस पात्र होईल, एवढेंच नव्हे तर त्याचें दुसऱ्या बायकोशीं झालेलें लग्न रद्द समजावयाचें म्हणजे ती पूर्वीप्रमाणें कुमारीच आहे असें समजावयाचें. ह्या कायद्याचे परिणाम फार दूरगामी होणारे आहेत. आतां कोणाही हिंदु गृहस्थास कोणत्याही परिस्थितींत एक बायको जिवंत असतांना दुसरें लग्न करितां येणार नाहीं. ह्या नियमास कांहींही अपवाद नाहीं. समजा, एखाद्या बायकोस मूल होत नसेल किंवा ती भयंकर रोगानें पछाडलेली असेल, तरी सुद्धां नवऱ्यास दुसरें लग्न करितां येणार नाहीं, एवढेंच नव्हे तर पहिल्या बायकोनें स्वखुशीनें आपल्या नवऱ्यास दुसरें लग्न करण्याची परवानगी दिली तरी त्या नवऱ्यास दुसरें लग्न करितां येणार नाही व एक बायको जीवंत असतांना जर एखाद्या हिंदु गृहस्थानें दुसरें लग्न केल्यास कायद्याच्या दृष्टीनें ती दुसरी बायको त्याची विवाहित स्त्री न होता एक प्रकारें रखेली म्हणून समजली जाईल व अशा स्त्रीस झालेली संतती ही त्या गृहस्थाची अनौरस संतती म्हणून मानली जाईल. असा हा क्रांतिकारक कायदा आहे.

### घटस्फोटाची सोय

एकपत्नीत्वाचा कायदा केल्यानंतर घटस्फोटाचा कायदा करणें अगदीं क्रमप्राप्तच आहे. कारण, दुसऱ्या बायकोशीं लग्न करणें झाल्यास नवऱ्यानें पहिल्या बायकोस सोडचिठ्ठी दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. सबब मुंबई सरकारनें घटस्फोटाचा कायदा केला आहे व तो १२ मे, १९४७ पासून ह्या प्रांतांत रूढ झाला आहे. ह्या कायद्यानें अगदीं जरूरीच्या तेवढ्याच कारणांकरितां घटस्फोट मागतां येईल. हा घटस्फोट नवरा अथवा बायको ह्यापैकीं कोणालाही मागतां येईल. घटस्फोटाचीं कारणें खालील प्रमाणें आहेतः—(१) जर लग्नाचे वेळीं आपला जोडीदार नपुंसक असून घटस्फोट मागतेवेळीं तसाच राहिला असेल, (२) जर जोडीदार जातिवंत वेडा असेल अगर सात वर्षेपर्यंत तरी वेड्यासारखा वागत असेल, (३) जोडीदार सात वर्षेपर्यंत महारोगानें पीडित असेल, (४) जोडीदारानें सतत चार वर्षेपर्यंत दुसऱ्या जोडीदाराचा त्याग केला असेल, (५) जोडीदार सात वर्षेपर्यंत जिवंत असल्याचें ऐकिवांत नसेल, (६) जोडीदार बाहेरख्याली असेल. फक्त वरील कारणांकरितांच नवराबायकोपैकीं कोणालाही घटस्फोट मागतां येईल. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, नवऱ्याकडून घटस्फोट मिळाल्यावरही जर बायकोस दुसरें पोट भरण्याचें साधन नसेल तर घटस्फोट दिलेल्या बायकोच्या अन्नवस्त्राचीही व्यवस्था नवऱ्यानें करावयाची आहे. जी स्त्री आपली बायको नाहीं व जी दुसऱ्याशीं लग्न करूं शकते अशा स्त्रीच्या पोटापाण्याची व्यवस्था करावयास एखाद्या गृहस्थास भाग पाडणें म्हणजे त्या गृहस्थावर मोठा अन्याय होय व हा स्त्रीदाक्षिण्याच्या अतिरेकाचाच एक प्रकार आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्री. म. स. पारखे यांनीं गतवर्षी विलायतेस जाऊन यंत्रसामुग्रीची मागणी नोंदवून ठेवली. त्या यंत्रसामुग्रीपैकीं बरीचशी यंत्रसामुग्री मुंबईस आली असून तिच्या उभारणीचें काम चालू आहे. यशस्वीपणें पुढे बनविणारी ही महाराष्ट्रांतील एकमेव गिरणी होय.

कारखान्याची स्थापना १९३० ] ठेवी घेणें आहेत [ लिमिटेड कंपनींत रूपांतर १९४२

# दि पेपर ॲण्ड पल्प कन्व्हर्शन्स लिमिटेड

[ स्टेशनरी मालाचा कारखाना पुण्यास असून पुठ्ठ्याची गिरणी मुंबईस चालू आहे. ]

—: ठेवीचे दर :—

१ वर्ष : ४ टक्के; २ वर्षें : ५ टक्के; ३ वर्षें ६ टक्के.

[ कंपनी शेअर-होल्डरांना प्रथमपासून ६ टक्के टॅक्स-फ्री डिव्हिडंड देत आहे. ]

किमान ठेव रु. ५०० ची असावी; व्याज सहामाही दिलें जाईल.

★ ठेवीच्या अर्जाचा नमुना मागवा. ★

८१४ सदाशिव पेठ,
नव्या विष्णूजवळ, पुणें २.

एम. एस. पारखे ॲंड कंपनी,
मॅनेजिंग एजंटस.



## पुनर्घटना !

# कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि.

= लक्ष्मीरोड, पुणें शहर =

( अध्यक्षः—श्री. अण्णासाहेब भोपटकर )

या कंपनीला आपल्या एजन्सीची पुनर्घटना करावयाची असून सर्व प्रमुख शहरांतून स्पेशल व चीफ एजन्सीज देणें आहेत.

महत्त्वाकांक्षी तरुणांस ही सुवर्णसंधि आहे.

—: विशेष माहितीकरितां लिहा. :—

श्री. म. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर.

★ आमचे सर्व हितचिंतकांस ही दिवाळी सुखाची जावो. ★

# सहकारी चळवळीची प्रगति एवढी मंद कां ?

लेखक:—श्री. यशवंत दत्तात्रय खोले, एल्. एस्. जी. डी., पुणें.

हिंदी सहकारी चळवळीचे कालमाना प्रमाणें मुख्यतः चार खंड पडतात. पहिला भाग सन १९०४ ते १९१९. या कालांत मुख्यतः सहकारी शेतकी पतपेढ्या अस्तित्वांत येऊन त्यांचे मार्फत शेतकऱ्यांना कर्जें देण्यांत आलीं. परंतु त्यामध्यें सहकारी संस्था व त्यांचे सभासद यांची संख्या फार मोठी नव्हती. दुसऱ्या खंडांत म्हणजे सन १९३० अखेरचा भाग—यामध्यें सोसायट्यांची संख्या, खेळतें भांडवल व सभासद संख्या ह्यामध्यें वाढ झाली व सहकारी संस्थांनी नवीन अशा कार्यक्षेत्रांत प्रवेश केला. तिसऱ्या कालविभागाची मर्यादा सन १९३८ पर्यंत मानल्यास त्यामध्यें आर्थिक मंदी सहकारी चळवळीस चांगलीच जाणविली. चवथा कालविभाग म्हणजे १९३९ च्या नंतरचा. या खंडांत सोसायट्यांची संख्या, सभासद संख्या व खेळतें भांडवल यांनीं फार मोठा उच्चांक गांठला. वर म्हटल्याप्रमाणें मुख्यतः युद्धकालीन काळांत सहकारी चळवळीस जोराची चालना मिळून नवीन नवीन कार्यक्षेत्रें निर्माण झालीं व त्यानंतर नवीन लोकमतानुवर्ती अशीं विधिमंडळें व लोकमंत्री निवडून आल्यानें सहकारी चळवळीस जोराची चालना मिळेल असा विश्वास वाटूं लागला.

## नवीन सोसायट्यांचा प्रसार

प्रांतीय सरकारनें आपलें धोरण जाहिर करतांना शक्य तों नियमित धान्य वाटप, औद्योगिक चळवळीस प्रोत्साहन, शेतकऱ्यांना द्यावयाचीं कर्जें व विशिष्ट सवलती सहकारी चळवळीला दिल्या जातील असें जाहिर केलें व त्यामुळें नवीन सोसायट्या अस्तित्वांत येऊं लागल्या. नवीन सोसायट्या रजिस्टर करण्याचें काम सहकारी खात्याचें असल्याने त्या खात्याने वेळोवेळी आपल्या इच्छेनुरूप धोरण आंखून संस्था रजिस्टर करणें अगर न करणें हें सर्वस्वी त्याचे मनावर अवलंबून असतें. खात्यास असें वाटूं लागलें आहे कीं, कांहीं संस्था या विशिष्ट कारणाकरितांच अस्तित्वांत येत असून त्या पुढें टिकाव धरणार नाहींत. शिवाय, सोसायटी नोंदवूं इच्छिणारे हे साक्षर नाहींत, किंवा त्यांनीं अमुक एक प्रकारचीच सोसायटी नोंदवावी. या कारणांमुळें संस्था नोंदविणें अडचणीचें होऊन बसत आहे व त्याही बरोबर गांवांतील कांहीं विशिष्ट हेतूनें प्रेरित होऊन सोसायटी न स्थापण्याचा प्रयत्नही केला जातो. कांहीं वेळां सहकारी चळवळीसंबंधी जुने आरोप पुढें करण्यांत येऊन गैरसमजही उत्पन्न केले जात आहेत, या सर्वांचा विचार अवश्य व्हावयास पाहिजे. केवळ ज्या वेळीं सहकारी खात्यास नवीन सोसायट्या अस्तित्वांत याव्यात असें वाटतें त्या वेळींच फक्त त्या संस्था नोंदविण्याच्या, व इतर वेळीं नाहीं, असें करून चालणार नाहीं. प्रांतांतील प्रत्येक जिल्ह्यांत सहकारी चळवळीचा प्रसार अगर त्याचें जाळें विणताना मुख्यतः जिल्हा बँक व जिल्हा युनिअन यांच्या मताचा अवश्य विचार व्हावा. त्यास मान देऊन पुढील धोरण आखावें.

## शेतकरी समाजाची अडचणीची परिस्थिती

इलाख्यांतील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी, त्याच्या कर्जाचा बोजा कायद्यानें कमी व्हावा व तों सोइस्कर हप्त्यांनीं फेडता यावा, नवीन कर्जें देतांना शक्य तो पिकाचे तारणावर तीं द्यावीं, शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव यावा, जमिनीचे अनुत्पादक तुकडे थांबवावे, वगैरे हिताचे कायदे सरकारनें केले व कांहीं करण्याचे काम चालू आहे. नित्योपयोगी व विशेषतः शेतकरी यांना त्यांचे उत्पादनास लागणाऱ्या वस्तूंचें वाटप व भाव-नियंत्रण केल्यामुळें शेतकऱ्यांची फारच केविलवाणी स्थिती झाली असून त्या अडचणींतून निभावून नेण्यास अगर त्यांचा विचारपूस करण्यास कोणीच तयार नाहीं. सावकार नियंत्रण कायदा झाला व त्यामुळें व कर्ज विमोचन कायद्यामुळें नवीन कर्जें मिळण्याची जी व्यवस्था झाली ती अपुरी झाली, इतकेच नव्हे तर सहकारी संस्थांचीं कर्जें स्थगित झालीं. या योजना केवळ कायदे करून यशस्वी होणार नाहींत, तर त्यांची अंमलबजावणी करतांना विचारपूर्वक योजना तयार करून त्या पार पाडण्याची नैतिक जबाबदारी सरकारची आहे. सुदैवानें आतां बहुतेक सरकारी अधिकारी आपल्या समाजांतील आहेत. तथापि त्यांना जोंपर्यंत कळकळीचा ओलावा नाहीं, तोंपर्यंत शेतकऱ्याचें दुःख निवारण्याचा प्रश्न बाजूसच रहाणार. या सर्व दृष्टीनें विचार करतांना शेतकी सोसायट्या स्थापन करण्याबरोबर त्या सोसायट्यांची कार्यक्षमता वाढविण्याचाही सरकारनें विचार करावयास पाहिजे. केवळ सहकारी शिक्षणाची सोय करून हा प्रश्न सुटणार नाहीं. आज परिस्थिती अशी आहे कीं, कोणत्याही प्रश्नासंबंधीं सर्व बाजूनें विचार करून तो सोडविण्याचा प्रयत्न होत नसून एखादा विशिष्ट प्रश्न हातीं घेऊन त्यासंबंधींचा कायदा होतो व त्याचा परिणाम म्हणजे त्याच्या अंमलबजावणीसंबंधीं गोंधळ उत्पन्न होऊन अडचणी निर्माण होतात.

## सहकारी चळवळीचें नियोजन व प्रसार

हिंदुस्थान सरकारनें शेतकऱ्यांना कर्ज पुरविण्याची व्यवस्था करण्याकरितां एक व दुसरी सहकारी चळवळीचें नियोजन करण्याकरितां अशा समित्या नेमल्या व त्यांचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. पहिल्या समितीच्या शिफारशीसंबंधीं विचार करून आपल्या प्रांतांत त्यासंबंधीं अंमलबजावणी कशी करावी यासाठीं एक समिती मुंबई सरकारनें नेमली व त्या समितीचा अहवाल तयार झाल्याचें समजतें. या नवीन व्यवस्थेमुळें जे शेतकरी सहकारी चळवळींत आज नाहींत त्यांना त्यांच्या ऐपतीप्रमाणें कर्ज देण्याची व्यवस्था होणार असून हें काम बहुतेक सहकारी संस्थांमार्फत आपल्या इलाख्यांत चालेल असें दिसतें. या योजनेचा परिणाम सहकारी चळवळीवर काय होईल हा एक मोठा विचाराचा प्रश्न आहे. तथापि, शेतकऱ्यांची उत्पादन शक्ती वाढवून त्यांच्या उत्पादित मालास योग्य अशा किंमती कायद्यानें मिळवून देण्याच्या प्रश्नाचा तपशीलवार विचार व त्यासंबंधीं विचारपूर्वक योजना सरकारनें तयार केल्याशिवाय त्याची अंमलबजावणी करणें धोक्याचें होईल. केवळ पाश्चिमात्य देशांतील अडचणी ज्या साधनांनीं सोडवल्या त्या साधनांनीं आपल्या देशांतील अडचणी सोडविण्याचा प्रयत्न यशस्वी होईलच असें नाहीं. तरी आपल्याकडील विशिष्ट वळण, शिक्षण, लोकांमधील जबाबदारीची जाणीव, यांचाही विचार व्हावयास पाहिजे.

## सहकारी कायद्यांतील दुरुस्त्या

प्रांतिक सरकार लवकरच सहकारी कायद्यांत सुधारणा करण्याचा विचार करीत आहे असें समजतें व त्यामध्यें बऱ्याच बाबींचा विचार व्हावयाचा आहे. सहकारी शेतकी पतपेढी मर्यादित जबाबदारीची असावी किंवा अनियमित जबाबदारीची असावी व

सोसायटीचा सभासद होतांना सभासदांच्या जिंदगीपैकीं किती भागा-वर सोसायटीचा बोजा रहावा यासंबंधीं खुलासे करावयाचे असून त्यांची नोंद सरकारी दप्तरीं रहावयाची आहे. आजपर्यंतच्या अनुभवावरून शेतकी सोसायट्यांची परिस्थिति लक्षांत घेतां स्थानिक भांडवल फारसे उत्साहानें जमत नाहीं व त्यामुळें अनियमित जबाबदारीच्या सोसायट्यांची प्रथा पडली. अनियमित जबाबदारीमुळें मोठे शेतकरी या चळवळींत आले नाहींत असा आरोप घेतला जात आहे. त्याकरितां नियमित जबाबदारीच्या संस्था अस्तित्वांत याव्या अशी एक मागणी फार दिवसांपासून आहे. या सोसायट्यांना लागणारें भांडवल जर स्थानिक रूपानें जमणें शक्य असेल तरच नियमित जबाबदारीच्या संस्था चालूं शकतील; नाहीं तर भांडव-लाच्या अभावीं शेतकी पतपेढीची फार अडचण होईल. दुसरा मुद्दा म्हणजे सभासदांच्या जिंदगीवर, तो कर्जदार असो किंवा नसो त्याची जी जिंदगी सांगेल त्यावर, संस्थेचा "बोजा" ठेवावयाचा अशी तरतूद होऊं पहात आहे. हें जर खरें असेल तर तें केव्हांही सहकारी मूलभूत तत्त्वाविरुद्ध होईल व अशानें सहा-जिकच सहकारी चळवळीचा प्रसार थंडावेल अशी सार्थ भीति वाटत आहे. दुसरी एक महत्त्वाची योजना या नवीन कायद्यान्वयें होऊं पहात आहे कीं एका संस्थेचे दोन विभाग करण्याची परवा-नगी कांहीं विशिष्ट परिस्थितींत देण्यांत यावयाची आहे. दुर्दैवाची गोष्ट कीं सहकारी चळवळींत सध्याच इतके मतभेद व भांडणें आहेत कीं त्यांमध्यें या नवीन वादाचा प्रवेश कां व्हावा हें कळत नाहीं. एकादी संस्था मर्यादेपेक्षा जास्त मोठी झाली आहे, किंवा आपल्या सभासदांच्या गरजा भागविण्यास असमर्थ आहे, एवढ्यापुरती सोसायटीची विभागणी फारतर न्याय्य समजतां येईल. परंतु जर कां एकदा अशी विभागणी कायद्यानें सुलभ करून ठेवली तर सध्याची खेडेगांवांची परिस्थिति लक्षांत घेता, अशा विभागण्या मोठ्या प्रमाणावर झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

### समारोप

सहकारी चळवळीचीं तत्त्वें सुंदर आहेत परंतु त्यासाठी करावी लागणारी सेवा व ती करण्याचे मार्ग फारच अडचणींचे आहेत. सहकारी चळवळीच्या प्रचाराचा ओघ शेतकऱ्याचे पर्यंत जाऊन तेथें त्यांच्यामध्यें भिनण्याचा प्रयत्न होत नाहीं. त्यांतच कांहीं विशिष्ट हेतूनें प्रेरित झालेले लोक संस्थांमध्यें असतात. लोकशा-हीच्या सुंदर कल्पना केवळ मनांत ठेवून स्वतःचे मनानें कारभार चालविण्याचा मोह त्यांना आवरत नाहीं व त्यांत सहकारी अधिकारी केवळ मध्यस्थाची भूमिका घेऊन, अगर ज्या वेळीं लक्ष घालून योग्य ती दिशा दाखवून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रसंग असतां दुर्लक्ष करतात व त्यामुळें सहकारी चळवळीची प्रगती फार साव-काश चालू आहे. बिनसरकारी सहकारी चळवळींत स्वार्थत्याग-पूर्वक व सतत काम करणारास दूषण देऊन स्वतःची आत्मप्रौढी मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. स्वतःचे दोष विसरून अगर ते दोष आपले गुण आहेत असें समजून दुसऱ्यास नांवें ठेवण्याच्या विडा कित्येकांनीं उचलेला दिसतो. यामुळें सहकारी चळवळीच्या कार्यकर्त्यांत निराशा उत्पन्न होते. ह्या सर्व कारणांमुळें सहकारी चळवळीची भावी प्रगती कोणत्या दृष्टीनें व्हावी यासंबंधीं विचारवंतांनीं अवश्य विचार करावयास पाहिजे. या चळवळींतील कार्यकर्त्यांची उपेक्षा न करतां त्यांच्या गुणांचा, स्वार्थत्यागाचा व सेवेचा उपयोग केवळ सहकारी चळवळ व त्या चळवळीशीं निगडीत अशा संस्थांच्या कार्यांत करून घ्यावा. केवळ द्वेषबुद्धी व मत्सर यांसाठीं त्यांना कमी लेखूं नये.


## ठेवी घेणें आहेत !

आपला पैसा अत्यंत सुरक्षितपणें आमचेकडे ठेवींमध्यें गुंतवून भरपूर फायदा मिळवा. आकर्षक अटी आणि मुद-तींची सोय, ह्यांमुळें इतरांपेक्षां आमचेकडे ठेवीं ठेवण्यानें ठेवीदारांची चांगलीच सोय होणार आहे.

(१) गेल्या पांच वर्षांत कंपनीस खालील प्रमाणें सर्व साधारण नफा मिळालेला आहे.

| १९४२ | १९४३ | १९४४ | १९४५ | १९४६ |
|---|---|---|---|---|
| रु. २,३७४-७-७ | रु. १४,११४-१४-११ | रु. १९,६२२-२-२ | रु. २०,४३८-१५-२ | रु. ४०,५३८-११-१ |

(२) कंपनीनें गेल्या ५।६ वर्षांत जी अभिनंदनीय प्रगती केली त्याबद्दल व कंपनीच्या एकंदर कार्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब सांगली, कै. दे. भ. न. चिं. केळकर, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रा. ग. त्र्यं. माडखोलकर, मुंबई इलाख्याचे भूतपूर्व गव्हर्नर मि. एच. एफ. नाईट, कै. ने. ना श्रीनिवास शास्त्री, बेळगांव जिल्ह्याचे माजी कलेक्टर मि. शीलड्स व श्री. ईश्वरन, वगैरे प्रसिद्ध व्यक्तींनीं धन्योद्गार काढलेले आहेत.

(३) कंपनीनें नवीन काढलेले शटर्स, डुप्लिकेटर्स व विद्याच्या वस्तू यांना फारच मोठ्या प्रमाणांत मागणी येत असून अवघ्या दोन महिन्यांत कंपनीनें जवळजवळ रु. ५,००,००० च्या ऑर्डर्स स्वीकारल्या आहेत.

कंपनीच्या वाढत्या उत्पादनाच्या दृष्टीनें जास्त भांडव-लाची जरूर असून त्याकरितां कंपनीनें सढळ अटीवर ठेवी घेण्याचें ठरविलें आहे. व्याजाच्या दराकरतां व इतर माहितीकरतां आजच लिहाः—

**दि शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.**

टिळकवाडी–बेळगांव.

# नागरी सहकारी पत-पेढ्यांमध्यें सामान्य माणसाची पत

लेखकः—श्री. एस्. व्ही. संझगिरी बी. कॉम्., सेक्रेटरी, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई.

सामान्य माणसांच्या हितासाह्यासाठीच ' सहकारी चळवळी'चा प्रामुख्यानें पायंडा पडला असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. ज्यांचे उत्पन्नाचे मार्ग मर्यादित नि तुटपुंजे आहेत अशा चार जणांनीं स्वयंस्फूर्तीनें एकत्र यावयाचें, एवढ्याच हेतूनें कीं—आपापल्या शिल्लक टाकलेल्या छोट्या छोट्या रकमांची गंगाजळी करून तिच्या जोरावर एकमेकांचे तात्कालिक पेचप्रसंग टाळतां यावेत. हीच सहकारी चळवळ.

डॉ. जॉन्सन एकदां कुत्सित चेष्टेनें म्हणाले:—"भांडवलदाराच्या प्रतिशांतला एक सॉव्हरिन व्याजयास गरिबांना २४० पेन्स लागतात." गोल्डस्मिथनें उत्तर मोठें छान दिलें होतें; त्या उत्तरांतच सहकारी पतपेढ्यांच्या कार्याचें मर्म सांपडण्यासारखें आहे. गोल्डस्मिथ उत्तरादाखल म्हणाला होता, "मुळींच नव्हे; साफ चुकलांत! २४० गरीब माणसांनीं पेनी पेनी करून सांचवलेल्या शिलकेच्या बेरजेनें होणारा सॉव्हरिन भांडवलदाराच्या सॉव्हरिनहून साफ भिन्न असतो. कारण त्या एका सॉव्हरिन मागें २४० जणांची इच्छाशक्ति, २४० जणांचे डोळे आणि २४० मेंदूंची हालचाल असते." त्या पुण्याईमुळेंच तो दुसऱ्यापेक्षां अधिक मूल्यवान् ठरतो! ह्यावरून भांडवलीशाही पद्धतीपेक्षां सहकारी पद्धतीमध्यें असलेलें स्थैर्य सिद्ध होतें.

### पतपेढ्यांचा मूळ हेतू व त्याची सफलता

आणि एकेकदां आपल्याला म्हणूनच आश्चर्य वाटतें, मोठा प्रश्न पडतो. शहरी सहकारी पतपेढ्या आपला तो मूळ हेतु कितीसा सफळ करीत आहेत? त्यांच्या छत्राखालीं खरोखर माणसाची सहकार पत वाढत आहे कीं, त्याही नांवाच्या सहकार्याचा बुरखा घेऊन त्यांच्या इतर बहिणींप्रमाणेंच निव्वळ सभ्य सावकारीचा धंदा मांडून बसल्या आहेत? खरें म्हणजे, सहकारी पतपेढ्यांच्या कार्याचें महत्त्वमापन त्यांच्या हातुन होणाऱ्या सामाजिक कार्यावरच त्यांच्या घटकांना त्यांच्यापासून होणाऱ्या निरामय आर्थिक साहाय्यावर ठरलें पाहिजे; त्या दरसाल डिव्हिडंड रूपानें किती फायदा आपल्या घटकांना देतात, त्यावरून खास नव्हे!

ह्या दृष्टीनें आमच्या शहरी सहकारी पतपेढ्यांकडे पाहिल्यास आपल्याला काय दिसतें? आपल्या घटकांच्या आयुष्यांतून त्यांनीं इतर सावकारांची हकालपट्टी केली आहे काय? त्यांच्या अस्तित्वानें सामान्य माणसाचा कर्जबाजारीपणा कांहीं अंशानें तरी कमी केला आहे काय? त्यांच्यामुळें लोकांचा जीवनाचा दर्जा वाढला आहे काय? हे प्रश्न सूक्ष्मपणें सोडवले गेले तरच सहकारी पतपेढ्यांच्या कार्याला खरा निकष लावल्यासारखें होईल. किंबहुना, या प्रकारची योग्य ममर्के लावूनच सहकारी पतपेढ्यांची यशस्विता-अयशस्विता ठरवितां येईल.

पण आपण सहकारी पतपेढींचे ताळेबंद पाहिले तर एक गोष्ट प्रामुख्यानें दृष्टीस पडते. ती ही, कीं व्यक्तिगत दिल्या गेलेल्या कर्जाऊ रकमांचे एकूण आंकडे व एकूण संख्या, तुलनात्मकपणें पाहतां, बिनधोक गहाणादि व्यवहारावर दिलेल्या कर्जाऊ रकमांहून फारच कमी असतात.

यावरून आपण असें अनुमान कांढावयाचें काय, कीं या सहकारी पतपेढ्यांच्या घटकांची इतकी सुस्थिति आहे कीं सरकारी कर्जरोखे, सोनें, विमा पॉलिसी, शेअर, इत्यादि वस्तू तारणादाखल सहजासहजीं ते पुढें करूं शकतात? किंवा त्यांना व्यक्तिगत लहान-मोठ्या कर्जाची कधीं आवश्यकताच भासत नाहीं काय? पण असा कयास काढणें हें मूर्खपणाचें ठरेल. प्रत्यक्ष परिस्थितीकडे तो डोळेझांकच होईल. याचा खरा अर्थ एवढाच होतो, कीं जे लोक अत्यंत गरजू आहेत त्यांना पतपेढ्यांकडून व्यवहार म्हणून अपेक्षिली जाणारी वरील प्रकारची बिनधोक तारणें कर्जासाठी पुढें करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें आपली पैशाची गरज भागवण्यासाठीं त्यांना आपल्या सहकारी पेढीच्या कचेरींत जाऊन तोंड वेंगाडणें मरणाहून मरण वाटतें व ते त्या फंदांत असेर पडतच नाहींत. यांतून दुसराहि असा अर्थ निघतो कीं, सहकारी तत्वावर चालणाऱ्या या पतपेढ्याहि अशा गरजू माणसांना कर्जासाठीं कोणी चांगली पत असलेला जामीन राहिल्याशिवाय, अगर त्यांनीं कसलें तरी बिनधोक तारण गहाण म्हणून पुढें केल्याशिवाय, कर्ज द्यायला तयार नसतात. असें जर आहे, तर आणखी एक प्रश्न बाकी उरतो. ही गरजू मंडळी आपली पैशाची अत्यावश्यक गरज भागवतात तरी कशी?...ओघानेंच अनुमान निघतें ... अन्य प्रकारच्या सावकारी पाशांत स्वतःला गुरफटून घेऊन.

### गोंधळी वर्तुळाचें चक्र

आणि येथेंच आपल्याला अत्यंत गंभीर स्वरूपाचा सामाजिक प्रश्न सोडवण्याची पाळी येते. कारण पहा, श्रीयुत गरजूंना आपल्या पदरीं शिल्लक नाहीं, पण तात्कालिक गरज मात्र आहे म्हणून ती भागवण्यासाठी कर्ज उभारावें, अशी इच्छा होते. ते बिचकत बिचकत आपल्या सहकारी पतपेढीच्या कचेरींत जातात. तेथील व्यवस्थापक, "हे गृहस्थ आपल्याकडून उचललेलें जाणारें कर्ज परत फेडतील ना? ...तेवढें त्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे ना?" ह्याचा प्रथम विचार करतात. श्री. गरजूंची मासिक प्राप्ति अगदीं तुटपुंजी असली तर कर्ज देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. मग कसल्यातरी बिनधोक तारणाची आवश्यकता उत्पन्न होते. तेंहि श्री. गरजूंना शक्य नसलें तर 'कोणी जबाबदार नि पतीचा माणूस त्यांना जामीन राहील कां?' या प्रश्नाचा व्यवस्थापक उहापोह करतात. पण हेंहि श्री. गरजूंना अशक्य असलें तर त्यांच्या गरजेची सोय सहकारी पतपेढीकडूनहि होणें अशक्य ठरतें! अर्थात्, श्री. गरजू यांना आपल्या त्या क्षणींच्या अत्यावश्यक गरजा भागविण्यासाठी अखेर कर्जाचे अन्य मार्ग हाताळावे लागतात व त्यांची परिस्थिति त्यांना तसें करायला अखेर भाग पाडतेच.

या सर्व हालचालींतून अर्थ एवढाच निघतो कीं, श्री. गरजू यांनीं आपल्या सहकारी पतपेढींत स्वतःची पत तयार केल्याशिवाय त्यांना आपली आर्थिक गरज तिच्या साह्यानें भागवतां येणें कधींच शक्य नाहीं. म्हणजेच तें एक गरगर फिरणारें गोंधळी वर्तुळ ठरतें 'पत नाहीं तर कर्जाऊ पैसा नाहीं; पैसा नाहीं तर आपली पेढीवर पत नाहीं' आणि हाच तो सामान्य कुटुंबवत्सल संसारी माणसाचा त्याला हरघडीं भेडसावणारा पेचप्रसंग आणि हा पेचप्रसंग सोडविण्यांतच, हें गोंधळी वर्तुळ मोडण्यांतच, सहकारी पतपेढ्यांच्या अस्तित्वाची खरी आवश्यकता सिद्ध होते. खरें म्हणजे हेंच त्यांचें जीवितकार्य!

—सरकार मान्यता पावलेली—

## कोल्हापूर स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

( स्थापना १९३८ )

अधिकृत भांडवल ... २,००,००० रु.
खेळतें भांडवल ... १७,००,००० रु.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ मे. राव. अ. एस. जी. दाभोळकर, B. A., LL. B. प्रेसिडेंट
२ मे. एस्. वाय-रणनवरे, व्यापारी व जमनिदार
३ मे. सरदार बहादूर डी. डी. जाधव, ओ. बी. आय.
४ मे. आर. डी. आडनाईक
५ मे. बापूसाहेब हणमंतराव सुरवशी, इनामदार
६ मे. कृष्णाजी तुकाराम पाटील, जमीनदार
७ मे. गुरुपाद राचया स्वामी
८ मे. बापूराव नानासाहेब नलवडे
९ मे. रावब. डां. पी. सी. पाटील, माजी शिक्षणमंत्री, कोल्हापूर स्टेट.
१० मे. रावसा. एस. एस. शिर्के फातरफेकर, चीफ एक्साइज कमिशनर, कोल्हापूर स्टेट,
११ मे. एन. टी. सरनाईक, मॅनेजिंग डायरेक्टर

सहकारी, शेतकी व बिगर शेतकी सोसायट्यांना लागणाऱ्या कर्जाऊ पैशाचा पुरवठा माफक व्याजाचे दरानें केला जाईल. त्याचप्रमाणें चालू, सेव्हिंग, मुदतबंद ठेवी आकर्षक व्याजाचे दरानें स्विकारल्या जातील.

शिवाय बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. टी. सरनाईक, मॅ. डायरेक्टर

## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना १९३५ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | १,००,९२० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १८,७३२ |
| इतर फंडस् | रु. | १८,६३९ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १२,१९,१३१ |

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

१ श्री. गणेश कोंडो गोडबोले, B. A., LL. B.
२ श्री. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
३ श्री. ल. बा. फडणीस, L. C. P. S.
४ श्री. अ. वि. इनामदार
५ श्री. वा. वि. वाटवे B. A., LL. B.
६ श्री. ग. का. दांडेकर
७ श्री. गो. ग. मराठे, B. A.
८ श्री. ज. वि. करमरकर, सराफ
९ श्री. ग. गो. बिनीवाले

बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. य. लागू, B. A., LL. B.
मॅनेजर.

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,२२,८५० रु. |
| भरलेलें भांडवल | ७४,२७० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | १०,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

करवीर इलाख्यांतील आद्य सहकारी संस्था

## दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कोल्हापूर.

स्थापना सन १९१३ इ.
एकूण खेळतें भांडवल, रु. ५ लाखांचेवर.
अधिकृत भांडवल रु. २ लाख
रिझर्व व इतर फंडस् रु. १,३०,७४४
प्रेसिडेंटः—मे. दिनकरराव गणपतराव शिंदे
व्हा. प्रेसिडेंटः—मे. अण्णाप्पा बाबूराव पाडळकर

— डायरेक्टर्स—

मे. वासुदेव धोंडो हिरवडेकर, मे. आनंदराव शंकरराव जगताप,
मे. शंकरराव बळवंतराव प्रभावळे, मे. ज्ञानदेव हरी सरनाईक,
मे. बाबूराव आप्पाजी सासने, मे. विजयसिंह कृष्णराव हराळे,
मे. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे, मे. पांडुरंग हरिबा इळदकर.

### सुपरवायझिंग कौन्सिल

चेअरमन, मे. गणपतराव लक्ष्मणराव माने, कौन्सिलर, मे. दत्तात्रेय ज्ञानोबा राधाडे; कौन्सिलर, मे. विठ्ठलराव राणोजी व्हटकर; कौन्सिलर, मे. राजाराम नारायण राजाज्ञा.

मुंबई व पुणें बँकांवरील चेक दिले जातात. बाहेरगांवचे चेक्स, हुंड्या व रेल्वे रिसीटस वसूल करून दिल्या जातात.

चालू व सेव्हिंग खात्यावर ठेवी स्वीकारल्या जातात.

आकर्षक दरानें मुदतबंद ठेवीही स्वीकारल्या जातात. ठेवींच्या व्याजाच्या दरासंबंधीं व विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

के. जी. राणे,
मॅनेजर.

दिनकरराव गणपतराव शिंदे
प्रेसिडेंट.

### प्रणेत्यांची दृष्टी व बैठक

सहकारी पतपेढ्यांचा मागला इतिहास व त्यांच्या जन्माची मूळ हकीकत जर आपण दृष्टीखालून घातली तर आपल्याला सामान्य माणसाचा वरील पेंचप्रसंग सोडवण्याचा मार्ग सांपडतो. ही सहकारी पतपेढीची चळवळ मूळ जर्मनींत श्यूल्झ डेलिट्झ व रॅफेइसीन यांच्या कल्पकतेंतून सुरू झाली. तेच त्या चळवळीचे प्रणेते. तेच त्या चळवळीच्या साह्यानें आमच्याकडील 'पठाणी' सावकारी पाशाप्रमाणेंच त्यांच्याकडे असलेल्या 'ज्यू' सावकारी पाशाचें उच्चाटन करण्यांत यशस्वी झाले. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून इटलीमध्यें लुझॅटी यानें ती चळवळ हातीं घेतली व गरिबांच्या पै-पैशाच्या गंगाजळीचा गरजू माणसाची गरज भागविण्यासाठीं त्यानें यशस्वी उपयोग करून दाखवला. गरिबांच्या तुटपुंज्या शिलका एकत्रित करून गरिबांच्याच गरजा भागवण्यासाठीं त्यांची समाजांत पत वाढवण्याची दृष्टि ही या सहकारी पतपेढ्यांच्या प्रणेत्यांची दृष्टि व बैठक.

### पेंचप्रसंगांतून अब्रूनिशी सोडवणूक

मग हाच मूळ हेतू आपणाला इकडे सिद्ध करून दाखवता येणार नाहीं का? आमच्या सहकारी पतपेढ्यांना व्यक्तिगत पतजोखीमावर मोठमोठ्या रकमा कर्जाऊ देणें शक्य नसेल तर लहान लहान कर्जांवर आम्ही आमचें लक्ष केंद्रित करावयास कोणती हरकत आहे? सामान्य संसारी माणसांच्या गरजा सामान्य नि छोट्याशाच असतात. पण त्या वेळच्या वेळीं, बिनबोभाट नि सुलभतेनें भागल्या जाण्यांतच त्यांचें मानसिक समाधान असतें. पर्यायानें त्या योग्य वेळींच त्याला झालेल्या साह्यानें त्याची गरजू परिस्थिति पुढें सुधारूं शकते. आणि ह्याच दृष्टीनें असें सुचवणें अत्यावश्यक व अगत्याचें वाटतें कीं, सहकारी पतपेढ्यांनीं आपल्या कार्याचा सारा भर असल्या छोट्या छोट्या कर्जांच्या गरजा भागवण्यावरच मुख्यतः ठेवला पाहिजे. तसल्या कर्जांना उत्तेजन देणें हेंच त्यांचें प्रधान कार्य. १,००० रु. चें एक कर्ज देण्यापेक्षां १०० रुपयांचीं दहा कर्जें बरीं; अगर पन्नास पन्नास रुपयांचीं वीस कर्जें देणें हें त्यांनीं हजार रुपयांच्या रकमेचें एकच कर्ज देण्यापेक्षां अधिक फलदायी व सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें ठरेल. कारण, त्या हजार रुपयांच्या रकमेच्या परतफेडींतील धोका दहा अगर वीस ठिकाणीं वांटला जाईल. एक व्यक्ति कदाचित् आपल्या जबाबदारीला व पतीला जागणार नाहीं पण साऱ्या वीसच्या वीस व्यक्ती बेइमान ठरणार नाहींत आणि या दृष्टीनें तसला व्यवहारच अधिक सुरक्षित नि हितावह ठरेल. यांत दुसरी एक गोष्ट साध्य होते. लहान लहान रकमांच्या कर्जांसाठीं ऋणकोची पत ठरवणें सोपें जाईलच; पण त्याबरोबरच सामान्य संसारी माणसाची त्याला पडणाऱ्या लहानसहान आर्थिक पेंचप्रसंगांतून अब्रूनिशी सोडवणूक केल्याचें त्या पेढीला श्रेय मिळेल. त्यामुळेंच गरजेच्या वेळीं पठाणी पाशाकडे गुपचुप वळणारे त्याचे पाय तशी खात्री असल्यावर एकमेव हितकर्त्या मैत्रीचें आपलें स्थान या दृष्टीनें आपल्या सहकारी पतपेढीच्या कचेरीकडेच प्रथम वळतील.

### सामान्य तात्कालिक गरजा

असल्या कुटुंबवत्सल, संसारी, सामान्य माणसाच्या या आर्थिक गरजा—घराचें भाडें, विम्याचा हप्ता, मुला-मुलींच्या शाळा-कॉलेजांची अगर परीक्षांची आवश्यक फी, आजारासाठीं झालेलें डॉक्टरचें बिल, असल्या स्वरूपाच्याच आणि बहुंशीं तात्कालिक गरजा असतात ना? त्याच्या चालू मासिक प्राप्तींतून त्याला त्या झटकन् भागवतां येणें अशक्य असतें. पैसे तात्काळ देणें तर अत्यावश्यक असतें. अशा वेळींच ही आर्थिक कर्जाची कल्पना त्याच्या डोक्यांत येते. अशा वेळीं सहकारी पतपेढीच्या दारीं तो आला तर त्याला तें कर्ज मिळून त्याची त्या प्रसंगांतून तात्काळ सोडवणूक व्हावयास हवी. ती सुद्धां रीतसर व मामुली व्याजावर, परतफेडीसाठीं सोयीचे मासिक हप्ते ठरवून त्याच्या हातीं ती कर्जाची रकम पडली पाहिजे.

### सहकारी पतपेढ्यांच्या उपयुक्ततेचें मर्म

चालू घटकेला असे गरजू संसारी, बँकांकडे कां येत नाहींत? पुष्कळदां हा प्रश्न अब्रूदार माणसाला खाजगी स्वरूपाचा नि गुप्त राखण्यासारखा वाटतो. त्याच्या त्या परिस्थितीचा बाहेर गवगवा व्हावा अशी त्याला मुळींच इच्छा नसते. खाजगी सावकार किंबहुना पठाण सावकार (व्याजांत त्याला पुरे मारत असले तरी) सुरवातीस त्याच्या या अपेक्षा पुऱ्या करतात. मग या बाबतींत सर्वांगीण विचार करून सहकारी पतपेढ्यांनीं सामान्यांच्या या सर्व गरजा व अपेक्षा भागवण्याचा प्रामाणिक व मनःपूर्वक प्रयत्न करणें हें त्यांचें आद्य कर्तव्यच नव्हे काय? त्यांच्या कर्जाचें तें गुपित कायम ठेवून त्यांच्या अब्रूला बाह्यात्कारी जरा देखील धक्का पोहोंचणार नाहीं अशा पद्धतीनें त्यांना त्या त्या वेळीं त्यांच्या आवश्यक संसारी हालचालीसाठी व गरजांसाठी हवें तें कर्ज सुलभपणें व सवलतीनें पुरविण्याचें काम त्यांनीं करावयाचें नाहीं तर दुसऱ्या कोणी? सामान्यांच्या तात्कालिक कर्जबाजारीपणाची वाच्यता न होतां त्यांना वेळींच रकम मिळेल अशा धडपड करीत राहण्याचेंच मुख्य ध्येय समोर ठेवूनच सहकारी पतपेढ्यांनीं आपला व्याप केला पाहिजे, वाढवला पाहिजे; तेंच त्यांच्या जीवनाचें इतिकर्तव्य. त्यांत दुसरा एक सामाजिक फायदाहि दडलेला असतो. त्यामुळें या पेढ्यांना कधींच शक्य होणार नाहीं अशा माणसाला लहान लहान रकमा शिलकेंत टाकण्याला उत्तेजन दिल्याचेंहि श्रेय मिळतें. कर्ज घेतलेल्याला तें फेडण्यासाठी अगर कर्जांत न शिरणाऱ्याला थोडे थोडे पैसे वक्तशीर शिलक टाकून त्या सवयीनें सव्याज वाढलेल्या रकमेचा फायदा मिळवून देण्यासाठी सहकारी पतपेढ्यांनीं नवीन नवीन, लहान लहान बचतीच्या योजना आंखल्या पाहिजेत. या पद्धतीनेंच सामान्य संसारी माणसाला आपल्या सहकारी पतपेढ्यांच्या आसऱ्याचा धीर वाटेल. जरूरीच्या वेळीं लहानसान कर्ज सुलभपणें मिळण्याची व पुन्हा सोयीवारपणें त्याची परतफेड आपण हप्त्यानें करूं शकण्याची शक्यता आणि नको असेल त्यावेळीं थोडी थोडी बचत करून पैसा शिलकेंत टाकून तो वाढवण्याची व त्याबरोबरच आपली बाजारांतील व्यक्तिगत पत वाढवण्याची ही दुहेरी सोय सहकारी पतपेढ्यांनीं मिळवून देऊं केली तर सामान्य, संसारी, कुटुंबवत्सल माणसाचें आयुष्य आजच्यापेक्षा अधिक समाधानी होईल. त्याला आपला जीवनाचा दर्जा थोडा वाढवतां येईल व त्याची समाजांतली पत उत्तरोत्तर वाढत जाईल. त्यांनीं सामान्य माणसाची पत अशी वाढवली तरच असल्या सहकारी पतपेढ्यांच्या अस्तित्वांतील तथ्य सिद्ध होणार; नाहीं तर त्या असून नसून सारख्याच. केवळ सावकारी धंदा करणाऱ्या सहकारी पतपेढ्या काय कामाच्या?

---

नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक, म्हणजेच

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

स्थापना सन १९१०

हेड ऑफिसः—नगर शहर

शाखा-१ संगमनेर (जि. नगर) २ भिंगार (ता. नगर)

३ बेलापूर रोड-श्रीरामपूर (जि. नगर)

४ कोपरगांव (जि. नगर)

भांडवल

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ४,००,००० |
| (२) | भरलेलें भांडवल ... | रु. | १,८९,४३० |
| (३) | रिझर्व्ह फंड ... | रु. | १,८१,५९० |
| (४) | इतर फंड ... | रु. | १,५५,८७६ |
| (५) | चालू ठेवी ... | रु. | ३७,१६,०४० |
| (६) | मुदत ठेवी ... | रु. | १०,७५,४०५ |
| (७) | सेव्हिंग्ज ठेवी ... | रु. | ७,९५,२६३ |
| (८) | खेळतें भांडवल ... | रु. | ६१,३३,२३५ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जे दिली जातात. तसेंच चेक, हुंडी, सरकारी रोख्यांची खरेदी विक्री, वगैरेचा सर्व व्यवहार केला जातो.

दागदागिने, मौल्यवान वस्तु व कागदपत्र सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टची योजना जिल्ह्यांत फक्त या बँकेंतच आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा. जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांकडे लिहा.

तारीख १८-९-४७ मो. कुं. फिरोदिया, चेअरमन

---

## बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(स्थापना १९०६)

| | | |
|---|---|---|
| शेअरचें वसूल भांडवल | रु. | ७२,२१० |
| रिझर्व व इतर फंड | रु. | ६७,१०३ |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. | १२,७९,००० |
| कर्जाऊ दिलेली रक्कम | रु. | ३,६५,००० |
| रोख्यामध्यें व बँकांतील शिल्लक | रु. | १०,४१,००० |

सतत ४१ वर्षें 'अ' वर्गवारी दाखल असलेली ही बँक ठेवीदारांचा विश्वास व सभासदांचें सहकार्य ह्यांचे बळावर आगामी काळामध्यें जनतेची सेवा अधिक प्रमाणांत करण्याची उमेद बाळगते.

**ही दिवाळी सर्वांस आनंदाची जावो.**

र. प. पटवर्धन — मॅनेजर
गोविंद रघुनाथ काळे — चेअरमन

---

फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली

## श्रीलक्ष्मी सं. को. बँक लि., फलटण

(स्थापना १-२-१९२६)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | १,४९,७५० |
| वसूल भांडवल | रु. | ६१,३१० |
| फंड | रु. | १,३०,९२८ |
| ठेवी | रु. | ३४,६८,८२३ |
| खेळतें भांडवल | रु. | ३६,६१,०६१ |

ठेवी-चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

कर्ज-जोडलेल्या सहकारी पतपेढ्या व बँकेचे भागीदार यांना सर्व प्रकारच्या तारणावर कर्ज, कॅश केडीट, ओव्हर ड्राफ्ट, वगैरे मिळतो.

विमा-वेस्टर्न इंडिया, नेपच्युन, एशियन व कॉमनवेल्थ या कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्यांत येतात.


इतर-सर्व प्रकारचे बँकांचे व्यवहार होतात. ही बँक फलटण दरबार, दि फलटण शुगर वर्क्स लि. व सर्व स्थानिक संस्था यांची बँकर्स आहे.

**ही दीपावली**

बँकेच्या सर्व हितचिंतकांना भाग्याची व आनंदाची होवो.

श्री. ह. तळवलकर, मॅनेजर.
वि. शं. झिरपे, वकील, चेअरमन.

---



## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३०-९-१९४७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. | ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. | ३,९७,९३० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. | २,२१,१०० |
| ठेवी ... | रु. | ७१,४१,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. | ७९,१८,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

सब-ऑफिसः —दादर— (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन
एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

# पुरवठ्यामध्यें वाढ कधीं होणार ?

## धान्याची निर्मिती व औद्योगिक उत्पादन ह्यांच्या परिस्थितीचें पृथःकरण

लेखकः—श्री. शंकर ज. जोशी, बी. कॉम., अलवाये ( त्रावणकोर )

आज उत्पादन, अधिक उत्पादन, जास्तीत जास्त उत्पादन, आपणांस हवें आहे.

युद्धोत्तर, उत्पादन वाढून सुबत्ता नि सुस्थिति येईल अशी आशा वाटत होती. अनेक कारणांनीं प्रत्यक्षांत मात्र उत्पादन घटत चाललें आहे. सर्वत्र कुरकुळी वातावरण आहे. त्यांतच अंतर्गत यादवींची भर पडली आहे.

महागाई मात्र वाढत आहे. चढीच्या किंमतींना सरकारी कृपा लाभत आहे. काळया बाजारांत गेल्याखेरीज सामान्य जीवन-वस्तूही मिळणें अशक्यप्राय झालें आहे.

अन्न, वस्त्र नि आडोसा या किमान गरजाही पुऱ्या करणें कष्टाचें, जिकिरीचें झालें आहे. सहन करण्याच्या मनाच्या नि शरीराच्या शक्ति अमर्याद नाहींत. परिस्थिति सुधारण्याची तातडतोब व्यवस्था न झाली, तर वाढती निराशा नि असहाय्यता सारें समाजजीवन उध्वस्त करून टाकील अशी भीति सर चिंतामणराव देशमूख यांनीं व्यक्त केली आहे.

नित्य व्यवहाराला लागणाऱ्या वस्तूंची टंचाई अशीच कांहीं काळ राहण्याची शक्यता असल्यानें वाटप व किंमत-नियंत्रण—सर्वंकष नियंत्रण—आवश्यक आहे; नियंत्रण यशस्वी होण्याच्या दृष्टीनें अनुकूल लोकमत तयार व्हावयास पाहिजे, सरकारी खात्यांतील अनिष्ट पद्धति बंद झाल्या पाहिजेत, असें स्पष्ट मत कमॉडिटीज प्राइसेस बोर्डानें दिलें आहे. मध्यवर्ती सरकारनें बोर्डाच्या शिफारसीस मान न देतां कापडाच्या किंमतींत वाढ करण्याचें मान्य केल्याचें प्रसिद्ध झालें असून बोर्डाच्या सभासदत्वाचा राजिनामा प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं दिल्याचेंही वृत्त आलें आहे!

### शेतीची निराशाजनक परिस्थिति

सहजतेनें पिकें काढता येण्याजोगी असलेली देशांतील बहुतेक जमीन शेतीखाली आहे. म्हणजे, शेतीकरितां आणखी जमीन मिळण्याची शक्यता फार नाहीं. तसेंच, जमिनीचा कस तातडतोब वाढण्यासारखा नाहीं; याचाच अर्थ दर एकरी उत्पन्न साधारणतः वाढण्यासारखे नाहीं. पाऊस-पाण्यावर आपला ताबा नाहीं. खोती-जमीनदारी नष्ट करून कसणाऱ्याची जमीन झाल्यानें उत्पादन विशेष वाढेल असें वाटत नाहीं. जोपर्यंत सामुदायिक पद्धतीनें शेती होत नाहीं, शेतीची आधुनिक साधनें व खतें मोठ्या प्रमाणावर वापरली जात नाहींत, सरकारी खातीं नवीन जबाबदाऱ्या घेऊन पार पाडण्याइतकीं कार्यक्षम झालेली नाहींत, तोंपर्यंत असलेल्या व्यवस्था मोडून उत्पन्नांत भर पडण्याची शक्यता निदान आजच्या परिस्थितींत तरी वाटत नाहीं. आणि प्रश्न मात्र आहे अत्यंत निकडीचा!

हिंदुस्थानांत पिकणारें धान्य कधींच पुरवठ्याचें नव्हतें. पूर्वीच्या मोठ्या प्रमाणावर धान्याची आयात होण्याची शक्यता आज अनेक कारणांनीं कमी कमी होत आहे. परिस्थिति आशाजनक खासच नाहीं. अशा स्थितींत जनतेच्या सहकार्यानें, विश्वासानें दिवस संभाळून नेणें आवश्यक आहे.

धान्यावर सरकारी नियंत्रण येऊन आतां पुरेशीं वर्षें झालीं आहेत. जनतेच्या विचारांची व पद्धतींची माहिती सरकारला आतां चांगली झालेली आहे. तसेंच खरेदी, साठवण व विक्रींतील गुण-दोषांची जाणिवही सरकारला आहे. तेव्हां, मिळालेला अनुभव जमाखातीं घेऊन यापुढील कठीण काळांत सुसूत्रतेनें योग्य कार्य होण्यास अडचण येणार नाहीं अशी आशा करूं या.

### उद्योगधंद्यांचे बाबत आशा

उद्योगधंद्यांची स्थिति याहून थोडी निराळी म्हणजे आशाजनक वाटते. युद्धकाळांत रात्रंदिवस काम केल्यानें यंत्रसामुग्रीची विलक्षण झिज झाली हें खरें. याच कारणाकरितां पूर्वीच्या कार्यक्षमतेनें तीं यंत्रें काम करीत नाहींत हें मान्य करावयास हवें. तथापि, गेल्या वर्षांतील उत्पादन कमी कां झालें याचीं कारणें शोधूं पहातां जुन्या यंत्रांच्या जोडीला इतर अनेक अडचणी असल्याचे ध्यानांत येतें. उद्योगपति टाटा यांनीं कामगारांचें अडवणुकीचें धोरण व त्याबाबत सरकारची पडखाऊ वृत्ति याबाबत तक्रार केली असली तरी त्यांतुन आशेचा सूर निघतो, तो असा कीं, कामगारांच्या सहकार्यानें उत्पादन निश्चयानें टिकेल, वाढेल!

उद्योगधंद्यांबाबतचें करविषयक सरकारी धोरण सहानुभूतीचें नाहींच नाहीं; उलट आज अशी स्थिति निर्माण झाली आहे कीं, टाटासारख्या प्रथितयश कारखानदारांना त्यांच्या आगगाडीच्या इंजिनांच्या कंपनीकरितां लागणारें ५ कोटींचें भांडवल आज विकावयास काढावें कीं नाहीं, खपेल कीं नाहीं, असा प्रश्न पडला आहे. भांडवलाचे अभावीं उद्योगधंदे चालावेत कसे? रुजावेत, वाढावेत कसे? देशांत उद्योगधंदे यशस्वीपणें चालावयाचे तर त्याबाबतचें सरकारचें धोरण निश्चित व सहानुभूतीचें असावयास पाहिजे; सरकारी कृति उपकारक, उत्तेजन देणारी हवी. आज निकड आहे प्रत्यक्ष कार्याची; योजना नि विचार सरकार दप्तरी पुष्कळ आहेत.

### राष्ट्रीयीकरणानें उत्पादन वाढेल काय ?

आतांपर्यंतचा अनुभव जमा खातीं देतल्यास आजच्या परिस्थितींत उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण केल्यानें उत्पादनांत भर पडण्याची शक्यता वाटत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें खतें तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरून बिहारमधील सिंघरी ही जागाही मुक्रर झाली. मला वाटतें, ही युद्धापूर्वीची किंवा त्या सुमाराची गोष्ट आहे. पण १९५१ पर्यंत माल हातीं येईल असें दिसत नाहीं. त्याचें उलट श्री. शेषशायींच्या नेतृत्त्वाखाली दोन-तीन वर्षांपूर्वी त्रावणकोर संस्थानांतील अलवाये येथें सुरू झालेल्या कारखान्यांत आज अमोनिअम सल्फेट व सल्फ्युरिक ॲसीड तयार होऊं लागल्याला दोन एक महिने झालेही. ब्रिटनमधील मजूर सरकारनें लोखंड-पोलादाच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करावयाचें ठरवूनही कारणाकारणानें तसें अजूनपर्यंत केलेलें नाहीं. सद्यःस्थितींत उत्पादन वाढण्यास धंद्यांचें राष्ट्रीयीकरण हा अचूक तोडगा नसल्याचेंच यावरून नाहीं कां दिसत ?

रुपयाची किंमत चार-आठ आण्यांवर आल्यामुळें वाढलेल्या वेतनांतूनही जीवनगरजा भागत नाहींत, अशी स्थिति आहे. अशा परिस्थितींत कामगारांनीं अधिक वेतनाची मागणी नाहीं करायची तर काय करावयाचें ? तथापि, उत्पादनांत अडथळे आणणें किंवा तें थांबविणें यानें महागाईचा प्रश्न न सुटतां अधिकच अवघड होतो ह




बेडेकरचे
मसाले, लोणची आणि पापड यांचा आपण आपले जेवणांत व स्वैपाकांत समावेश करा.

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
दुकानें:—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परेळ, मुंबई.
पुणें:—एजंट द. ना. हेजीब, शुक्रवार पेठ

वामन गणेश हरचेकर




चालू दीपावली व नवीन वर्ष
आमच्या सर्व देशबांधवांना सुखाचें जावो !

# गोवर्धन डेअरी फार्म्स लि.
गोवर्धनवाडी, पुणें १

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
१ सरदार के. आर. विंचूरकर, बी. ए., एलएल. बी., जहागिरदार, पुणें ( चेअरमन )
२ सरदार व्ही. डी. पानसे, जहागिरदार, पुणें.
३ श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई.
४ श्री. एस. एस. निसळ, जहागिरदार व बँकर, अहमदनगर.
५ श्री. एस. जी. लोंबार, मर्चंट, पुणें.
६ सरदार अमरसिंहराव कदम, पुणें.
७ रावसाहेब वाय. डी. खोले, पुणें. ( स्पेशल डायरेक्टर )
८ श्री. व्ही. एस. सोलापूरकर, लँडलॉर्ड, पुणें. ( अधिकारपरत्वें )

—मॅनेजिंग एजंटस—
★ मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड. ★

## कंपनीचीं वैशिष्टयें
★ कंपनीनें आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर वगैरे आणविलीं असून तिच्या सहाय्यानें शेतीचीं सर्व कामें करून घेणार आहेत.
★ कंपनीनें बाजारभाव सुमारें १ लक्ष रु. असलेली जमीन माफक किंमतीस मिळविली आहे.
★ कंपनीच्या डेअरीमध्यें फक्त गाई — सिंधी गाईच — आहेत.
★ पहिल्याच वर्षी कंपनीनें ६% व ३% डिव्हिडंड दिलें आहे.

शेअर्स विक्रीस काढलेले आहेत.
डिपॉझिट रकमा स्वीकारल्या जातात.

| व्याजाचे दर— | १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें |
|---|---|---|---|
| | ४% | ५% | ६% |

★ कंपनीचा ट्रॅक्टर भाड्यानें मिळेल ★
विशेष माहिती समक्ष.
मॅनेजिंग एजंटस

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A by an Order from the Examiner of Capital Issues, Finance Department New Delhi of which a complete copy is open to public inspection at the Head Office of the Company.

It must be distinctly understood that in giving the consent, the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any scheme or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

# धी लोकमान्य मिल्स बार्शी लि.

अधिकृत भांडवल रु. ३०,००,०००
विक्रीस काढलेले शेअर्स १२,८००

*प्रत्येकीं रुपये १२५ चे व प्रत्येक शेअरला अर्जासोबत डिपॉझिट रु. १०/- व अलॉटमेंट नंतर रु. १५/- व पुढें दोन महिन्यापेक्षां कमी नाहीं अशा अंतरानें रु. २० चा हप्ता याप्रमाणें भरावयाचे.*

*पूर्वीच्या शेअर होल्डरांस प्रत्येक चार शेअर मागें पांच शेअर या प्रमाणांत शेअर घेणेंचा हक्क आहे व तो त्यांनीं तारीख ३०-११-४७ पर्यंत मिल कंपनीस कळवावा. वरीलप्रमाणें अग्र हक्कानें न घेतलेले शेअर्स म. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ठरवितील त्या प्रमाणांत स्वीकारले जातील.*

शेअर अर्जांचे फॉर्म कंपनीच्या ऑफिसांत मिळतील.

भगवंत पंढरीनाथ सुलाखे
मॅनेजिंग एजन्ट
फॉर सुलाखे आणि कंपनी.

बार्शी,
ता. १३।९।४७

जाणून भाई अच्युतराव पटवर्धन यांनीं काम चालू ठेवण्याचा सल्ला कामगारांना दिला आहे.

अथावत् यंत्रसामुग्री मिळाल्यास औद्योगिक उत्पादन सचित वाढेल. तथापि अनेक कारणांनीं परदेशी यंत्रें मिळण्यास वेळ लागत आहे. याबाबतची रास्त तक्रार सध्या इंग्लंडमध्यें असलेले श्री. एस्. एम्. डहाणूकर यांनीं केली आहे.

हुंडणावळीचा तुटपुंजेपणा, हाहि एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याच करितां जास्तींत जास्त उत्पादन करून निर्गत वाढविली पाहिजे असा व्यापारमंत्री श्री. भाभा यांनीं आदेश दिला आहे.

परदेशी यंत्रें लवकर मिळण्याबाबत वैयक्तिक प्रयत्न पुरे पडणारे नाहींत. त्याबाबत सरकारनें आग्रह धरून प्रश्न सोडविला पाहिजे.

तसेंच, देशांत तयार न होणारीं रसायनें, कच्चा माल, यंत्रांचे वारंवार लागणारे भाग, वगैरेंची आयात करण्याची योजना तातडीनें होणें आवश्यक आहे.

युद्ध संपून दोन वर्षें झालीं तरी अजूनहि रेल्वे-वहातुकीची परिस्थिती सुधारलेली नाहीं. कारखान्यांना लागणारा कच्चा माल, कोळसा, तेल, तसेंच तयार मालाचा बटवडा करण्याकरितां जरूर ती वहातुकीची सोय आजही नाहीं. मालमसाला वेळेवर न आल्यामुळें उत्पादन चालू ठेवण्यांत अडचणी येत आहेत; तर तयार माल वहातुकीच्या अभावीं हलत नाहीं; तो कारखान्यांत पडून असल्याचें मला माहीत आहे. वहातुकीच्या सोई आतां ताबडतोब झाल्याच पाहिजेत.

### एकसूत्रीपणा व सहकार्य

सरकारकडून या सर्व गोष्टींची मागणी करतांना कारखानदारांवर जबाबदारी येते, ती अशी कीं सरकारशीं सहकार करून उत्पादनाचें पुरेपूर माप त्याच्या पदरीं टाकलें पाहिजे. या व्यवस्थेंत काळ्या बाजाराच्या विचारालाही स्थान नाहीं.

गिरणी मालक म्हणतात, कीं कामगारांच्या अडवणुकीच्या धोरणामुळें कापड निर्मितींत घट आली, तर सरकारनें किंमत–वाढ देण्याचें नाकारल्याकारणानें गिरणी मालक उत्पादन पाडून सरकारला पेचांत आणीत आहेत असा कामगारांचा दावा आहे. या स्थितींतहि विशिष्ट पद्धतीनें काम केल्यास कापड–उत्पादनांत किमान ३० टक्के तरी वाढ होईल असें अर्थमंत्री श्री. शण्मुखम् चेट्टी (स्वतः ते गिरणी मालक आहेत) यांनीं नुकतेंच सांगितलें.

देशांतील उत्पादन वाढविण्याबाबत एकसूत्री प्रयत्न होणें निकडीचें वाटतें. मतामतांचा गलबला व वाढती राजकीय जबाबदारी लक्षांत घेतां या कामाकरितां मध्यवर्ती सरकारांत स्वतंत्र उत्पादन-मंत्री असणें जरूरीचें आहे. ब्रिटनमध्यें अशा स्वरूपाची जबाबदारी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांचेवर नुकतीच टाकण्यांत आली आहे.

आपली आर्थिक परिस्थिति ब्रिटन इतकीच कठीण आहे. वाढत्या किंमती, खालावत चाललेलें राहणीचें मान, अन्नान्न दशा, वाढती बेकारी नि काळा बाजार हे समाजशत्रू आहेत. त्यांची हकालपट्टी करावयाची तर जनतेला विश्वासांत घेऊन आर्थिक व्यवहारांचें नियोजन व त्यांवर नियंत्रणें सरकारनें घातलीं पाहिजेत. त्यांची अंमलबजावणी काटेकोर वृत्तीनें केली पाहिजे. नियंत्रणांचा उद्देश कार्यांत अडचणी उपस्थित करणें हा नसून कार्याला सुसूत्रता येण्याकरितां व्यवस्था करणें हा होय. ज्या पद्धतीनें नियंत्रणांची अंमलबजावणी करण्यांत येते व ज्या पद्धतीनें जनता त्यांचेकडे पहाते, त्यावर नियंत्रण पद्धतीचें यशापयश अवलंबून असतें

मागणीच्या तोडीनें उत्पादन होऊं लागलें कीं किंमती स्थिरावतात. संपत्तिनिर्मितीनंतरचा प्रश्न संपत्तीच्या विभागणीचा. तो आज निकडीचा नाहीं. "मालाच्या राशी दिसत असून त्या विकत घेण्यास पैसा नाहीं" ही स्थिति खासच स्पृहणीय नाहीं; पण त्याहीपेक्षां "पैशाचा सुकाळ नि मालाचा तुटवडा" ही आजची स्थिति त्याहूनही अधिक दुःखद आहे. यांतून मार्ग काढावयाचा तर सरकार–जनतेचा सहकार पाहिजे, सर्वंकष नियंत्रण पाहिजे, निश्चित नियोजन पाहिजे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे ठरविलेला कार्यक्रम पार पाडण्यास खंबीर मनाची नि पोलादी मनगटाची मंडळी हवीत.

---

### बँक ऑफ इंग्लंडच्या संग्रहांतील कांहीं नमुनेदार नोटा

बँक ऑफ इंग्लंडच्या, दुर्मिळ नोटांचे संग्रहालयांत कांहीं अजब चलनी नोटा आहेत. तेथें ५ पौंडांची एक नोट ठेवलेली आहे, तिची मालकी १८५६ सालीं केप टाऊनमधील जहाजांच्या एक कप्तानाकडे होती. ती नोट त्याचे हातीं पडली, तेव्हां तिचेवर कांहीं तरी अस्पष्ट लिखाण त्यास आढळलें. बारकाईनें पहातां, तें लिखाण म्हणजे उत्तर आफ्रिकेंतील एका स्थानिक संस्थानिकाचे ताब्यांत अडकलेल्या एका खलाशाची "मला सोडवा हो !" अशी निर्वाणीची विनंती होती ! ज्याचे हातीं नोट पडेल, त्यानें वरील विनंती खलाशाच्या इंग्लंडमधील नातेवाईकांस पोंचवावी, असें त्या नोटेवर लिहिलेलें होतें. कप्तानानें नोट इंग्लंडकडे धाडली व पुढें त्या खलाशाची सुटका करण्यांत आली.

बँक ऑफ इंग्लंडच्या संग्रहांत प्रत्येकीं एका पेनीच्या नोटेपासून १० लक्ष पौंडांच्या नोटा आहेत. एका पेनीची नोट चलन म्हणून व्यवहारांत कधींच खेळली नाहीं परंतु १८०० सालीं ती छापण्यांत आली होती. १० लक्ष पौंडांच्या चार नोटा आहेत त्यांपैकी एकीवर बँक ऑफ इंग्लंडची मालकी असून, बाकीच्या तीन इतर तीन बँकांच्या मालकीच्या आहेत. ह्या नोटा चोरीस गेल्या तरी त्यांची मोड कोणीच देणार नाहीं, हें उघड आहे.

बँक ऑफ इंग्लंडनें बनावट नोटांचा संग्रह केला आहे, त्यांतील १० पौंडांची एक नोट गमतीदार आहे. एका कारकुनानें ती बनावट असल्याचें ओळखलें. "ही नोट बनावट आहे; जो ती घेईल, तो महामूर्ख आहे !" असें वाक्य नोटेवर अगदी बारीक अक्षरांत लिहिलेलें आहे. प्रकरण कोर्टांत गेलें तेव्हां, "मी केवळ करमणुकीसाठीं ही नोट तयार केली. नोट बनावट असल्याचें नोटेवरच लिहिलें आहे कीं !" असें आरोपीनें सांगितलें.

कांहीं काळापूर्वी बँकेनें नवीन नोटा काढल्या. सात महिन्यांनंतर लक्षांत आलें, कीं नोटेवर 'बँक ऑफ इंग्लंड' ऐवजीं 'बँक ऑफ आयर्लंड' छापलें आहे ! हें कसें घडलें, ह्याबद्दल कसून चौकशी झाली. परंतु कांहींच निष्पन्न झालें नाहीं आणि ह्या नोटांस अखेर कपाटांत ठेवण्याची पाळी आली.

–सर्व प्रांतांतील–
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि., पुणें.

( शेड्यूल्ड बँक )

हेड ऑफिसः–प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

—मुंबई शाखा—

इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,०८,१९५ |
| खेळतें भांडवल | रु. ६५,००,००० |

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. — श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

गों. घों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर — चिं. त्रिं. चितळे, मॅ. डायरेक्टर



# दि कमर्शियल बँक लि.

—कोल्हापूर—

स्थापना १९३६

हेड ऑफिस—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

शाखा—(१) पापाची तिकटी, कोल्हापूर
(२) इचलकरंजी
(३) हुपरी

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,०००-०-० |
| विक्रीस काढलेलें | रु. ३,००,०००-०-० |
| वसूल झालेलें | रु. १,५०,०००-०-० |
| रिझर्व व इतर फंडस | रु. १,०१,७५०-०-० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ३५,००,००० चे वर |

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

—भेटा अगर लिहा—

बी. डी. मगदूम, अकौंटंट — गणपतराव लक्ष्मणराव साळोखे, मॅनेजिंग डायरेक्टर



( मिरज येथें १९१९ साली स्थापन झालेली : भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

( स्थापना : १९२९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,००,०००चे वर |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८५,००,०००चे वर |

चेअरमन

**रावसा. वि. पां. बेडेकर,**
बी. एस्सी., बी. ई.

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ मोडनिंब, कुर्डूवाडी व पंढरपूर

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

के. डी. शिराळकर
मॅनेजर.



# दि बँक ऑफ औंध लि.

( औंध संस्थानांत स्थापन झालेली, भागीदारांची जबाबदारी नियमित असलेली )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... रु. ५,००,००० |
| मागणी केलेलें भांडवल | ... रु. ३,२२,९२० |
| भरणा झालेलें भांडवल | ... रु. १,६१,४६० |
| खेळतें भांडवल ... | ... रु. २०,००,००० चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... रु. ७३,००० चे वर |

रजिस्टर्ड ऑफिसः–औंध

—मुख्य बिझिनेस ऑफिसः—

१११-११२ सदाशिव पेठ, सातारा शहर.

—शाखा—

आटपाडी, भवानी-नगर व ओगलेवाडी.

★ चालू, मुदतीच्या व सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.
★ तीन वर्षें मुदतीचीं कॅश सर्टिफिकेटस विकत मिळतात.
★ योग्य तारणावर कॅश क्रेडिटस, कर्जें व ओव्हर ड्राफ्टस दिले जातात.
★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठीं समक्ष अगर पत्रद्वारें चौकशी करा.

वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

# हिंदुस्थानांतील अन्नधान्याचा प्रश्न कसा सुटेल?

## विविध आघाडींवर चिकाटीच्या प्रयत्नांची आवश्यकता

लेः– श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, बी. ए., एलएल. बी., पुणें

स्वतंत्र हिंदुस्थानापुढें अनेक तातडीचे प्रश्न आज उत्पन्न झाले आहेत. त्या सर्व प्रश्नांमध्यें अंतर्गत अशांतता व अन्नधान्याचा तुटवडा या दोन प्रश्नांनीं सध्याच्या राष्ट्रीय सत्ताधाऱ्यांना बेचैन करून सोडलें आहे. सर्वसाधारण जनता तर आज दंग्याधोप्यापेक्षांही अन्नधान्याच्या प्रश्नानें सतावून गेलेली दिसत आहे. गेल्या ४–५ वर्षांच्या रेशनिंगच्या अनुभवानें जनतेची दृष्टि या विषयावर केंद्रित झालेली असून सध्याच्या सरकारला ज्या प्रमाणांत हा गुंताडा सोडविता येईल, त्या प्रमाणांत जनता त्याच्या कारकीर्दीच्या यशस्वितेचें मोजमाप करणार आहे.

सर्वसाधारण जनतेपुढें एक-दोन प्रश्न या विषयासंबंधी विचार करतांना प्रामुख्यानें पुढें उभे राहातात. एक तर, युद्धापूर्वी जर हिंदुस्थानांतील बहुसंख्य जनतेला पुरेसें व चांगलें धान्य सहजासहजीं मिळत होतें तर तें आतां युद्ध संपून दोन वर्षे झालीं असतांनाही कां मिळूं नये? ज्या अन्नधान्याच्या तुटवड्याचा एवढा गाजावाजा करण्यांत येतो, तो तुटवडा आत्तांच एकदम एवढ्या मोठ्या प्रमाणावर कां भासूं लागला?

### युद्धामुळें अडचणींत भर

या दोन्ही प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी आपणास एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे, ती ही कीं युद्धापूर्वी सुद्धां वाढत्या लोकसंख्येमुळें या देशांत उत्पन्न होणारें धान्य येथील लोकसंख्येस पुरेसें नव्हतें. त्यासाठी युद्धापूर्वी सुद्धां परदेशांतून--ब्रह्मदेश, जपान, सयाम--आपण तांदूळ आणीत होतों. तसेंच, युद्धकालीन घडामोडींमुळें जगांतील इतर देशांप्रमाणें या देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत व बहुसंख्य लोकांच्या रहाणीच्या मानांतही फेरफार झाल्यानें निरनिराळ्या नियंत्रणांची व समप्रमाण वाटप-पद्धतीची योजना अमलांत आली व त्यानुसार जे निरनिराळे प्रश्न उत्पन्न झाले ते सोडविण्याची गरज भासूं लागली. समाजांतील इतर निकडी व गरजा ज्याप्रमाणें नियंत्रित करण्यांत आल्या, त्याचप्रमाणें लोकांचें रोजचें अन्नही नियंत्रित करावें लागलें आहे.

सध्यां केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर अखिल जगतांत धान्याचा तुटवडा पडला आहे. कमी लोकसंख्येचे व निसर्गाच्या साधनसंपत्तीनें संपन्न असे अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना इत्यादि देश सोडले तर लढाईमुळें ज्यांची आर्थिक व्यवस्था कमी-अधिक प्रमाणांत उध्वस्त झाली आहे व ज्यांची मनुष्यहानि झाली आहे अशा सर्व देशांत धान्याचा तुटवडा मोठ्या प्रमाणांत पडला आहे. हा जागतिक धान्याचा तुटवडा १ कोट,८० लक्ष टनांचा असून हिंदुस्थानांत तो ४५ लक्ष टनांपर्यंत गेला आहे. त्यांतच पाकिस्तान व हिंदुस्थान असे या अखंड देशाचे दोन विभाग करण्यांत आल्यानें व पाकिस्तान हा त्यांतले त्यांत सुपीक शेतीचा प्रदेश असल्यानें व हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या मानानें त्यांतील धान्य उत्पादन त्या प्रमाणांत नसल्यानें, अन्नधान्याच्या या प्रश्नाला हिंदुस्थानांत एका महान् संकटाचें स्वरूप आलेलें आहे. तेव्हां सर्व विचारवंतांचें लक्ष सध्यां याच प्रश्नावर खिळलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. परकी सरकारच्या हलगर्जीपणामुळें व आपल्या जुन्यापुराण्या शेती करण्याच्या पद्धतीमुळें हा प्रश्न सुटण्याऐवजीं युद्धकालीन कारणांमुळें अधिकच बिकट होत चाललेला आहे. ३० कोटी लोकसंख्येच्या हिंदुस्थानांत १,७२,२९,००० टन तांदूळ व ४१,९९,७०० टन गहूं पिकतो तर ८ कोटी लोकसंख्येच्या पाकिस्तानांत ५२,७२,००० टन तांदूळ व २७,८५,२६० टन गहूं पिकत आहे. यावरून हिंदुस्थानांत याबाबतची करावयाची उपाययोजना किती तातडीनें अंमलांत आणावयास पाहिजे हें लक्षांत येईल.

### धान्याची आयात किती काळ परवडणार?

जीवनाला आवश्यक असें अन्नाचें जें प्रमाण शास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे तें पुरुषांच्या बाबतींत प्रत्येकीं २६०० कॅलरी व स्त्रियांच्या बाबतींत प्रत्येकीं २१०० कॅलरी असें आहे. या प्रमाणांत ३० कोटी लोकसंख्येला अन्नधान्याची वांटणी करावयाची म्हटलें तर सध्यां उत्पन्न होत आहे त्यापेक्षां लक्षावधि टन अधिक धान्य पिकवावयास पाहिजे. आपल्या देशांत अधिक धान्य उत्पादन केलें पाहिजे ही गोष्ट आतां निर्विवाद आहे. पण ही गोष्ट चुटकीसरशी कशी साधणार? रोजचा अन्नाचा तुटवडा तर भरून काढलाच पाहिजे. अशावेळीं एखाद्या गरजू माणसास खट्याळ सावकाराकडून जशी वागणूक मिळते तशीच वागणूक सध्यां हिंदुस्थानला शेजारील-पाजारील, जगांतील अन्नधान्यसम्राट अशा अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना इत्यादि देशांकडून मिळत आहे. केव्हां नकार, तर केव्हां होकार घेण्यासाठी हिंदुस्थानला या राष्ट्रांच्या दारोदार सध्या हिंडावें लागत आहे. ते देतील त्या प्रकारचा माल, म्हणतील त्या भावानें विकत घ्यावा लागत आहे. ज्या गव्हाला दरमणीं सन १९४५ मध्यें ७॥ रुपये आपण ऑस्ट्रेलियाला देत होतों त्याच गव्हाला दरमणीं सध्यां १५ रुपये द्यावे लागतात. गव्हासाठीं इंग्लंड कानडाला दरमणीं जी किंमत देते, त्याचप्रकारच्या गव्हाला आपणास अमेरिकेला त्याच्या १॥ पट रकम द्यावी लागत आहे. याप्रमाणें परदेशांतून धान्य आयात करण्यासाठी आपणास सध्यां प्रतिवर्षी १०० कोटी रुपये खर्च करावे लागतात. याशिवाय, सदर धान्याची किंमत येथील धान्याच्या किंमतीइतकी ठेवणेसाठी तोटा म्हणून मध्यवर्ती सरकारला २० ते २५ कोट रुपये खर्च करावे लागतात ते निराळेच. बरें, याप्रकारें धान्य आणून आपला प्रश्न सहजगत्या सुटत असेल तर तसेंही होत नाहीं. एक तर हें धान्य उत्तम प्रकारचें नसतें, तें आपल्या प्रकृतीला मानवणारें नसतें आणि तिसरें बलवत्तर कारण म्हणजे त्या धान्याची किंमत देण्यास आपणाजवळ उत्तरोत्तर साधन रहाणार नाहीं. ज्या देशांकडून आपणास धान्य आयात करावें लागतें त्यांना आवश्यक असणारा माल तरी आपण पाठविला पाहिजे अगर सोनें तरी दिलें पाहिजे. आयात कराव्या लागणाऱ्या दुसऱ्या वस्तूंच्या आपल्या गरजा प्रचंड आहेत. आज कोट्यवधि रुपयांची यंत्रसामुग्री आपणास आणावयाची आहे; त्याची किंमत देण्यास आपणास असाच येथील कच्चा अगर पक्का माल पाठवून अगर सोनें देऊन तरतूद केली पाहिजे आणि इतका पाठविण्यासारखा आपणाजवळ मालही नाहीं व सोनेंही नाहीं. तेव्हां परदेशाहून आयात होत असलेलें हें धान्य बंद करून आपल्या देशांतील धान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी आपली सगळी साधनसंपत्ति खर्च केली पाहिजे.

तेव्हां अधिक प्रमाणावर धान्य उत्पादन कसें होईल याचाच विचार आपण सविस्तरपणें केला पाहिजे. या उपाययोजनेचे दोन प्रकार आहेत. एक अधिक वर्षे चालणारा दूरगामी व दुसरा तावडतोबीचा, सत्वर फलदायी असा आहे.

### निरनिराळ्या उपाययोजना

आज हिंदुस्थानांत अधिक धान्य पिकविण्याच्या कोणत्याही योजनांचा विचार करतांना दोन गोष्टी लक्षांत ठेवणें भाग पडतें. एक उपाय म्हणजे जी जमीन आज पडीक म्हणून पडली आहे ती ताबडतोब लागवडीखालीं आणण्याचा प्रयत्न करणें व दुसरी उपाययोजना म्हणजे लागवडीखाली असलेल्या क्षेत्रांतून दर एकरी अधिक धान्याची निपज कशी होईल याकडे लक्ष देणें. दोन्हीही दृष्टींनीं याबाबतींत काय करतां येणें शक्य आहे त्याचा आपण आतां विचार करूं.

हिंदुस्थानांत आज लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या शेकडा १८ टक्के जमीन म्हणजे जवळ जवळ ९ कोटी, ४० लाख एकर जमीन निवळ पडून आहे. ही जमीन लागवडीयोग्य करण्यासारखी आहे. परंतु त्यासाठीं मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च केला तरच ती पिकें काढण्यास उपयुक्त होणार आहे. पाण्याचा योग्य रीतीनें निचरा काढून देऊन व कांहीं कांहीं ठिकाणीं पाण्यानें भिजविली जाईल अशी व्यवस्था करून, त्याचप्रमाणें जमीन धुपून जाणार नाहीं अशी योजना करून व त्यासाठीं ठिकठिकाणीं बांधबंधारे घालून ही पडीक जमीन लागवडीयोग्य करतां येण्यासारखी आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावयास मुळींच मागेंपुढें पाहून चालणार नाहीं. याशिवाय, रेल्वेलाईनच्या बाजूला जी हजारों एकर जमीन मोकळी पडली आहे तिचाही पिकें काढण्यासाठी उपयोग करून घेण्यासारखा आहे.

हा एक प्रकार झाला. दुसऱ्या दृष्टीनें, लागवडीखाली जी जमीन आहे तिच्यांतून जास्तींत जास्त पीक कसें काढतां येईल इकडेही लक्ष पुरविलें पाहिजे. या दुसऱ्या प्रकारांत फलसिद्धि सत्वर होण्यासारखी आहे. अधिक पीक काढण्याच्या निरनिराळ्या योजनांचा पुरस्कार येथून पुढें सरकारला करावा लागणार आहे. शेती करण्यासाठी आधुनिक साधनांचा अवलंब करणें, यांत्रिक साधनांचा स्वीकार करणें, उत्तम बी-बियाणें वापरणें, खतांचा योग्य पुरवठा करणें, इत्यादि सर्व बाबतींत योजनाबद्ध पाऊल पडलें पाहिजे. सध्यां लागवडीखालील क्षेत्रांपैकीं फक्त शेकडा वीस टक्के जमीनींत वर्षांतून दोनदां पिकें काढण्यांत येतात, ही दुहेरी पीक काढण्याची पद्धत अधिकाअधिक जमिनींतून विस्तरित होईल असा प्रयत्न व्हावयास पाहिजे. या बाबतींत चिनी शेतकऱ्याचें अनुकरण आपल्या शेतकऱ्यास करतां येण्यासारखें आहे. चिनी शेतकरी हा आपल्या जमिनींतून जास्तींत जास्त फायदा काढण्यांत तरबेज असतो. तसेंच आळीपाळीनें निरनिराळीं पिकें काढण्याची पद्धत सुद्धां अनुसरली पाहिजे.

### गोधनाची आणि पशुसंपत्तीची आबाळ

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें, अधिकाधिक प्रमाणांत धान्य उत्पादन कसें होईल याविषयीं ज्या योजना आहेत त्या ताबडतोब अंमलांत आणल्या पाहिजेत. हिंदुस्थानांतील शेतीला अत्यावश्यक अशी जी गोधन अगर पशुसंपत्ति आहे तिची हिंदुस्थानांत सध्या आबाळ होत आहे ती होऊं देतां उपयोगी नाहीं. जगांतील गुरांच्या संख्येच्या ⅓ गुरें म्हणजे १७ कोटी गुरें हिंदुस्थानांत असून सुद्धां उत्तम पैदाशीचे अभावीं ही संपत्ति मातीमोल झाली आहे. ही गोधन अगर पशुसंपत्ति वाढविण्यासाठी सरकारनें गायरानें व चराऊ रानें यांची वाढ केली पाहिजे. सध्यां या गायरानांच्या, चराऊ रानांच्या व वैरणीच्या अभावीं सुमारें ⅓ गुरांना अर्धपोटीं राहावें लागत आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळें चराऊ रानांचें क्षेत्र कमी पडत चाललें आहे. साहजिकच निकृष्ट दर्जाचीं गुरें निर्माण झाल्यानें शेतीच्या सुधारणेला त्यामुळें अडथळा येत आहे. तेव्हां, उत्तम प्रकारच्या गुरांची पैदास, भरपूर वैरण व चराऊ रानें आणि गुरांना होणाऱ्या रोगांचें निर्मूलन करून त्यांचें योग्यप्रकारें लालनपालन अशा त्रिविध उपायांचा अवलंब केल्यास आपली ही गोधनसंपत्ति वाढून अधिक धान्य तर उत्पादन होईलच पण दुधाच्या उत्पादनांतही शेंकडा ७५ वाढ होऊन आपल्या ३० कोटी लोकांच्या आरोग्यांतही सुधारणा होईल. सध्यां आपल्या देशांत माणशीं केवळ ६॥ औंस दूध मिळत आहे. कॅनडामध्यें हें प्रमाण माणशीं ५८॥ औंस आहे तर इंग्लंडमध्यें ते ४०॥ औंस आहे व न्यूझीलंडमध्यें ५५॥ औंस आहे. याचा परिणाम म्हणजे इंग्लंडमध्यें सर्वसाधारण आयुर्मान पुरुषाचें ५५॥ व स्त्रीचें ५५॥ वर्षे आहे. जर्मनी, नॉर्वे व स्वित्झर्लंडमध्यें तें ५५ वर्षे आहे तर हिंदुस्थानांत तें पुरुषाचें २७ वर्षे व स्त्रीचें २६॥ वर्षे आहे. "जीवेम शरदः शतम्" म्हणणाऱ्या आपल्या पूर्वज आर्यांची संपत्ति गोधन हीच होती व त्याच्याच जोरावर त्यांनीं उत्तम प्रकारची शेती करून या देशाला सुवर्णभूमि करून सोडले होते.

### बागायत जमिनीच्या क्षेत्रांत वाढ

त्यानंतर दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे जितकी जास्त जमीन पाण्याखालीं पेरणीला येईल, तितकी ती आणली पाहिजे. विहिरी खणणें, निरनिराळे कालवे खोदणें, तळीं खोदून पाण्याचे संचय तयार करणें, अशी निरनिराळी कामें ताबडतोब हातांत घेऊन "सुजलां सुफलां" हें या देशाचें वर्णन सार्थ केलें पाहिजे. प्रत्येक खेड्यानें व ग्रामपंचायतीनें दरवर्षी गांवांत नवीन नवीन विहिरी खणणें व नवीन नवीन वृक्षांचें रोपण करणें, हा कार्यक्रम सुरू केला पाहिजे. लागवडीस असलेल्या १ कोटी, ३० लाख एकर जमिनीपैकीं सध्यां फक्त ५० लाख एकर जमीन बागाईत आहे तिच्यांत वाढ झाली पाहिजे.

### खतांचा पुरवठा

जमिनींतून अधिकाधिक प्रमाणावर पिकें काढावयाचीं म्हणजे जमिनीचा मगदूर कमी होऊं देतां उपयोगी नाहीं. जमिनीला जर भरपूर प्रमाणांत खत मिळालें नाहीं तर निव्वळ लाखो एकर जमीन लागवडीला आणून विशेष फायदा आपल्या पदरांत पडणार नाहीं. धान्याऐवजीं परदेशाहून रासायनिक, उत्तम प्रकारचीं खतें आणवण्यांत जर आपले पैसे खर्च झाले तर त्याचा फायदा फार होणार आहे. त्याचबरोबर, देशी खतांचाही उपयोग नीट रीतीनें केला पाहिजे. सध्यां गोवऱ्या लावण्यांत व्यर्थ जात असलेलें शेण, खत म्हणून योग्य प्रकारें तयार करून त्याचा उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. या खतांचें वांटप निरनिराळ्या ठिकाणच्या विविध कार्यकारी सहकारी संस्थामार्फत करावयास पाहिजे.

### उत्तम बी-बियाणें

याच सहकारी संस्थांच्या मार्फत शेतकऱ्यांना उत्तम प्रकारचें बी-बियाणें सरकारनें पुरविलें पाहिजे. सध्यां भातशेतीखालीं ८ कोटी, २० लक्ष एकर जमीन असून गव्हाच्या शेतीची जमीन ३ कोटी, ३०॥ लाख एकर आहे. परंतु त्यापैकीं फक्त ३५ लाख एकर भातशेतीला व ७० लाख एकर गव्हाच्या शेतीला उत्तम प्रकारचें बी-बियाणें मिळत आहे राहिलेल्या शेतजमिनीलाही जर उत्तम प्रकारच्या बी-बियाणांचा सहजगत्या पुरवठा झाला तर अधिक धान्य उत्पादनाच्या मोहिमेला खात्रीचें यश मिळण्याला अवधि लागणार नाहीं. या सर्व उपायांचा अवलंब न केल्यानें हिंदुस्थानांत भाताचें दर एकरीं प्रमाण फक्त ⅓ टन पडत आहे. हेंच प्रमाण अमेरिकेंत १ टन आहे व जपानमध्यें १॥ टन आहे. गव्हाचें प्रमाण हिंदुस्थानांत सुमारें ⅓ टन दर एकरीं आहे तर कॅनडामध्यें तें दरएकरीं ¾ टनाचें पुढें आहे. साखरेच्या बाबतींतही हीच दशा आहे. हिंदुस्थानांत दर एकरीं १२॥ टन साखर उतरते तर अमेरिकेंत हें प्रमाण २० टन असून जावामध्यें तें ५५ टन आहे.

### कोठारें

अधिक धान्य नुसतें पिकवून उपयोग नाहीं, तर त्याच्या संरक्षणाची व ठेवणीचीही व्यवस्था करणें ओघानेंच प्राप्त होतें. नाहींतर दैव देतें पण कर्म नेतें असा प्रकार व्हावयाचा. याबाबतींत उंदीर महाशयांचा पराक्रम फार मोठा आहे. गणपति ही जर शेतकरी गणांची देवता मानली तर त्या देवतेनें उंदीर हें आपलें वाहन पत्करण्यांत फार औचित्य दाखविलें आहे. हिंदुस्थानांत साधारणतः १०० कोटि उंदीर असावे असा अदमास आहे व प्रत्येक उंदीर दरवर्षी ३ शेर धान्याचा फडशा पाडतो, असें गृहीत धरलें तर केवळ २० लाख टन धान्य या अल्पायुषी प्राण्याच्या भक्ष्यस्थानीं जात आहे. तेव्हां हा उपद्रवही थांबविला पाहिजे यांत शंका नाहीं. त्याचबरोबर इतर रानटी जनावरांकडून होणारें नुकसानही थांबविलें पाहिजे. धान्य ठेवण्यासाठी मजबूत कोठारें सरकारनें ठिकठिकाणीं बांधलीं पाहिजेत.

### आहार योजना व फळांची लागवड

अन्नधान्याचा तुटवडा भरून काढण्याकरितां वर ज्या निरनिराळ्या योजना सूचित केल्या आहेत, त्या अमलांत आणल्या तरी मनुष्यमात्राच्या आरोग्याच्या दृष्टीनें आणखीही एका गोष्टीचा आपणांस विचार करावा लागेल. निव्वळ धान्य अगर डाळी यांवर आपला आहार अवलंबून न ठेवतां भाजीपाला, फळफळावळ, दूध, स्निग्ध पदार्थ व ज्यांना आवड आहे त्यांच्या बाबतींत अंडीं व मांस या गोष्टींचा सुद्धां आपल्या आहारांत उत्तरोत्तर जास्त प्रमाणांत समावेश केला पाहिजे. भाजीपाला, फळें आणि दूध यांच्या उत्पादनांत जर आपण वाढ करूं शकलों तर अन्नधान्याच्या तुटवड्याच्या भरपाईबरोबर नागरिकांचें आरोग्यही सुधारण्यास मदत होणार आहे. यासाठीं प्रत्येक जमीन मालकानें व घर मालकानें आपापल्या मोकळ्या जागेंत रासायनिक खतें व शेती करण्याची आधुनिक पद्धत यांचा उपयोग करून भाजीपाला व फळें यांची लागवड केली तर देशाच्या जीवन संपत्तींत मोठीच भर पडणार आहे. तसेंच वाहतुकीच्या साधनांत वाढ केली तर सध्यां फक्त शहरांचे आसपास जो भाजीपाला लावण्यांत येतो, तो दूरदूरच्या खेडोपाड्यांतूनही पिकविण्यांत येईल व शहरांत द्रुतगतीनें आणतां येईल. तसेंच सत्वर सुफलित होणारीं फळझाडें मोठ्या प्रमाणावर लावलीं पाहिजेत. केळी, पपया, संत्री यांची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे. आपल्या रोजच्या आहारांत त्यामुळें धान्याबरोबर घरोघर फळांचाही समावेश होईल व धान्याचा तुटवडा कमी होण्यास त्यामुळें मदत होईल. या बाबतींत बिहार प्रांताचें उदाहरण अनुकरणीय आहे. तेथें फळझाडांच्या लागवडीच्या क्षेत्रांत ७,५४३ एकरांनीं वाढ होऊन २३,००० टन फळांची भर पडते आहे. उत्तम प्रकारच्या फळांचीं रोपटीं तयार करून जर फळझाडांची लागवड झाली तर फळांचे रस डब्यांत घालून देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत हा मेवा पोचवितां येईल. सरकारनें यासाठी स्वतंत्र फल-संशोधन संस्थाही काढण्यास हरकत नाहीं.

### शेतकऱ्यांचे इतर प्रश्न

याच्याच अनुषंगानें सरकारनें इतर आर्थिक व सामाजिक प्रश्नही सोडविण्याचा प्रयत्न केल्याखेरीज शेतकऱ्यास अन्नधान्याचें आधिक उत्पादन करण्यास उत्तेजन मिळणार नाहीं. प्रत्येक शेतकऱ्यास त्याच्या मालकीची निदान ३० बिघे जमीन असणें, त्याच्यावरील कर्जाचा बोजा कमी करणें, जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणें, त्याला आधुनिक सुधारलेल्या औत-अवजारांचा पुरवठा करणें, इत्यादि अनेक उपाय अवलंबिले पाहिजेत. त्यांनीं पिकविलेलें धान्य पक्क्या कोठारांतून ठेवण्याची योजना झाली पाहिजे. मध्यस्थ दलालांना शेतकऱ्याच्या मालाची विक्री होतांना फायदा न मिळतां सर्व फायदा शेतकऱ्यांच्याच खिशांत गेला पाहिजे; त्यासाठीं सहकारी तत्वावर मालविक्रीची योजना पाहिजे. तसेंच उत्पन्न झालेल्या मालाची त्यास योग्य ती किंमत आली पाहिजे. या सव गोष्टी जेव्हां एकसमयावच्छेदेंकरून अमलांत येतील तेव्हांच शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारेल व त्यांचें लक्ष अधिकाधिक धान्य उत्पादन करण्यावर केंद्रित होईल.

### सरकारी राज्ययंत्रांत सुधारणा

हीं सर्व कार्यें व्यवस्थित होण्यासाठीं सरकारच्या खात्यांची पुनर्घटना झाली पाहिजे. आजपर्यंत सर्व साधारण जनतेंत देशभक्तीचें वारें खेळत होतें, तें आतां बदलत्या परिस्थितीमुळें सरकारी नोकरांच्या रोमरोमांतून भिनावयास पाहिजे. तसेंच कलेक्टर-मामलेदार--पाटील इत्यादि नोकरवर्ग केवळ सरकारी सारा वसूल करणारे भय्ये अगर शांततारक्षणाचे रखवालदार एवढेच केवळ न राहता आपल्या शेतकऱ्यांना नवजीवन देणाऱ्या निरनिराळ्या योजनांचे प्रोत्साहक कार्यवाहक झाले पाहिजेत. यासाठीं प्रत्येक तालुक्याचें ठिकाण हें या योजनांचें केंद्र झालें पाहिजे व त्या त्या तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या जीवनाच्या सुखाबद्दल व शेती सुधारणेच्या योजनांबद्दल मामलेदार व पाटील यांना जबाबदार धरलें पाहिजे. तसेंच प्रत्येक गांवांत विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या स्थापन करून त्यांच्या मार्फत व ग्रामपंचायतींच्या मदतीनें शेतीला उपयुक्त अशीं यांत्रिक साधनें पुरविणें, बीं-बियाणें वाटणें, खतांचा पुरवठा करणें, शेतीच्या मालाला बाजार उपलब्ध करून देणें, इत्यादि हरतऱ्हेचीं कामें पार पाडलीं पाहिजेत.

मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, श्री. जालन, ह्यांनीं वरीलपैकीं पुष्कळशा सूचना पुरुषोत्तमदास ठाकूरदास कमिटीकडे पाठविलेल्या आहेत. त्यांचा अंगीकार केला गेल्यास, अन्नटंचाईचा प्रश्न सुटण्यास बरीच मदत होणार आहे.

—आमचे ग्राहकांस व हितचिंतकांस—

नूतन वर्ष सुखदायी होवो !

पंढरीनाथ बिलिअंटाईन डेपो

—मुंबई नं. २८—

## —कृष्णा—
## शुगर मिल्स लिमिटेड

कृष्णा-कित्तूर

**कन्फेक्शनरी सुरू झाली.**

धंद्याच्या वाढीसाठीं ठेवी स्वीकारल्या जातात.

**६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.**

विशेष माहितीसाठीं लिहा.

**विंचूरकर अॅण्ड को.**
मॅनेजिंग एजण्टस्

पोस्टः—कृष्णा-कित्तूर
जिल्हाः—बेळगांव

---

## दि मदर्न निटिंग वर्क्स लि.

——पुणें २——

ह्यांनीं तयार केलेली

# ★होजिअरी★

सर्व प्रकारचा सुती, लोकरी आणि जाळीचा, निरनिराळ्या डिझाइन्समधील माल

**इंटरलॉक अंडरवेअर्स व शर्टस्**

एस. व्ही. सुपनेकर कुलकर्णी अँड सन्स लि.
मॅनेजिंग एजंटस्

---

विश्वासानें व किफायतशीरपणानें भांडवल गुंतविण्याचें आदर्श ठिकाण.

## पांडुरंग अॅग्रिकल्चरल प्रॉडक्टस् लिमिटेड.

हेड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट-कुरोली.
( व्हाया कुर्डुवाडी )

कंपनी उसाचें क्षेत्र वाढवीत असून फळबागांची लागण हातीं घेत आहे.

वाढत्या धंद्यासाठीं खालील दरानें कंपनी ठेवी स्वीकारते.

ठेव : मुदत वर्षें—१; २; ३, ४

व्याजाचा दर-द. द. शेंकडा—४; ४॥; ५; ६ टक्के

खालील कारणांसाठीं याच कंपनींत रकमा गुंतविणें हितावह आहे.

(१) पहिल्या संपलेल्या वर्षास कंपनी दहा टक्के डिव्हिडंड देत आहे.
(२) मिरज (ज्यु.) दरबारनें भरीव रक्कम कंपनींत गुंतवून कंपनीबद्दल विश्वास व्यक्त केला आहे.
(३) कंपनीस इन्कम्‌टॅक्सची माफी मिरज (ज्यु.) दरबारनें दिली आहे.
(४) कंपनीचे लागणीचें क्षेत्र अेकसंधी असल्यानें जमीनीच्या मेहनत मशागतीच्या खर्चाचें प्रमाण फारच कमी आहे.

ठेवींचे अर्ज व माहितीपत्रकासाठीं आजच वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग अेजंटस्: जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी

---

खालील प्रकारचा अव्वल दर्जाचा माल मिळण्याचें

## ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

हें एकच ठिकाण आहे.

- ★ कांचेच्या चिमण्या, ग्लोब, कौलें, बाटल्या इत्यादि.
- ★ प्रभाकर कंदील.
- ★ एनामलचीं भांडीं व अंग स्लेट-पाट्या.
- ★ एव्हरसिल्व्हरचीं घरगुती उपयोगाचीं न कळकणारीं भांडीं.

**ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड**

— ओगलेवाडी. —

# मुंबई प्रांतांतील शेतकरी आणि कर्जें

लेखकः—" वृत्तशर्मा "

हिंदुस्थानांतील इतर सर्व प्रांतांप्रमाणेंच मुंबई प्रांत हा शेतकी-प्रधान असून येथील बहुजन समाजाचा मुख्य व्यवसाय शेतकी हा आहे. उपजीविकेस दुसरें कांहींही साधन नसल्यानें येथील लोक-संख्येपैकी सुमारें तीन चतुर्थांश लोकांना शेतीवरच आपली गुज-राण चालविणें भाग पडतें. भौगोलिक दृष्टीनें आपल्या प्रांतांतील सुमारें $\frac{1}{3}$ एवढी जमीन खडकाळ, सबब शेतीस निरुपयोगी आहे. पावसाचे अभावामुळें सुमारे $\frac{1}{4}$ क्षेत्रांत पीक येईल अशी निश्चितता नसते, एवढेंच नाहीं तर सालोसाल त्या भागांतील जमिनी नापेरही राहतात. म्हणजे सुमारे $\frac{1}{3}$ भाग एवढाच शेतीसाठी लायक असा आहे. परंतु याही भागांत कालवे अगर पाटबंधारे काढून पाण्याची सोय केलेली नसल्यानें तेथें मुख्यतः कोरडवाहू शेतीच करावी लागते. एकूण क्षेत्राच्या सुमारे शेकडा दहा-बारा टक्के जमिनींत विहिरी, कालवे, पाट वगैरेचे साधनानें पाणी मिळूं शकतें व तेथें बागाईत पिकें काढता येतात. या परिस्थितीमुळें आपल्या प्रांतांत उपलब्ध होईल त्या प्रकारच्या हलक्या जमिनींत वर्षानुवर्षें शेती चालू आहे. खत, बीं वगैरे सारखीं साधनेंही भरपूर व चांगलीं मिळूं शकत नाहींत. सुधारलेल्या औतांचा अद्यापही पुरेसा प्रचार झालेला नाहीं व हीं औतें सहजीं व योग्य किंमतीस मिळूं शकत नाहींत. या सर्व कारणांमुळें शेती हा आतबट्ट्यांतील कारभार आजवर होत आलेला आहे. शेतकऱ्यांना हा नुकसानीचा धंदा पिढ्यानुपिढ्या करणेंच निरुपायानें भाग पडल्यामुळें स्वाभाविकच त्यांना आपल्या नित्य व नैमित्तिक अडचणींना तोंड देतांना बाहेरून कर्ज काढण्या-खेरीज गत्यंतरच नसतें.

## कायदेशीर कर्जमुक्तता

मुंबई इलाख्यांतील शेतकऱ्यांच्या सांपत्तिक परिस्थितीची चौकशी केल्यास असें आढळून येतें कीं त्यांचेपैकीं सुमारें वीस टक्के निष्कर्जी असून बाकीच्या सर्वांना थोडेंफार कर्ज आहे. सरासरीनें प्रत्येक कुटुंबास सुमारें रु. २२५ ते २५० कर्ज आहे. कोकणांतील शेत-करी कुटुंबास सरासरीनें तें रु. ११५ असून, कापूस पिकविणाऱ्या प्रदेशांतील शेतकऱ्यांना रु. ५०० पर्यंत कर्ज आहे. शेतकऱ्यांना असलेल्या ह्या कर्जाची अधिक छाननी केल्यास असें दिसून येतें कीं, उत्पादक कारणांसाठी म्हणजे चालू शेती, शेती सुधारणा, किरकोळ व्यापार, या बाबींसाठीं त्यांनीं फक्त तीस टक्के कर्ज काढलें असून लग्नकार्य, घरगुती दैनंदिन गरजा, जुने कर्जाचे व्याज, कोर्ट दरबार, वगैरे कारणासाठी त्यांनीं बाकीचें सत्तर टक्के कर्ज काढलें आहे. हा कर्जाचा बोजा शेतकऱ्यांचे डोक्यावर पिढ्यान् पिढ्या असून त्यांतून ते मुक्त होतील अशी आशा फारच थोडी आहे.

कायमचा कर्जबाजारी इसम, अगर समाज, हा हळूहळू स्वाभि-मान शून्य होऊन तो हतबल होतो असा अनुभव आहे. आपल्या प्रांतांतील बहुजन शेतकरी समाज हा वर सांगितल्याप्रमाणें गेलीं कित्येक वर्षें कर्जांत रुतून राहिला असल्यानें तो स्वाभाविकच हतबल, दुबळा व स्वाभिमानशून्य झाला असून तो राष्ट्रास हानिकारक होत आहे असें दिसून येतें. त्याला आपली कर्जांतून मुक्तता करून घेणें कसें व कां शक्य नाहीं तेंही वर सांगितलें आहेच. शेतकऱ्यांना आपलें जीवन स्वतंत्र व निष्कर्जी नागरिक म्हणून उपभोगता यावें या उद्देशानें त्यांच्यावरील कर्जाचा बोजा कायद्याचे जोरावर आतां हलका करण्यांत आला असून पुढील १२ ते १५ वर्षांत आपल्या प्रांतांतील बहुतेक सर्व शेतकरी निष्कर्जी झालेले आपणास दिसतील अशी आशा वाटूं लागली आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा कमी करून त्यांना निष्कर्जी होतां यावें म्हणून आपल्या प्रांतिक सरकारानें सन १९३८ सालीं एक कायदा मंजूर करून त्याची अम्मलबजावणी कांहीं क्षेत्रांत प्रयोगा-दाखल सुरू केली व पुढें तें क्षेत्र आणखीही वाढविलें. आलेले अनु-भव जमेस धरून या कायद्यांत बऱ्याच दुरुस्त्या करण्यांत आल्या व हा दुरुस्त कायदा तारीख २७ मे, १९४७ पासून अमलांत आलेला आहे. आतां या कायद्याची अम्मलबजावणी सर्व प्रांतभर सुरू झालेली आहे. सदर कायद्याचा फायदा घेऊन आपलीं कर्जें कमी करण्यांत यावीं अगर आपणास कर्जमुक्त करण्यांत यावें किंवा पूर्वीं खरेदी दिलेल्या जमिनी ह्या केवळ गहाण म्हणून दिल्या असल्यानें त्या आतां आपणास परत मिळाव्या म्हणून किती शेतकऱ्यांनीं आजवर अर्ज दाखल केले आहेत, तें बोधप्रद होण्या-सारखें असल्यानें त्या बाबतची संकलित माहिती खालीं दिली आहे.

| प्रदेश | जिल्हे | दाखल झालेले अर्ज (सुमारें) |
|---|---|---|
| गुजराथ | अहमदाबाद, पंचमहाल, खेडा, सुरत व भडोच | १,१८,९०० |
| कर्नाटक | धारवाड, बेळगांव, विजापूर व कारवार | १,५४,१०० |
| कोकण | रत्नागिरी, कुलाबा व ठाणें | ४५,८०० |
| खानदेश | पूर्व व पश्चिम खानदेश | १,३३,१०० |
| देश | पुणें, सातारा, सोलापूर, अहमदनगर व नाशिक | २,६६,८०० |
| एकूण महाराष्ट्र | | ४,४५,७०० |
| एकूण मुंबई प्रांत | | ७,१८,७०० |

वरील माहितीवरून असें दिसून येईल कीं, आपल्या प्रांतांतील सुमारें सात, साडे सात लक्ष कुटुंबें येत्या दहा-पंधरा वर्षांत संपूर्णपणें निष्कर्जी होतील व त्यांचेपैकी जवळ जवळ निम्मी कुटुंबें सावकारांनीं पूर्वीं खरेदी दिलेल्या जमिनी परत मिळवितील. म्हणजे, एवढा समाज स्वाभिमानानें आपल्या पायावर उभा राहूं लागेल व तो भविष्य काळांत राष्ट्राचा मोठा आधार बनेल. मात्र दरम्यानचे काळांत त्याला आपली शेती तोट्याची होणार नाहीं व नवीन कर्ज काढण्याचा त्याचेवर प्रसंग येणार नाहीं हें पहाण्याची सरकारनें पूर्ण दक्षता घेतली पाहिजे. त्यांना कर्जें कां होतात तें ध्यानीं घेऊन कर्ज काढण्याची शेतकऱ्यांना यापुढें गरजच राहणार नाहीं इतकें उत्पन्न त्यांना शेतींतून ज्यायोगें मिळेल ते सर्व उपाय आतां तातडतोबीनें सरकारनें अमलांत आणले पाहिजेत. तरच शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाचा कायदा केल्याचा खरा उपयोग होईल. नाहीं तर आजवर केलेल्या अनेक मलमपट्ट्यांपैकी हीही एक ठरेल व त्यांचा आजवरचा आजार आहे तसाच पुढेंही राहील, एवढेंच नव्हे तर तो कदाचित् आणखी वाढेलही. सबब इकडे सरकारनें वेळींच लक्ष पुरवावें असें आम्ही त्यास सुचवूं इच्छितों.

# दि बेळगांव बँक लि.

स्थापना ) हेड ऑफिस—बेळगांव ( १९३० इ.

*शाखा:—संकेश्वर, होसूर, गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ला, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, धारवाड, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बेलहोंगल, मिरज, अथणी.*

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | — | रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | — | रु. ५,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें भांडवल | — | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | — | रु. ९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | — | रु. ५५,००,००० |
| एकूण ठेवी | — | रु. ४१ लक्षांचे वर |

बँकेनें द. सा. द. शें. ४ टक्के व्याज सु-णारीं, पांच वर्षांचीं "कॅश सर्टिफिकेटस्" व द.सा.द.शें. ३॥ टक्के व्याज सुटणारीं, तीन वर्षांचीं "क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं" सुरू केलीं आहेत.

विशेष माहितीकरितां भेटा अगर लिहा.

बँकिंगचा सर्व तऱ्हेचा व्यवहार केला जातो व आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.

श्री. एस. जी. हेरेकर,—चेअरमन

श्री. ए. आर. नाईक
B. A., B. Sc., LL. B.
मॅनेजिंग डायरेक्टर.

श्री. एच. एस. कुलकर्णी
वेनाडकर B. A.,
मॅनेजर.



# बॉंबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—मुख्य कचेरी—

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई

स्थापना : १९११

चेअरमन:—श्री. आर. जी. सरय्या, ओ.बी.ई.

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | :: | २०,२४,६०० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | :: | २५,६५,००० रु. |
| एकूण ठेवी | :: | ५,११,९०,००० रु. |
| खेळतें भांडवल | :: | ७,१२,००,००० रु. |

## ११ जिल्ह्यांत मिळून एकूण ५१ शाखा

हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या बहुतेक शहरांतील बँकांशीं करेक्शनची व्यवस्था. वेगवेगळया प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात, त्यांच्या अटींचा तपशील अर्जदारांस पुरविला जाईल.

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम.
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि युनायटेड् कमर्शिअल् बँक लिमिटेड, कलकत्ता

चेअरमन:—श्री. जी. डी. बिर्ला

जनरल मॅनेजर:—श्री. बी. टी. ठाकूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : : | ८ कोटी रु. |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | : : | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | : : | ३० लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | : : | ४५ कोटी रु. |

—सर्व हिंदुस्थानभर शाखा—

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

व्ही. आर. सोनाळकर
डेप्युटी जनरल मॅनेजर

एस. टी. सदाशिवन्,
डेप्युटी जनरल मॅनेजर

ओ. एच. घीवाला
रिजनल मॅनेजर

व्ही. व्ही. गुते,
मॅनेजर, पुणें शहर शाखा



# The Bank of Kolhapur, Limited.

**(Incorporated in Kolhapur in 1926; the liability of members being limited).**

*Under the patronage of & largely supported by the Government of His Highness The Chhatrapati Maharaja of Kolhapur.*

| | |
|---|---|
| Authorised Capital | Rs. 40,06,500/- |
| Capital Issued & Subscribed | Rs. 20,26,000/- |
| Capital Paid-up (ending 16-10-47) | Rs. 4,49,780/- |
| Reserve Fund (ending 16-10-47) | Rs. 7,70,850/- |
| Total Working Fund | Over Rs. 200,00,000/- |

**Head Office:**
**Sir Bird-Wood Road, Laxmipuri, Kolhapur**

*Branches:—*

(1) Gujari-Kolhapur (2) Shahupuri-Kolhapur.
(3) Malkapur. (4) Peth Vadgaon.
(5) Jaysingpur. (6) Ichalkaranji.
(7) Gadhinglaj. (8) Nipani (Dist. Belgaum).
(9) BOMBAY.

**Current & Savings Bank Accounts opened and Fixed Deposits received on terms which may be ascertained on application.**

**Loans, Overdrafts & Cash Credits:—**

**The Bank grants accommodation on terms to be arranged against approved securities.**

**Safe Deposit Vault at Head Office, Kolhapur. Rates on application.**

**BANKING BUSINESS OF EVERY DESCRIPTION TRANSACTED.**

**G. R. Idnani,**
*General Manager.*

# औद्योगिक नियोजन आणि शास्त्रीय संशोधन

लेखकः—डॉ. मो. वा. चिपळूणकर, एम्. एस्सी. ( बनारस ), डी. एस्सी. ( मुंबई ).

दुसऱ्या जागतिक युद्धांतून जग हळुहळू बाहेर पडूं लागतांच प्रत्येक देश आपापल्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक वगैरे क्षेत्रांतील विस्कळित झालेली घडी पुनः नवीन विचारप्रवाहानुसार नीट घालण्याचें कार्य हातीं घेऊं लागला आहे. कांहीं पाश्चिमात्य देशांतील कांहीं कांहीं उद्योगधंद्यांनीं तर आपापले युद्धपूर्व नियोजित कार्यक्रम हातीं घेतल्यासही वर्ष—सहा महिने लोटून गेले आहेत. या दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वाला जरी हिंदुस्थानाला प्रत्यक्ष जाळूं शकल्या नाहींत, तरी आधुनिक युद्धांच्या जागतिक स्वरूपामुळें व तो इंग्लंडच्या छत्राखालील एक परतंत्र देश पडल्यामुळें, युद्धाच्या नुसत्या झळींमुळेंच या देशाचीही हरतऱ्हेची हानी झाली आहे. युद्धसमाप्तीनंतर, विशेषतः राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यापासून, येथेंही आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि क्षेत्रांत अनेक बदल घडून येत आहेत. देशाच्या प्रगतीला विघातक असें वातावरण निर्माण झालें आहे; व त्याचें पर्यवसान कशांत होईल हें आज कोणासही नक्की सांगतां येत नाहीं. दोन्हीं जागतिक महायुद्धांत प्रमुख असलेल्या इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, अमेरिका व जपान, या जित व जेत्या अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांच्या गेल्या ४०—५० वर्षांच्या इतिहासाकडे बोट दाखवून असें स्पष्ट म्हणता येतें कीं, आपणांस मिळालेलें हें स्वातंत्र्य मानानें टिकवावयाचें असेल तर आजच्या घटकेला एकंदर हिंदुस्थान देशाच्या दृष्टीनें सैनिकीकरण, औद्योगीकरण व या दोहोंच्या मुळाशीं असलेलें शास्त्रीय संशोधन, ह्या आपल्या सर्वांत महत्त्वाच्या गरजा होत, नव्हे त्या आवश्यकच होत. म्हणून देशांत लवकरच वाईटांत वाईट अशी परिस्थिति निर्माण होणार असेंच गृहीत धरून आपणास त्या दृष्टीनें तावडतोब काय करावयास हवें, हें नक्की ठरविलें पाहिजे व त्याप्रमाणें वागलेंही पाहिजे.

### स्वसंरक्षणासाठी नियोजन

आजच्या घटकेला आपल्यासमोर पहिला प्रश्न म्हणजे स्वसंरक्षणाचा होय. परचक्र व अंतस्थ बंडाळी या दोहींची शक्यता आहे हें विसरून चालावयाचें नाहीं; आणि म्हणूनच सैनिकीकरण आवश्यक आहे. आधुनिक सैनिकीकरण त्रिविध असतें. म्हणजे, त्यांत हवाईदल, नाविकदल आणि भूदल या सर्वांचा समावेश होतो. अशा सैनिकीकरणास देशाच्या औद्योगीकरणाची अत्यंत आवश्यकता असते आणि औद्योगीकरणास शास्त्रीय संशोधनाची तितकीच जरूरी असते. शास्त्रीय संशोधन—औद्योगीकरण—सैनिकीकरण ही राष्ट्रोद्धाराची एक आधुनिक व अनुभवसिद्ध अशी साखळी आहे. खरोखरी, प्रत्येक देशाच्या स्वतःच्या शास्त्रीय संशोधनाचें महत्व याहून अधिक उत्कटतेनें पटवून देतां येणार नाहीं.

तसेंच आधुनिक जगांतील आणखी एक तत्त्व लक्षांत ठेवावयास पाहिजे तें असें कीं, कोणत्याही कार्यांत कमींत कमी वेळांत अधिकांत अधिक यश संपादन करणें असेल तर सर्वांगीण नियोजन पद्धतीचाच अवलंब करावा लागतो. याचें सोविएट रशियाच्या आश्चर्यकारक व शीघ्र प्रगतीहून अधिक उत्कृष्ट उदाहरण देतां येणार नाहीं. तेव्हां आपल्या देशांतही नियोजन पद्धतीचा अवलंब करून येथील सैनिकीकरणासाठीं व औद्योगीकरणासाठीं शास्त्रीय संशोधनाचा एक पांच, दहा, पंधरा वर्षांचा कार्यक्रम आखण्याची अत्यंत जरूरी आहे, असें प्रस्तुत लेखकाचें कळकळीचें म्हणणें आहे. देशाचें सैनिकीकरण योग्य तऱ्हेनें करण्यासाठीं व केवळ सुलभता, शीघ्रता आणि आटोपशीरपणा यासाठीं बृहन्महाराष्ट्राची शास्त्रीय आघाडी निर्माण करण्यासंबंधीची सूचना करून कार्याची रूपरेषा दर्शविणारा एक आराखडाही यापूर्वींच लेखकानें महाराष्ट्रीय जनतेपुढें मांडला होता. ( केसरी, शुक्रवार दिनांक ८ ऑगस्ट, सन १९४७, पान ३ पहा. ) आजच्या घटकेला तरी बृहन्महाराष्ट्रांतील जीवन हिंदुस्थानच्या वायव्य आणि ईशान्य भागांतील जीवनाप्रमाणें धोक्याचें व अस्थिर असें झालेलें नाहीं; तेव्हां या परिस्थितीचा संपूर्ण फायदा घेऊन आंतरराष्ट्रीय चढाओढीच्या या काळांत बृहन्महाराष्ट्रानें तरी आपलें पाऊल चटाचट उचलावयास पाहिजे. याच दृष्टीनें वर म्हटलेल्या लेखांत दिलेल्या कार्यक्रमांतील चार महत्त्वाच्या सूचना पुनः येथें मांडल्या आहेत. त्या अशा—



### कार्यक्रम व योजना

( १ ) निरनिराळ्या युद्धोपयोगी गोष्टींचा साठा कसा व कोठें करावयाचा यासंबंधीं शास्त्रीय माहिती व शिक्षण देऊन पथकें निर्माण करणें.

( २ ) निरनिराळ्या युद्धोपयोगी गोष्टी येथेंच तयार करणें अगर परप्रांतांतून व परराष्ट्रांतून तावडतोब मिळविणें.

( ३ ) निरनिळ्या शास्त्रीय शाखांमध्यें अत्यंत उपयुक्त व लवकर होणारें संशोधन करून त्या त्या शाखांत त्यांचा उपयोग करविणें. जुन्या पद्धतींहीं योजून माहीत असलेलाच पण युद्धोपयोगी माल तयार करविणें.

( ४ ) सैन्य, नाविक व हवाई दलांतील उमेदवारांना प्राथमिक शास्त्रीय, यांत्रिक व युद्धोपयोगी इतर शिक्षण देणें.

आता या व इतर आनुषंगिक गोष्टी साधण्यासाठी उपाययोजना पुढें दिल्या आहेत. आजपर्यंत आपल्या मार्गांत परकीय राजसत्तेची नेहमीं येणारी अडचण आतां पूर्णपणें दूर झालेली आहे; आणि आपल्याला योग्य वाटेल ती योजना अमलांत आणण्यास इतर कोणतीही बाहेरची आडकाठी राहिलेली नाहीं. ही परिस्थिति ओळखूनच या दोन्ही लेखांतील योजना मांडण्यांत आल्या आहेत. त्या विशेषतः बृहन्महाराष्ट्रांतील सर्व कारखानदार व भांडवलवाले यांनाच जास्त उद्देशून केल्या आहेत; व मराठा चेंबर, महाराष्ट्र चेंबर, महाराष्ट्र कारखानदार संघ इत्यादि व्यापारी व औद्योगिक संस्था—परिसंस्थांच्या धुरीणांचें लक्ष याकडे आम्ही वेधूं इच्छितों. या संस्थांनीं एकत्र येऊन बृहन्महाराष्ट्राच्या सर्वांगीण औद्योगीकरणासंबंधीं पुढील प्रमाणें एखादी कालिक योजना मान्य करून तिला सर्वांचें साहाय्य व सहानुभूति मिळवावी. मुख्यतः जर्मनी, रशिया व जपान या तीन राष्ट्रांच्या ताज्या इतिहासावरून असें म्हणतां येतें कीं, आपली औद्योगीकरणाची योजनाही जवळजवळ त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून आखावयास पाहिजे. मात्र ती आपल्या आजपर्यंत चालत आलेल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कल्पनांशीं अधिकांत अधिक मिळती घेतल्यास विरोध न होतां, उलट सर्वांगीण सहानुभूतीचेंच वातावरण निर्माण करील. कारण, रशिया व जपान या राष्ट्रांना मुख्यतः स्वतःची अशी पुरातन संस्कृति व पुरातन व पूर्णावस्थेस पोचलेली समाजव्यवस्था चालत आलेली नव्हती; पण आपली मात्र तशी परिस्थिति नाहीं.

### औद्योगीकरणाच्या पायऱ्या

कोणत्याही राष्ट्राच्या औद्योगीकरणाच्या योजनेंत चार पायऱ्या समजल्या जातात व त्या साधारणपणें क्रमाक्रमानेंच चढाव्या लागतात. त्या पायऱ्या अशाः—



# अशक्त मुलें सशक्त होतात

# डोंगरे

# बालामृत



मालक: के. टी. डोंगरे आणि कं. मुंबई ४



—गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना सारखीच उपयोगी पडणारी—


संपूर्ण तुमच्या मालकीची

# श्रीशिवाजी नॅशनल बँक लिमिटेड

हेड ऑफिस:—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

ब्रँच ऑफिस:—लक्ष्मी मार्केट, मिरज (सि.)

—आमचें वैशिष्ट्य—




★ १० रुपयें भरून ५ वर्षानंतर १२॥ रुपये मिळणारी "स्वराज्य बॉंड"ची आकर्षक व फायदेशीर योजना.

★ मंथली फिक्स्ड डिपॉझिटची त्रैवार्षिक व पंचवार्षिक अभिनव योजना. दरमहा १ रुपया भरून ३ वर्षानंतर ३६ चे ४० व पांच वर्षानंतर ६० चे ७० या प्रमाणांत रकमा वांटल्या जातात.

★ दररोज ने-आण करणारी "डेलि सेव्हिंग्ज"ची उपयुक्त योजना. याशिवाय इतर सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात. भेटा अगर लिहा.

- **नारायणराव हणमंतराव साळोखे**

मॅनेजिंग डायरेक्टर



सा. न. वि. वि.

माझे पति कै. सरदार वि. वि. कुर्लेकर यांचे पॉ. नं. जे. ३८७ च्या क्लेमच्या रकमेचा आपण पाठविलेला चेक पोंचला. मी आपणास क्लेमचे कागदपत्र पुरे करून पाठविल्यानंतर इतक्या झटकन आपण रक्कम पाठविली याबद्दल मी आपली फार आभारी आहे.

माझ्या पतींनीं आपल्या कंपनींत विमा उतरला होता हें देखील मला माहीत नव्हतें व पॉलिसीही गहाळ झालेली होती; परंतु आपण होऊन पत्र लिहून मला क्लेमचे कागदपत्र पाठवण्यास सांगितले व क्लेम लवकर मिळावा याकरितां सर्व प्रकारांनीं मदत केली. सर्वसाधारणपणें या व्यापारी जगांत इतक्या सचोटीचा व्यवहार करणाऱ्या संस्था सांपडत नाहींत. **विमा व्यवसायांतील प्रत्येक प्रचारकानें अशा कंपनीचें काम करावें व देशांतील प्रत्येक नागरिकानें या आदर्श कंपनींत विमा घेणें योग्य होईल असें मला वाटतें.** आपल्या संस्थेचा उत्तरोत्तर जास्त उत्कर्ष होवो अशी इच्छा प्रदर्शित करून व पुन्हा एकदा आपले आभार मानून हें पत्र पुरें करतें. क. लो. अ. हे वि.

आपली,

**कमलाबाई कुर्लेकर**

कुर्लेकर वाडा, मिरज.

**"ही संस्था महाराष्ट्रांतील सर्व प्रॉव्हिडंट कंपन्यांत सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ आहे"**

असें अनेक तज्ज्ञांचें मत आहे.

● या कंपनीस पहिल्याच मूल्यमापनांत नफा झाला आहे.

● डाक्टरी तपासणीशिवाय रु. ९०० पर्यंतचे विमे घेतां येतात.

● लायसेन्सशिवाय एजन्सी घेतां येते.

**ठिकठिकाणीं पगारी अथवा कमिशनवर ऑर्गनायझर्स व एजंटस नेमणें आहे.**

अधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहा—

**मॅनेजर, युवर ओन प्रॉ. इन्शु. कं. लि.**

३७, वेस्टर्न इंडिया हाऊस, मुंबई १.

(१) **मूलभूत व निसर्गावलंबी उद्योगधंदे** – शेती, जंगली उद्योगधंदे, खनिज उद्योगधंदे, इत्यादी हे कोणत्याही देशांतील मूलभूत व निसर्गावर अवलंबून असणारे धंदे होत. अगदी पहिली पायरी म्हणून हे सर्व धंदे प्रथम उर्जितावस्थेस आणिले पाहिजेत; कारण यांतूनच निर्माण होणाऱ्या मालावर पुढील उद्योगधंद्यांची इमारत बांधलेली असते; जसें कापसापासून सूत, कापड इत्यादी व इमारती लाकडापासून इमारती, वहातुकीचीं साधनें इत्यादी पक्का माल तयार केला जातो. आपल्या योजनेंत या उद्योगधंद्यांना अतिशय महत्त्वाचें व अग्रमानाचें स्थान दिलें पाहिजे हें उघड आहे. वरील उद्योगधंद्यांना लागणारी आधुनिक यंत्रसामुग्री येथेंच बनवून अगर मिळाल्यास व परवडल्यास परदेशांतून आणून वरील मूलभूत धंद्यांतून त्याच्या पुढच्या धंद्यास लागणारा कच्चा माल सतत व भरपूर प्रमाणांत निर्माण करणें आवश्यक होय.

(२) **नैसर्गिक कच्च्या मालापासून अर्धवट पक्का माल तयार करण्याचे कारखानेः**—ही पायरीही पहिल्या पायरी इतकीच महत्त्वाची आहे. असल्या कारखान्यांत कच्च्या मालावर फक्त प्राथमिक क्रिया करून त्याच्या पुढील उद्योगधंद्यास उपयोगी पडेल अशा योग्य प्रकारचा माल तयार करून दिला जातो. उदाहरणार्थ, कापसांतील सरकी काढून सुताच्या व कापडांच्या गिरण्यांना कापूस पुरविणें, जंगलांतून आणलेली अशुद्ध लाख वितळवून त्याची पत्री लाख बनविणें, निरनिराळ्या खनिजांना प्राथमिक शुद्धता आणणें, इत्यादी. या मधल्या पायरीमुळें पुढील कारखान्यांची कार्यक्षमता अतिशय वाढते व विशेषतः अवास्तव वहातुकीचा खर्च व अडचणी टाळल्या जातात. म्हणून आपल्या कालिक योजनेंतील पहिल्या कालखंडांत असल्या कारखान्यांना मूलभूत धंद्यांइतकेंच महत्त्व दिलें जाईल.

(३) **प्राथमिक पक्क्या मालाचे कारखाने** —या नंतरची पायरी म्हणजे ज्या उद्योगधंद्यांत (२) मधील अर्धवट पक्का माल घेऊन त्यापासून हरतऱ्हेचे प्राथमिक जिन्नस तयार केले जातात ते होत. उदाहरणार्थ, सुताच्या व कापडाच्या गिरण्या, रासायनिक पदार्थांचे कारखाने, कांचेचे कारखाने, तेलघाण्या, कागदाच्या गिरण्या, इत्यादी.

(४) **संपूर्ण तयार मालाचे कारखाने**—वरील तिन्ही प्रकारच्या कारखान्यांत व उद्योगधंद्यांत तयार झालेल्या मालापासून अनेक गोष्टींची जुळणी करून तयार केलेला, ताबडतोब वापरण्यासारखा, जीवनोपयोगी, युद्धोपयोगी व अनेक नागरी व्यवसायांना उपयुक्त असा माल तयार करणारे कारखाने ही शेवटची पायरी होय. उदाहरणार्थ, खाद्य पदार्थ, कपडेलत्ते, फर्निचर, मोटारी, आगबोटी, विमानें, रेडिओ, शस्त्रास्त्रें, घड्याळें, शास्त्रीय यंत्रें इत्यादी इत्यादींचे कारखाने. (३) व (४) मध्यें वर्णिलेल्या मालाची मुबलक पैदास योजनेच्या पहिल्या काळांत होणें कठिणच आहे; व म्हणून त्या प्रकारच्या कारखान्यांकडे त्वरित उत्पादनाच्या दृष्टीनें न पहातां त्यांतील तज्ज्ञ निर्माण करण्याच्याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे, म्हणून त्यांच्या शिक्षणाचा कार्यक्रम हा योजनेंतील पहिल्या कालखंडांतील मुख्य भाग होय.

### समतोलपणाची आवश्यकता

(१) आणि (२) मधील कार्यक्रम साधतांना पहिल्या कालखंडांतील नियोजनामुळें ज्या प्रमाणांत जीवनोपयोगी (मुख्यतः चैनीच्या व रहाणीची पातळी उच्च ठेवण्यास लागणाऱ्या) वस्तूंच्या उत्पादनावर ताण पडेल तितका ताण कांहीं काळ तरी स्वयंस्फूर्तीनेंच येथील प्रजेनें सोसावयास पाहिजे हें ओघानेंच प्राप्त झालें, व अशा तऱ्हेचा स्वार्थत्याग पुढारलेल्या सर्वच राष्ट्रांतील लोकांनीं केव्हां ना केव्हां तरी यापूर्वी केलेला आहेच. त्याचबरोबर मात्र नियोजकांना येथें मुद्दाम सांगावेसें वाटतें कीं, १५-२० वर्षानंतर देशांतील एखाद्या भागाचें नंदनवन करून सोडणाऱ्या मोठमोठाल्या योजना आज कंगाल झालेल्या लोकांना उपाशी ठेवून देशाच्या (हिंदुस्थानच्या) मध्यवर्ती तिजोरींतून वाटेल तसा पैसा खर्च करून किंवा दुसऱ्या राष्ट्रांचें कर्ज काढूनही आंखण्यांत मुळीच हशील नाहीं असें लेखकाचें प्रांजळ मत आहे. उदाहरणार्थ, दामोदर खोऱ्यांतील योजना सक्कर योजनेप्रमाणेंच फक्त पैसेखाऊ व इतर प्रांतांतील लोकांना निरुपयोगी ठरण्याचाच अधिक संभव दिसतो. अन्नधान्याच्या बाबतींत आज दिसून येत असलेली प्रांता प्रांतांतील व देशा देशांतील तेढ व कटु अनुभव या दृष्टिकोनांतून पाहिल्यास वरील विधानाची थोडी तरी सत्यता पटेल. यासाठी सर्व दृष्टींनीं देशाला पेलतील अशाच समतोल योजना आखण्यांत व त्वरित अमलांत आणण्यांत आज देशाचें हित आहे.

### मध्यवर्ती शास्त्रीय संशोधन संस्था

वरील योजनेचा दुसरा मुख्य भाग म्हणजे औद्योगिक क्षेत्रांतील व ही योजना अमलांत आणतांना ज्या ज्या शास्त्रिय अडचणी येतील त्या ओलांडण्यासाठी म्हणून मुद्दाम एक मध्यवर्ती शास्त्रीय संशोधन संस्था स्थापन करणें हा होय या संस्थेचें कार्य पुढील प्रमाणें त्रिविध राहीलः—

(अ) बृहन्महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख उद्योगधंद्यांतील शास्त्रीय अडचणीसंबंधी संशोधन करून योग्य उपाय शोधून काढणें; तसेंच इतर बाबतींतही मूलभूत संशोधन सतत चालविणें.

(ब) वरील संशोधनांतून निष्पन्न झालेल्या निरनिराळ्या गोष्टींचा फायदा त्या त्या उद्योगधंद्यांच्या ठिकाणीं जाऊन प्रत्यक्षांत आणून दाखविणें.

(क) मूलभूत शास्त्रीय, औद्योगिक व संशोधनात्मक शिक्षण देऊन निरनिराळ्या दर्जाचे तज्ज्ञ निर्माण करणें.

या सर्व गोष्टी साध्य करण्यासाठी आधुनिक यंत्रसामुग्रीनें व ग्रंथसंग्रहानें सुसज्ज अशी एक मध्यवर्ती शास्त्रीय संशोधन संस्था महाराष्ट्रांत स्थापन करणें किती अगत्याचें आहे हें तिच्या कार्याच्या रूपरेषेवरून ध्यानांत आलें असेलच. त्याचप्रमाणें तिच्या बरोबरच व तिच्याच शाखा म्हणून प्रत्येक लहानमोठ्या कारखान्याला जोडून एक एक आटोपशीर प्रयोगशाळाही जोडणें अवश्य आहे. कारण (ब) मध्यें वर्णन केलेल्या कार्यासाठी मुख्यतः अशांची उपयुक्तता खास आहे. मध्यवर्ती संशोधन संस्थेत अर्थातच मुख्य मुख्य म्हणजे वास्तव, रसायन, गणित, भूगर्भशास्त्र, स्थापत्य व कृषिविज्ञान या शास्त्रांचे एक एक विभाग ठेविले जातील व शिवाय ग्रंथशाळा, यंत्रालय वगैरे विभाग प्रथमपासूनच तिला जोडले जातील. हिंदुस्थानांत सध्या होऊं घातलेल्या निरनिराळ्या राष्ट्रीय (सरकारी) संशोधन संस्थांखेरीज अशा आणखी एका नवीन संस्थेची जरूरी काय? असा प्रश्न कदाचित् विचारला जाईल. त्याचें उत्तर देणें फारसें कठिण नाहीं, व थोड्याशा विचारानंतर सहज पटण्यासारखें आहे. एक तर अशा संस्थांची स्थापनाच अगदी निराळ्या तत्त्वावर केलेली आहे आणि म्हणून त्यांचा कार्यक्रमही निराळाच आहे. दुसरी गोष्ट ही कीं, सर्व जगाचा या बाबतींतील असा अनुभव आहे कीं इतर सरकारी खात्यांतील पद्धतीप्रमाणेंच अशा संस्थांचेंही कार्य अतिशय मंद गतीनें व निरुत्साहानेंच होत असतें; त्यांत आत्मीयतेची मुळीच ओढ नसते. अर्थात औद्योगिक क्षेत्रांत या गोष्टी हानिकारकच ठरतात.

अशा संशोधन संस्थेसाठी सुरुवातीस, व नंतरही मधून मधून, बरेंच भांडवल लागणार असलें तरी, तिची उपयुक्तता हेंच तिचें खरें शिफारस पत्र असल्याकारणानें खऱ्या अनुभवी कारखानदारांस व औद्योगिक नियोजकांस ती पटवून देण्याची मुळीच जरूरी नाहीं.

आमचे विमेदार व हितचिंतकांस नूतन वर्ष व दीपावलि सुखाची व भरभराटीची जावो.

—प्रथम मूल्यमापनांतील अपूर्व यश—

भक्कम आयुर्विमानिधि ★ पुढील कामासाठीं भरपूर तरतूद

विमेदारांचे संरक्षण–सेवा–सुरक्षितता या ध्येयावर चालणारी महाराष्ट्राची लोकशाही तत्त्वावर आधारलेली अद्यावत् विमा संस्था

'औंध म्युच्युअल'

लाईफ ॲश्युरन्स सोसायटी लिमिटेड,

—पुणें शहर—

★

प्रचार केंद्रें—मुंबई, मध्यप्रांत, मद्रास, हैद्राबाद (दक्षिण) यामधील प्रमुख शहरांमध्यें ठिकठिकाणीं अत्यंत आकर्षक अटींवर प्रतिनिधी नेमणें आहेत.

★

—एजन्सीचें वैशिष्ट्य—

प्रतिनिधीस कायम व वंशपरंपरा कमिशन दिलें जातें. आजच लिहा.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

दिपवाळीचें लक्ष्मीपूजन

दिपवाळीच्या दिवशीं नवीन विमा घेऊन लक्ष्मीपूजन करणें केव्हांहि हिताचें ठरेल. कारण, प्रत्येक विमा पॉलिसी ही आपल्या

★ (१) मुलाबाळांवरील प्रेमाचा दस्तऐवजी पुरावा आहे.

★ (२) कुटुंबरक्षणाची लेखी हमी आहे.

★ (३) मुलांना शिक्षणाची तरतूद आहे.

★ (४) वृद्धापकाळाचें संरक्षण आहे.

★ (५) नवीन इस्टेट करण्याचें सुलभ साधन आहे.

—विशेष माहितीसाठीं लिहा—

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, सातारा.

पुणें शाखा:—१७९ बुधवार, लक्ष्मी रोड, पुणें.

बॉम्बे लाईफ ॲश्युरन्स कंपनी लिमिटेड

(स्थापना : १९०८)

हेड ऑफिस : मुंबई

आलेलें विम्याचें काम

१९४५ — ३,१४,४९,६५० रु.
१९४६ — ३,८७,७८,७०० रु.

एकंदर मंजूर झालेले विमे

१९४५ — २,७७,२३,१०० रु.
१९४६ — ३,२८,२१,२०० रु.

पुणें, सोलापूर, अहमदनगर व सातारा जिल्ह्यांसाठी इन्स्पेक्टर्स, ऑर्गेनाइझर्स व एजन्टस नेमणें आहे.

मॅनेजर, पुणें ब्रँच
९२, रविवार पेठ, पुणें २

THE ALL INDIA GENERAL INSURANCE Co. Ltd.

*Chairman* : Ramdeo Anandilal Podar.
*General Manager* : S. B. Cardmaster.

The Company transacts business in all kinds of Insurance, such as

Fire, Life, Motor, Accident, Marine etc.

Wanted Organizers or Inspectors for Life Insurance work in Maharashtra and Karnatak Districts on Commission or salary basis. Please write to:—

Mr. B. V. BHAT, Branch Manager.
Post Box No. 570, POONA 2.

Karnatak Office : Station Road, Hubli.
Deccan States Office : Wilson Road, Laxmipuri, Kolhapur.

# राष्ट्रीय पुनर्घटना व संरक्षण

लेखकः—कॅप्टन शं. गं. चाफेकर, बी. ए., ए. आय. आर. ओ., पुणें.

पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रीय जीवनाची व उद्योगधंद्यांची घडी इतकी विस्कटून गेली, कीं ती परत सुधारण्यास अनेक वर्षे लागलीं. लाखो लोकांना आपलें नेहमीचें व्यवसाय सोडून सैन्यांत व सैन्यसामुग्रीच्या कारखान्यांत काम करावें लागलें. ज्या ठिकाणीं नित्योपयोगी वस्तू बनत त्या ठिकाणीं युद्ध साहित्याची निर्मिति होऊं लागली. युद्ध संपल्यानंतर सेवानिवृत्त सैनिक परत आले, युद्धोपयोगी सामानाचे कारखाने बंद झाले. नवे कारखाने काढण्यास वेळ लागू लागला. बेकारी वाढली. प्रत्येक राष्ट्रास युद्धांत कर्ज झाल्यामुळें तें फेडण्याकरतां सर्वजण आपलें उत्पादन वाढवण्याच्या मागे लागले, व आपला आयात व्यापार कमी करण्याचा प्रयत्न करूं लागले. त्यामुळें सर्वत्र गोंधळ माजला. या मागल्या अनुभवानें शहाणे होऊन दुसरें युद्ध चालू असतांच इंग्लंड–अमेरिकेनें युद्धोत्तर पुनर्घटनेचे बेत करण्यास सुरवात केली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीस दोस्त राष्ट्रांची युद्धाची तयारी झाली नव्हती. उलट, जर्मनी व गट्टी राष्ट्रें यांनीं युद्धाच्या आधी अनेक वर्षांपासून तयारी केली होती व युद्ध सुरू झाल्याबरोबर नागरी वस्तूंच्या कारखान्यांचे युद्धसामुग्रीच्या कारखान्यांत रूपांतर करण्याची सर्व व्यवस्था केली होती. पहिलें महायुद्ध संपल्याबरोबरच जर्मनीनें दुसऱ्या युद्धाच्या तयारीस सुरवात केली व नवे कारखाने काढताना त्यांचा युद्धाच्या वेळीं युद्धोपयोगी सामान तयार करण्यास उपयोग होईल या दृष्टीनेंच त्यांची आंखणी करण्यांत आली होती. विशेषतः पोलाद व लोखंडी मालाचे कारखाने,मोटारी,शेतीचीं आयुधें व विमान कारखाने यांची त्या दृष्टीनें आंखणी करण्यांत आली होती. युद्धापूर्वी जर्मनींत ग्लायडर व फ्लाइंग क्लब्ज आणि विमानमार्ग ह्यांचे जाळें गोअरिंगनें भावी हवाबाज तयार करण्याकरता विणलें होतें. त्यामुळें युद्धाच्या सुरवातीस जर्मनीस सर्वत्र हवाई वर्चस्व स्थापतां आलें. अमेरिकेंतील मोठाल्या मोटार कंपन्यांचें रूपांतर विमानांच्या कारखान्यांत करता आलें. शिवाय, कृत्रिम रबर, रेशीम, पेट्रोल, औषधें इत्यादि तयार करण्याकडे लक्ष देण्यांत आलें होतें. कारण, युद्ध सुरू झाल्यावर समुद्रकिनारा व सागरवर्चस्व असल्याशिवाय वरील व इतर गोष्टींची आयात साहजिकच बंद होते. हल्लीचीं युद्धें सर्व-विनाशक असतात व त्यांच्या तयारीकरतां राष्ट्राची हरएक शक्ति उपयोगांत आणावी लागते. शिवाय हल्लीचीं युद्धें केवळ स्थानिक न रहाता लौकरच तीं जगड्व्याळ बनतात व कोणताही लहान-मोठा देश त्यांतून सुटत नाहीं.

१५ ऑगस्टपासून आपण स्वतंत्र झालों आहोंत. हें स्वातंत्र्य आपण कायम टिकवलें पाहिजे. गुलामी कशी असते हें आतां आपणास माहीत झालें आहे व इतःपर पुन्हा आपल्यावर पारतंत्र्याची आपत्ति येऊं नये म्हणून आपण शक्य ती काळजी घेतली पाहिजे. जो देश संरक्षणक्षम नसतो तो आपलें स्वातंत्र्य टिकवूं शकत नाहीं. म्हणून सर्व गोष्टींच्या आधीं संरक्षणाच्या प्रश्नाकडे लक्ष दिलें पाहिजे. आपलें सैन्यबल, हवाईदल व नौकादल आपणास वाढविले पाहिजे व त्यांना नेहमी सज्ज ठेवलें पाहिजे. शिपाई आघाडीवर लढतो पण त्याला दारुगोळा, हत्यारें, पेट्रोल, कपडा, औषधें, इ. पुरवण्याचें काम मागे राहिलेल्या नागरिकांसच करावें लागतें. लढाई सुरू झाल्यावर वरील गोष्टी तयार करण्यास सुरवात केली तर योग्य सामुग्रीच्या अभावीं सुरवातीसच अपयश येईल. दुसरें महायुद्ध चालू असतांनाच हिंदुस्थान सरकारनें युद्धोत्तर पुनर्घटनेचा विचार करण्याकरता अनेक समित्या नेमल्या. कांहींनीं आपले अहवाल सादर केले आहेत. या लेखांत राष्ट्रीय पुनर्घटना करतांना संरक्षणाच्या प्रश्नाच्या दृष्टीनें कोणत्या गोष्टी करण्यांत याव्यात याचा थोडासा विचार केला आहे.

## स्वयंपूर्णतेची आवश्यकता

युद्धामध्यें कोणत्याही देशानें दुसऱ्या देशावर अवलंबून राहणें धोक्याचें असतें. कारण, ऐन वेळीं बाहेरून येणारा माल बंद झाल्यास सर्व युद्धयंत्र खिळखिळें होऊन जातें. याकरतां युद्धकालांत प्रत्येक देशानें स्वयंपूर्ण होणें आवश्यक आहे. आपण स्वयंपूर्ण आहोंत काय ? दुर्दैवानें आपण मुळींच स्वयंपूर्ण नाहीं आहोंत. जर नजीकच्या भविष्यकाळांत आपणास युद्धांत पडावें लागलें तर सामुग्रीच्या अभावीं आपणास युद्ध चालविणें अशक्य होईल. कारण विमानें, मोटारी, टँक्स, मोठ्या तोफा, रडार, वायरलेस सेटस, मशिनरी, लढाऊ व मालाच्या बोटी, फार काय, साध्या टांचण्यासुद्धा आपल्या देशांत होत नाहींत. मागल्या युद्धांत सैन्यांत कागद जोडण्यासाठी टांचण्या ऐवजी बाभळीच्या कांट्यांचा उपयोग करावा लागला. अन्न, कापड व औषधेंही आपणाकडे पुरेशीं होत नाहींत. दुर्दैवानें आपले फारच थोडे पुढारी या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष देतांना आढळतात. बहुतेक पुढाऱ्यांना या प्रश्नाचें महत्त्वच कळत नाहीं असें दुःखानें म्हणवें लागतें. या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचे भयंकर परिणाम आपणास भोगावे लागतील. बहुतेक लोकांना आधुनिक युद्धांमध्यें काय गोष्टी लागतात याची कल्पनाच नाहीं. हल्लीच्या लढ्यांत प्रत्येक शास्त्राची व विमानापासून टांचणीसारख्या क्षुल्लक वस्तूची जरूरी असते. आपली राष्ट्रीय पुनर्घटना करतांना या गोष्टी जरूर लक्षांत घेतल्या पाहिजेत.

## विमानांचे व मोटारींचे कारखाने

भावी युद्धांत विमानानेंच युद्धाचा अंतिम निर्णय होईल. हिंदुस्थानांत आज एकही विमान तयार होत नाहीं. बंगलोरच्या एका कारखान्याशिवाय अन्यत्र दुसरा विमानांचा कारखाना नाहीं व बंगलोरच्या कारखान्यांतही अजून पूर्ण विमानें तयार होत नाहींत. पहिल्या प्रतीच्या युद्धासाठी आपणास वार्षिक अंदाजें ५५–६५ हजार विमानांची जरूर लागेल. म्हणून सरकारनें ताबडतोब या धंद्याकडे लक्ष देऊन नवे विमान–कारखाने काढले पाहिजेत अथवा काढण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. विमानांची इंजिने व मोटारींची इंजिने बहुतेक एकाच तऱ्हेची असतात. युद्धकालांत मोटार इंजिन कारखान्यांचें रूपांतर विमान इंजिनाच्या कारखान्यांत सहज करतां येतें. त्या दृष्टीनें मोटारी तयार करण्याचे कारखाने सरकारनें काढावे अथवा काढण्यास उत्तेजन द्यावें. हल्लीच्या युद्धांत मुख्य वहातूक मोटारीनेंच होते व त्याकरतां हजारों मोटारी व ट्रक्स लागतात.

## कोळसा, लोखंड, इ.

युद्धांत हजारो गोष्टी लागतात, त्या करण्यास अनेक तऱ्हेचा कच्चा माल लागतो. पुष्कळसा कच्चा माल बाहेरून येतो. पण तो बाहेरून येणें बंद झाल्यास पक्का माल तयार होण्याचें बंद होतें. त्याकरतां कृत्रिम माल तयार करण्याच्या कृतीकडे आपणास लक्ष दिलें पाहिजे. अमेरिकेने मलयांतून येणारें रबर बंद झाल्यावर कृत्रिम रबर, व कोयनेल येण्याचे थांबल्यावर क्वीनॅक्रीन, मेंटॅक्रीन ही

## भोर स्टेट बँक लि., भोर

( स्थापना : १ ऑगस्ट, १९४४ )

वसूल भांडवल .... १,२५,००० रु

गंगाजळी .... .... ५३,२७३-७-० रु.

—शाखा—

पाली व शिरवळ

संचालक मंडळ

१ रावसाहेब ल. र. साने, बी. ए., एलएल. बी., दिवाण ( अध्यक्ष )
२ श्री. वा. पुं वर्दे, बी. कॉम.
३ श्री. वि. वि. वावडेकर, बी. ए, एलएल. बी.
४ श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.
५ श्री. शं. ल. लिमये, बी. एस्सी., एलएल. बी.
६ श्री. म. त्र्यं. शिंगरे
७ श्री. चंदनमल रा. राठी
८ श्री. चुनिलाल शिवराम रावळ
९ नगरभूषण ना. पां. शेपटे

अंतर्गत भागांत सर्व प्रकारच्या व्यवसायांस भांडवल पुरविणारी, भक्कम पायावर अधिष्ठित असलेली संस्था.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.),
मॅनेजर.



## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

( १ ) कोल्हापूर, ( २ ) शाहुपुरी, ( ३ ) सांगली, ( ४ ) मिरज, ( ५ ) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजे) | ... | ३८,००,००० |

—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—

नामदार बी. बी. पाटील
B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर सांगली स्टेट.
चेअरमन

एल. एन. शहा
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर



## —एक हजार रुपये—

दर वर्षी दिवाळी पाडव्याला रुपये एकशें चाळीस प्रमाणें फक्त पांच वर्षें हप्ते देऊन म्हणजे एकंदर रुपये सातशें फक्त भरून एक हजार रुपये रकमेचा विमा ( नफ्यासह ) घेतां येईल.

आमचे विमेदार व भागीदार यांना नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.

अध्यक्षः—श्रीमंत जगन्नाथ महाराज पंडीत

मॅनेजरः—व्ही. एच. देशमुख, बी. ए.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि., पुणें

—हेड ऑफिस—

६ बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें

शाखाः—मुंबई, मद्रास, नागपूर, सोलापूर, पंढरपूर इ.



## मोटार विम्यासंबंधीं आवश्यक गोष्टीः—

१ विमा कंपनीची चोख व्यवस्था व आर्थिक स्थैर्य
२ विमा कंपनी चालक स्वतः मोटार धंद्यांतील अनुभवी असल्यास उत्तम. कारण, मोटार मालकांच्या अडीअडचणीकडे पूर्ण लक्ष राहतें.
३ प्रीमिअमचे माफक दर.
४ हप्त्यानें प्रीमिअम भरण्याची सोय.
५ मोटार मालकांच्या सोयीसाठीं योग्य अशा इतर सवलती.

—या सर्व दृष्टींनीं मोटार मालक स्वतःची म्हणून—

## दि मोटार ओनर्स म्यूच्युअल इन्शुरन्स कं. लि.

हीच कंपनी अधिक पसंत करतात

मुख्य कचेरी—जाधव बिल्डिंग, फोर्ट रोड, बेळगांव.
पुणें शाखा—९७४, सदाशिव पेठ, कॉमनवेल्थ नजीक, लक्ष्मी रोड, पुणें २.
कोल्हापूर शाखा—पोवार बिल्डिंग, शिवाजी रोड, बिंदू चौकाजवळ, कोल्हापूर.

औषधें काढली. जर्मनी पेट्रोलच्या बाबतींत स्वयंपूर्ण नव्हता म्हणून जर्मनीनें लाखों टन कृत्रिम पेट्रोल कोळशापासून तयार केलें. आपल्या सरकारनें व व्यापारी कंपन्यांनीं हजारों शास्त्रज्ञांना नवे शोध लावण्याकरतां सहाय केलें पाहिजे. त्यांच्या परिश्रमाचें फळ औद्योगिक वाढीला कारणीभत होईल. हिंदुस्थानांत कोळसा व लोखंड विपुल आहे. हिंदी कारखानदार व मालक त्यांचें उत्पादन वाढवण्याचा प्रयत्नच करत नाहींत. हजारो टन कोळसा वाया जात आहे. ज्या ठिकाणीं दुय्यम प्रतीचा कोळसा वापरावयास पाहिजे तेथें आपण पहिल्या प्रतीचा कोळसा वापरतो. युद्धकाळांत आपणास अंदाजें १ कोटी टन लोखंड व पोलादाची निपज करतां आली पाहिजे. पण सध्या आपल्याकडे जेमतेम १० लाख टन लोखंड व पोलाद पैदा होतें. पोलादाच्या टंचाईमुळें व सिमेंटच्या अभावामुळें आज घर बांधणीचा प्रश्न विकट होऊन बसला आहे. लढाईत बंदुका, टँक्स, तोफा, जहाजें, हत्यारें व तीं तयार करण्याकरतां लागणारी यंत्रसामुग्री याकरता पोलादाची जरूरी आहे. कोळसा व पोलाद यांची पैदास वाढविल्यास शांततेच्या काळांत मध्य आशियापासून चीनपर्यंतचा वेढा आपणास काबीज करता येतील.

### नौकानयन

हिंदी नौकानयनाचा धंदा अगदीच बाल्यावस्थेंत आहे. इंग्लंडचें व अमेरिकेचें टनेज दोन कोटींच्या घरांत आहे, तर आपली मजल अजून ३ लाखांपलीकडे गेली नाहीं. इंग्लंड केवळ जहाजांच्या सहायानें झालेल्या मालाच्या व अन्न सामुग्रीच्या पुरवठ्याच्या जोरावर परवाच्या युद्धांत टिकाव धरूं शकलें. हिंदुस्थानास आजूबाजूच्या देशांतील बाजारपेठा काबीज करण्यास नौकांची जरूरी आहे. युद्धाच्या वेळीं बाहेरून माल आणण्यास स्वतःच्याच बोटी हव्यात व त्यांचें संरक्षण करण्याकरतां बलवान आरमार व हवाई दल पाहिजे. पुढील दहा वर्षांत निदान ५० लाख टनांच्या बोटी बांधल्या किंवा विकत घेतल्या पाहिजेत. बोटी बांधण्याचे कारखाने सुरू केल्यास हजारों कामगारांस काम मिळून आपण स्वयंपूर्ण होऊं शकूं. सध्यासुद्धां स्वतःच्या बोटी नसल्यामुळें बाहेरून धान्य लवकर आणतां येत नाहीं. किनाऱ्यावरील वहातूक हिंदी कंपन्यांकरतां राखून ठेवल्यास नौकानयनास प्रोत्साहन मिळेल. आपलें नाविक दल हल्लीच्या पेक्षा अनेकपट वाढवलें पाहिजे; त्याशिवाय तें आपल्या व्यापाराचें संरक्षण करूं शकणार नाहीं. हल्ली सगळीकडे कापडाचें दुर्भिक्ष्य आपण पहातच आहोंत. युद्ध काळांत जपान व इंग्लंडहून येणारें कापड बंद झाल्याबरोबर आपणास कापडाची टंचाई भासूं लागली. भावी युद्धांत तीच आपत्ति येईल. हिंदुस्तानांत एवढा कापूस होऊन आपणास कापडाची टंचाई का भासावी हें कोडें आहे. भावी युद्धांत कापड टंचाई टाळायची असल्यास आमच्या कारखानदारांनीं परदेशांतून नव्या गोष्टी घेतल्या पाहिजेत व त्यांनीं संशोधकांस मदत केली पाहिजे.

### उत्पादनाचें रूपांतर

आपल्याकडे मूलग्राही महत्वाचे धंदे अजून फारसे नाहींत. सरकार औद्योगीकरणाकडे लक्ष देत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. पण सरकारनें नवे उद्योगधंदे सुरू करतांना किंवा नव्या धंद्यांना उत्तेजन व संरक्षण देतांना युद्धकाळांत त्या धंद्यांचा देशाच्या संरक्षणाकरतां कसा उपयोग करतां येईल याचा नीट विचार आतांच केला पाहिजे, म्हणजे युद्धाचे वेळीं या धंद्यांचें युद्धधंद्यांत रूपांतर करणें सोपें जाईल. संरक्षणाकरतां व युद्धाकरतां ज्या हजारों गोष्टी लागतात त्या आपल्या देशांत तयार करण्याकरतां प्रोत्साहन दिलें पाहिजे व शांततेच्या काळीं नागरी जीवनास उपयोगी पडणाऱ्या वस्तूंच्या कारखान्यांचें रूपांतर युद्धोपयोगी कारखान्यांत करतां येईल अशा तजविजी आतांच कल्या पाहिजेत. उदा० पाण्याचे नळ तयार करणाऱ्या कारखान्यांचें बंदुका तयार करण्याच्या कारखान्यांत सहज रूपांतर करतां येईल. ट्रॅक्टर्सच्या कारखान्यांचें रूपांतर टँक्सच्या कारखान्यांत करतां येईल. त्याचप्रमाणें, रासायनिक कारखान्यांत स्फोटक द्रव्यें तयार करतां येतील. शांततेच्या काळांत वेगवेगळीं रसायनें तयार करतां येतील. आपल्याकडे पुरेसें क्लोरीन, सोडा सुद्धां तयार होत नाहीं. शेतीच्या खताकरतांही आपण दुसऱ्यावर अवलंबून आहों. शिवाय एकाच किंवा कांहीं थोड्या ठिकाणीं उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण करणेंही धोक्याचें असतें. कारण थोड्याशा बाँब हल्ल्यानें हीं केंद्रें नष्ट करतां येतात. त्याकरता, मोठ्या औद्योगिक केंद्रांऐवजी अनेक लहान केंद्रें स्थापन करावीं. त्यामुळें मोठीं घाणेरडीं औद्योगिक केंद्रें होण्याऐवजी आरोग्यशाली लहान केंद्रें निर्माण होतील. शिवाय भूमिगत कारखान्यांची तयारी आतांपासून केली पाहिजे व त्याकरतां नवे कारखाने काढतांना योग्य जागांची निवड केली पाहिजे. नव्या पुनर्घटनेच्या योजनांमध्यें रस्ते, रेल्वे, कालवे व विजेच्या उत्पादनाच्या योजना आहेत. विशेषतः रस्ते, रेल्वे व विजेच्या कारखान्यांची वाढ करताना व्यापार व वाहतुकीप्रमाणेंच या गोष्टींची वाढ संरक्षणाकरता कशी करता येईल हें पाहिलें पाहिजे. पुढें असलेल्या सैन्यास सर्व गोष्टींचा पुरवठा मागून हात असतो व दळवणवळणाचीं योग्य साधनें नसतील तर सैन्यास शस्त्र व सामुग्रीच पुरवठा होणें कठीण पडेल.

वरील विवेचनावरून संरक्षण व पुनघटना यांचा किती घनिष्ट संबंध आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. प्रांतक व मध्यवर्ती सरकारनें पुनर्घटनेच्या योजना आंखताना लष्करी तज्ञांचा सल्ला जरूर घेतला पाहिजे; नाहीं तर युद्धकाळांत मोठीच आपत्ती ओढवेल.

पायोनियर डाइंग हाऊस
लिमिटेड, पुणें
★ रंगीत चिटाचे व्यापारी ★
६२५, सदाशिव, पुणें २.

पैसा मिळविण्यास
सुद्धां संधी मिळावी लागते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यानें मशिनरी युगाचें नवें दालन उघडलें आहे. धडाडीनें पुढें या व आपल्या कर्तबगारीस पूर्ण वाव द्या. शिक्षणापासून धंद्यापर्यंत आम्ही मदत देऊं.
—भेटा अगर लिहा—
गायके ॲन्ड को.,
ऑटोमोबाईल इंजिनिअर्स,
शंकरशेट रोड, पुणें २.




प्रकाशपात्रें
चांदीचा कोट दिलेलीं
नित्योपयोगी भांडीं



बनविणार
अुद्यम इंजिनिअरिंग लि.
२८२ शुक्रवार पुणे




दिवाळी आणि भाऊबिजे दिवशीं
स्नान केल्यानंतर-
सुरंगा



हेअर आईलचे थोडे थेंब
केसांवर टाका. दिवाळीच्या
आनंदात त्याचा सुगंध खास
भर घालील.

| अबला संजीवनी. | कुमारी आसव नं. ३ |
|---|---|
| स्त्रियांचे सर्व विकारांवर अप्रतिम. | यकृत, पान्थरी वगैरे मुलांचे सर्व विकारांवर उत्कृष्ट |

हें वर्ष आमचे ग्राहकांस आनंदाचें जावो

राजवैद्य गुणे यांचा
शाहू आर्यौषधि कारखाना लिमिटेड.
कोल्हापूर

# राजा रघुनाथराव मिल, भोर

-प्रोप्रायटर्स-

## महाराष्ट्र टेक्स्टाइल्स लि., भोर व पुणें

भोरमधील कापडाचा हा पहिला कारखाना, भोर संस्थानांतील शेतकरी वर्गाची कापडाची गरज भागवीत आहे.

फाटक आणि कंपनी
मॅनेजिंग एजंटस्

# आंतरराष्ट्रीय व्यापारी धोरणाचीं आंदोलनें

लेखकः—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए.

अर्थशास्त्राचीं तत्त्वें सापेक्ष असतात याचें प्रत्यंतर गेल्या एक-दोन वर्षांतील जागतिक व्यापारी धोरणावरून पुन्हा एकदां स्पष्टपणें येत आहे. महायुद्धानंतरच्या काळांत अमेरिकेच्या प्रेरणेनें 'आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटने'ची ( आय. टी. ओ. ) कल्पना निर्माण झाली, व त्या कल्पनेच्या पुरस्कारामध्येंहि अमेरिकेच्या वाढत्या उत्पादनशक्तीमुळें व विक्री मालाला जागतिक बाजारपेठा खुल्या असाव्या ह्या कल्पनेमुळें, अमेरिकेचें व्यापार-वाढीचें धोरण दिसून येत होतें. अमेरिकेनें पुरस्कृत केलेल्या कल्पनेची बरीचशी छाननी लंडन व नंतर अगदी अलिकडे जिनिव्हा येथील परिषदांतून करण्यांत आली. जिनिव्हा परिषदेच्या शेवटीं व्यापारी संघटनेचा दुरुस्त आराखडा तयार झाला आहे, व तयार झालेल्या ह्या दुरुस्त आराखड्यावरूनहि अमेरिकेची जागतिक खुल्या व्यापारवृद्धीची मूळची कल्पना निरनिराळ्या सदस्य राष्ट्रांकडून किती प्रमाणांत स्वीकारली जाते व तिला किती फाटे फुटतात याबद्दल संशय वाटतो. नोव्हेंबरमध्यें हवाना येथें पुन्हां एकदां सभासद राष्ट्रांची परिषद भरून व्यापारी संघटनेचा शेवटचा दुरुस्त आराखडा मान्य करण्यांत येणार आहे. पूर्वींप्रमाणें हिंदुस्थानचेंहि प्रतिनिधी हवाना परिषदेला हजर रहात आहेत.

### एकमत होण्यांतील अडचणी

आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेची कल्पना तत्त्वतः चांगली असली तरी निरनिराळ्या राष्ट्रांतील भिन्न भिन्न आर्थिक परिस्थिति, कांहीं राष्ट्रांचें मोठ्या प्रमाणांतील औद्योगीकरण, कांहींचें कृषिप्रधान स्वरूप, कांहींचें परावलंबी व्यापारी स्वरूप, कांहीं राष्ट्रांचें स्वातंत्र्य परंतु व्यावहारिक आर्थिक पारतंत्र्य व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आर्थिक व्यवहारांतील भिन्न भिन्न दृष्टिकोन, या सर्व अनेक फरक व भेद असलेल्या परिस्थितीमुळें, कोणत्याहि तात्त्विक प्रश्नावर एक मत होणें फार कठीण. कारण, प्रत्येकाच्या आर्थिक गरजा निरनिराळ्या स्वरूपाच्या असतात. ह्या असमान परिस्थितींतच आणखी विषमता दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामांमुळें, गेल्या एक-दोन वर्षांतील अन्न-टंचाईमुळें, त्याचप्रमाणें भांडवली मालाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें व डॉलर तुटवड्यामुळें जास्त तीव्र प्रमाणांत निर्माण झाली आहे. भांडवलशाही अर्थशास्त्र व सोव्हिएट पद्धतीचें कॉम्युनिस्ट अर्थशास्त्र या दोन भिन्न दृष्टिकोनांच्या वर्चस्वामुळेंहि ही विषमता आणखी वाढली आहे. एक-दोन वर्षांतच जागतिक परिस्थितींत इतके महत्त्वाचे बदल झाले आहेत कीं अमेरिकेचे क्लेअर विल्कॉक्स यांची आय. टी. ओ. स्थापन करण्यांतील सुरवातीची कल्पना खुद्द अमेरिकेलाहि, त्या देशावर आर्थिक अरिष्ट कोसळल्यास, कितपत मानवेल याबद्दल काळच निर्णय देऊं शकेल.


### मूळ तत्त्वांना मुरड


जागतिक आंतरराष्ट्रीय व्यापार खुल्या दिलानें चालावा, व्यापाराचे बाबतींत कृत्रिम किंवा जकातींचीं बंधनें असूं नयेत, कच्च्या मालाच्या व पक्क्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठा सर्व देशांना खुल्या असाव्या, कोठेंहि बेकारी असूं नये इ. कल्पना मूळच्या आय. टी. ओ. च्या मसुद्यांत होत्या. परंतु लंडन, जिनिव्हा इ. परिषदांत झालेल्या चर्चेंतून व तेथें व्यक्त झालेल्या विचारप्रवाहांतून हीं सर्व तत्त्वें व्यवहारांत फारच मर्यादित किंवा संकुचित स्वरूपांत वापरलीं जावीं अशाच तऱ्हेचा अर्थबोध निघतो. अमेरिकेला विक्री-मालासाठी बाजारपेठा खुल्या पाहिजे आहेत, तर ऑस्ट्रेलियासारख्या अगदी












लहान लोकवस्तीच्या व युद्धकाळांत औद्योगिकरण झालेल्या देशाचा भर प्रत्येकाला पूर्ण काम मिळण्यावर आहे, इंग्लंडला साम्राज्यान्तर्गत देशांशीं सवलतीच्या तत्त्वावर व्यापार करणें अनेक कारणांनीं फायदेशीर वाटतें, कांहीं देशांना अमेरिकेच्या आहारीं जाणें योग्य वाटत नाहीं, हिंदुस्थानसारख्या औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या देशाला प्रथम अंतर्गत उत्पादन वाढीवरच विशेष भर देणें फायदेशीर आहे व कॅनडासारख्या देशाला अमेरिका व इंग्लंड या दोहोंशींहि चांगले संबंध ठेवणें फायद्याचें आहे. हीं सर्व मतें जिनिव्हा परिषदेंत चर्चेमध्यें सुचविण्यांत येऊन यांपैकीं कांहींचा स्वीकारहि करण्यांत आला. मूळच्या योजनांना इतके भिन्न भिन्न अपवाद किंवा पर्याय सुचविण्यांत आले आहेत कीं कोणत्याहि राष्ट्राला त्यांचा पूर्णपणें फायदा घेतां येऊन आपल्या इच्छेनुसार व्यापारी धोरणाची अंमलबजावणी किंवा आंखणी करतां येणें अशक्य होणार नाहीं. मक्तेगिरीनें किंवा धंदेवाइकांच्या संघटनेमुळें उत्पादन मर्यादेंत ठेवतां येतें व त्यामुळें बाजारभाव वाढतात. या बाबतींत आय. टी. ओ. ला फक्त तक्रारी ऐकून घेण्याचा अधिकार मान्य करण्यांत आला आहे. हा तक्रारी ऐकण्याचा अधिकार, परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें उपयोगी पडूं शकेल काय ? यामुळें फार तर नैतिक दडपण निर्माण होऊं शकेल एवढेंच. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांना जकाती वाढविण्याचा अधिकार मान्य करण्यांत आला आहे. आयात व निर्यात या बाबतींत ह्या दोहोंचें प्रमाण जरूरीइतकेंच ठेवण्यांत यावें अशा आशयाच्या सूचना मान्य करण्यांत आल्या आहेत. १९५२ पर्यंत निरनिराळ्या सदस्य राष्ट्रांना वरील प्रकारच्या अनेक सवलती मान्य करण्यांत आल्या आहेत. याचा निराळ्या भाषेंत सरळ अर्थ असा कीं, १९५२ पर्यंत आय. टी. ओ. चीं मुख्य तत्त्वें जवळ जवळ कागदावरच राहून राहाणार.

### आय. टी. ओ. चें भवितव्य

आजच परिस्थितीच्या अपरिहार्यतेमुळें ब्रिटननें व इतर राष्ट्रांनीं डॉलर्सचा खर्च शक्य तितका कमी केला आहे. ब्रिटनची बहुतेक भिस्त साम्राज्यान्तर्गत व्यापारवृद्धीवरच दिसते. मार्शल योजना स्वीकारली जाईल तरच पश्चिम युरोपाच्या व्यापाराला अमेरिकेच्या मदतीमुळें नवें वळण लागेल. रशियाचें अलिकडचें धोरण व कॉमिंटर्नची पुन्हा स्थापना यामुळें जागतिक व्यापाराला आणखी निराळ्या तऱ्हेनें वळण लागणें संभवनीय दिसतें. पाकिस्तान व हिंदी संघराज्य यांचा परराष्ट्रीय व्यापार परकी भांडवलाची औद्योगिकरणासाठीं मदत, उत्पादन शक्तींत सुधारणा व दोहोंचे परस्पर संबंध ह्यांवर अवलंबून राहाणार आहे. दुसरें महायुद्ध संपल्यानंतरच्या काळाचा आढावा घेतला म्हणजे आतांपासून १९५२ पर्यंत जगांत उत्पादन, अन्नपरिस्थिति, औद्योगिक पुनर्घटनेचे कार्यक्रम इ. गोष्टींची परिस्थिति कशी बदलेल याबद्दल अंदाज करणें कठीण आहे. आंतरराष्ट्रीय बँक पुनर्घटनेसाठीं कर्जे देऊं शकत नाहीं, किंवा आंतरराष्ट्रीय चलननिधि डॉलर टंचाई दूर करूं शकत नाहीं व सदस्य राष्ट्रांना परदेशीं नाणें त्याला उपलब्ध करून देतां येत नाहीं, असा अनुभव नुकताच आला आहे. या सर्व घटनांचा अर्थ असा दिसतो कीं, आय. टी. ओ. ही होऊं घातलेली संस्था आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रश्न सर्वांना फायदेशीर ठरेल अशा प्रकारें सोडवावयास असमर्थ ठरेल, व ह्या व्यापाराचें स्वरूप देशादेशांच्या सापेक्ष परिस्थितीवरच अवलंबून राहील.

---


# डेक्कन मर्चंटस को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मुख्य कचेरी २०२४५ | ११७ चर्नीरोड, मुंबई ४ | दादर शाखा ६१०४५

स्वातंत्र्यासमवेत येणारी
★ नूतन दिवाळी ★
आमच्या हितचिंतकांस सुखाची जावो.

★ आमच्याकडे योग्य तारणावर कर्ज दिलें जातें. त्याचप्रमाणें, सरकारी व इतर कर्जरोख्यांची देवघेव होते.

★ नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटस् विकत घेऊन दिलीं जातात व इतर सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ दरवर्षी ६ टक्के डिव्हिडंड देण्यांत आलें आहे.

मॅनेजिंग डिरेक्टर

# दि कोल्हापूर मराठा को. बँक, लि.

कोल्हापूर.

| | रुपये |
|---|---|
| उभारलेलें शेअर भांडवल | २,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | ६३,१४७ |
| रिझर्व्ह फंड | २३,९१३ |
| इतर फंडस् | २३,४३३ |

बँकिंगचा सर्व प्रकारचा व्यवहार केला जातो.

ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

व्ही. एन. यादव, अॅ. मॅनेजर. | कर्नल के. एस. खानविलकर, प्रेसिडेंट.

# युद्ध सुरू झालें, तर कोण कोणाशीं लढेल ?

अमेरिका व रशिया ह्यांचेमध्यें युद्ध सुरू झालेंच, तर जगांतील बाकीचे देश आपल्यालाच मिळतील, असें ह्या दोन्हीं बलवत्तर राष्ट्रांना वाटत आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कक्षेबाहेर युद्धास प्रारंभ झाला, तर अमेरिकेच्या बाजूस ४१ कोटी लोकांचा पाठिंबा मिळेल व रशियास २९ कोटी लोक उचलून धरतील असा अंदाज रिअर ॲडमिरल ई. एम. झकारियस, यु. एस. एन. (रि.) ह्यांनीं 'युनायटेड नेशन्स वर्ल्ड' मधील आपल्या एका लेखांत व्यक्त केला आहे. आशियांतील देशांपैकी चांग कै शेकचा ३० कोटी नागरिकांचा चीन अमेरिकेस मदत करील; परंतु १० कोटी चिनी कम्युनिस्ट रशियास सहाय्य करतील, अशी अपेक्षा आहे. युद्धाचे प्रारंभीं ५ कोटी युरोपियन लष्करी दृष्ट्या तटस्थ रहातील, ३९ कोटी हिंदी व पाकिस्तानी लोकहि तटस्थपणा स्वीकारतील व जगांतील इतर २६ कोटी लोकांसहि कोणती बाजू घ्यावी हें सांगतां येणार नाहीं.

तटस्थपणाच्या वृत्तीस वास्तविक स्थान असता कामा नये, परंतु युद्धमान राष्ट्रांपैकी कोणाची बाजू न्यायाची आहे, हें सांगणें कठीण होऊन बसत जात असल्या कारणानें जबाबदार लोकांनाहि आपण होऊन बऱ्या--वाईटाचा निकाल लावतां येऊं शकत नाहीं अशी परिस्थिति आहे. संयुक्त राष्ट्रसंघामध्यें आतां पेंच प्रसंग निर्माण झालेले आहेत, आणि कोणत्याच महत्त्वाच्या प्रश्नावर आवश्यक तें एकमत न झाल्याकारणानें संघटनेचें सामर्थ्य कमकुवत ठरत आहे. रिअर ॲडमिरल झकारियस ह्यांनीं संभाव्य युद्धमान राष्ट्रांचा ताळेबंद तयार केला आहे, तो येथें उद्धृत केला आहे.

## संभाव्य मित्र–शत्रू

| पश्चिम गट | लोकसंख्या (लक्ष) |
|---|---|
| अमेरिका | १४०० |
| ब्रिटन × | ४८० |
| अर्जेंटिना × | १४० |
| ऑस्ट्रेलिया × | ७० |
| ब्राझील × | ४५० |
| कोलंबिया † | १०० |
| कॅनडा | १२० |
| इजिप्त † | १७० |
| ग्रीस × × | ८० |
| इराण † | १५० |
| इराक † | ४० |
| न्यूझीलंड × | २० |
| फिलिपाइन्स × † | १६० |
| सौदी अरेबिया † | ५० |
| द. आफ्रिका | ११० |
| तुर्कस्थान | १९० |
| इतर | ४१० |
| एकूण, पश्चिम गट ... | ४१४० |

| तटस्थ | लोकसंख्या (लक्ष) |
|---|---|
| बेल्जम | ८० |
| डेनमार्क | ४० |
| हिंदुस्थान | ३८८० |
| आयर्लंड | ३० |
| नेदरलंड्स | १०० |
| नॉर्वे | ३० |
| पोर्तुगाल | ८० |
| स्वीडन | ७० |
| स्वित्सरलंड | ४० |
| एकूण, तटस्थ ... | ४३५० |

| संभाव्य बंडाळी | लोकसंख्या (लक्ष) |
|---|---|
| चीन | ४५७० |
| फ्रान्स | ४०० |
| इटली | ४६० |
| स्पेन | २७० |
| एकूण, बंडाळी | ५७०० |

| सोव्हिएट गट | लोकसंख्या (लक्ष) |
|---|---|
| रशिया | २००० |
| अल्बेनिया † | १० |
| बल्गेरिया | ७० |
| झेकोस्लोव्हाकिया × | १४० |
| फिनलंड × | ४० |
| हंगेरी × | ९० |
| मोंगोलिअन रिपब्लिक † | १० |
| पोलंड × | २५० |
| रुमेनिया | १६० |
| युगोस्लाव्हिया × | १६० |
| एकूण, सोव्हिएट गट... | २९३० |

| अनिश्चित | लोकसंख्या (लक्ष) |
|---|---|
| अफगाणिस्तान | १२० |
| आफ्रिका ० | ८० |
| ब्रह्मदेश | १५० |
| चिली | ५० |
| डच ई. इंडीज | ६७ |
| इंडोचायना | २५ |
| लेबेनॉन | १० |
| मलाया | २० |
| मेक्सिको | २५० |
| सयाम | १६० |
| सिरिया | ३० |
| वेनेझुएला | ४० |
| येमेन | ४० |
| एकूण, अनिश्चित | २५९० |

### ह्यांचें काय होणार !

जर्मनी (७ कोटी) व ऑस्ट्रिया (७० लक्ष) ह्यांवर रशिया तात्काळ स्वारी करील, परंतु त्यांचा मानसिक कल अमेरिका-इंग्लंडकडे राहील. जपान (७ कोटी) पूर्वी शत्रुपक्षीय होता, तरी पश्चिम गटाकडे तो येईल.

× बरीच अशांतता होईल.

† नव्या तंत्राजोगें लष्कर उभारण्यास असमर्थ.

० ह्यांत ईजिप्त, फ्रेंच वसाहती व द. आफ्रिका ह्यांचा समावेश नाहीं.

× × भयंकर यादवीचें केंद्र.

आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४





## साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें!

साठे बिस्किट कंपनी, पुणें २




पुणें चीफ एजंट:—

न्यू दत्त एजन्सी
१०० रविवार पेठ









# मुंबई प्रांतांतील खाद्य पदार्थांचा पुरवठा

लेखक—: श्री. न. गं. आपटे, बी. एजी., जलशास्त्रपारंगत, पुणें

हिंदुस्थानांतील सर्वच प्रांतांपुढें सध्या खाद्यपदार्थांच्या तुटवड्याचा प्रश्न उभा आहे. त्याचप्रमाणें तो मुंबई प्रांतापुढेंही आहे. सर्व साधारण विचार करतां, मुंबई प्रांतापुढें तरी हा प्रश्न उभा राहूं नये असें वाटतें. युद्धपूर्व परिस्थितींत महाराष्ट्रांतील तुटवड्याच्या भागांत, त्या भागांस लागून असलेल्या निजाम हद्दींतील गोदावरी, मांजरा, भीमा आदिकरून नद्यांच्या गाळवट पात्रांतील उत्पन्न झालेलें धान्य मिळत असें व पडत असलेली तूट भरून निघत असे. हा पुरवठा युद्धकालांतील नियंत्रणांनीं बंद झाला. त्याचवेळीं येथील राज्यकर्त्यांनीं उत्पादन वाढविण्याकडे लक्ष देणें अगत्याचें होतें. यांतच अधिक उत्पादन करणाऱ्या पंजाब प्रांताची फाळणी होऊन त्या प्रांतांतील उत्पादन तर घटलेंच परंतु तेथील प्रजेचे अनन्वित हाल होऊन निदान १।२ वर्षे तरी त्यांनाच पुरवठा करावा लागेल इतकी नासधूस झाली. सिंध तर पाकिस्तानांतच गेला. अशा रीतीनें स्वराज्याबरोबर देशांत विघटना व उत्पादनांत घट या दोन्हीही गोष्टी त्यामागोमागच आल्या.

मुंबई प्रांताचा विचार करतां त्याचे मुख्यतः चार विभाग पडतात. ते म्हणजे गुजराथ, महाराष्ट्र, कोंकण व कर्नाटक. या चारही विभागांत हवामान व भूगर्भ यांत फरक असून त्यामानानें पिकांचे उत्पादनांत फरक आहे.

### प्रांताच्या चार विभागांतील उत्पादन

गुजराथ हा भाग समुद्रालगत असून साबरमती, माही, नर्मदा व तापी या चार नद्यांनीं परप्रांतांतून वाहून आणलेला गाळ नद्यांचे मुखाभोंवताली साठून बनलेला आहे. अर्थातच हा साधारणपणें मळी जमीनीसारखा असून त्याचप्रमाणें सुपीकही आहे. या भागाचें एकूण क्षेत्र अंदाजें ६५ लक्ष, २६ हजार एकर असून पिकाखालील क्षेत्र ४५ लक्ष, २२ हजार एकर आहे. यांतील खाद्य पदार्थांचे पिकाखालीं २७ लक्ष, ५ हजार एकर इतकें आहे. बाकीचें क्षेत्र म्हणजे १८ लक्ष, १६ हजार एकर अन्य पिकांखालीं आहे. या भागांत ४३–४४ सालीं एकंदर खाद्यपदार्थांचें उत्पादन ७ लक्ष, ५४ हजार टन झालें आहे. गुजराथमधील लोकसंख्या ४० लक्ष, ९२ हजार इतकी आहे. त्या मानानें दर माणशीं ५०० पौंड या हिशेबानें या प्रांतांतील उत्पादन ७५ टक्के लोकसंख्येला पुरेल एवढें आहे.

महाराष्ट्राचा विचार करतां महाराष्ट्राचें एकूण क्षेत्र २ कोटि, ३८ लक्ष, ९० हजार एकर आहे. त्यांतील पिकाखालील क्षेत्र १ कोटि, ५० लक्ष एकर आहे. यापैकी १ कोटि, १६ लक्ष, २७ हजार एकर क्षेत्र खाद्य धान्याखालीं आहे. इतर पिकांखालील क्षेत्र ३३ लक्ष, ४३ हजार एकर आहे. या क्षेत्रांत १७ लक्ष, ४५ हजार टन धान्य निर्माण झालें. महाराष्ट्रांतील लोकसंख्या ८१ लक्ष, ९७ हजार आहे व दर माणशीं ५०० पौंड प्रमाणें या भागांतील एकूण ८५ टक्के प्रजेस पुरेल एवढें धान्य निर्माण झालें आहे.

कर्नाटकाची परिस्थिति साधारणपणें महाराष्ट्रासारखीच आहे. एकूण क्षेत्र ९५ लक्ष, ४४ हजार एकर असून पिकाखालील क्षेत्र ६४ लक्ष, ११ हजार एकर आहे. त्यापैकी खाद्य धान्याखालील क्षेत्र ४५ लक्ष, ६३ हजार एकर आहे. या क्षेत्रांत ५ लक्ष, ८२ हजार टन धान्य निर्माण झालें आहे. कर्नाटकाची लोकसंख्या ३४ लक्ष, २ हजार आहे. दर माणशीं ५०० पौंड या मानानें सुमारे ८५ टक्के लोकसंख्येस पुरेल एवढें उत्पादन या भागांत आहे.

कोंकणचा विचार म्हणजे डोंगराळ भागाचाच विचार आहे. यांतील एकूण क्षेत्र ८७ लक्ष, ६२ हजार एकर आहे. पण पिकाखालील क्षेत्र अवघें २० लक्ष, ६५ हजार एकर आहे. त्यापैकी खाद्य धान्याखालील क्षेत्र १६ लक्ष, ७ हजार एकर असून त्यांत ४ लक्ष, ६२ हजार टन धान्य उत्पादन झालें आहे. माणशीं ५०० पौंड या हिशेबानें सुमारें १८ लक्ष, ५० हजार लोकसंख्येस पुरेल एवढें धान्य पिकतें. परंतु येथील लोकसंख्या मात्र ५१ लक्ष, ७७ हजार आहे. म्हणजे सुमारे ३६ टक्के लोकसंख्येस पुरेल एवढेंच धान्य आहे व ६४ टक्के लोकसंख्येस धान्याची उणीव आहे.

मुंबई प्रांताचा याप्रमाणें विचार करता गुजराथेंत शेकडा २५ प्रजेस अन्नाची तूट तर महाराष्ट्रांत सुमारे १५ टक्के तूट, कर्नाटकांतही १५ टक्के व कोंकणांत मात्र सुमारें ६५ टक्के एवढी तूट आहे. यांतील कोंकणांतील तूट भरून निघणें कठीण आहे. कांहीं प्रमाणांत ही तूट भरून निघूं शकेल परंतु निदान ५० टक्के तूट ही कायम रहाणारच. म्हणजे अंदाजी दरसाल ६ लक्ष टन धान्य कमी पडणार. कोंकणांतील बरेचसे लोक मुंबईस जातात व कोळी वगैरे लोकांच आहारांत माशांचा उपयोग होतो त्यानें कांहीं तूट भरून निघाली तरी निदान २५ टक्के तूट ही कायम राहील आणि ही तूट शेजारचे भागांनीं भरून काढावी अथवा ज्या भागांस येथील मजुरांची आवश्यकता वाटेल त्या भागानें भरून काढावी. यास मुख्य कारण म्हणजे कोंकण भागांत आज तरी कपास वगैरे सारखें द्रव्योत्पादक पीक निघण्यास वाव नाहीं व येथें इतर पिकें अर्धी १ टक्क्या-इतकींही नाहींत.

इतर विभागांचा विचार करतां गुजराथमध्यें सुमारें ११ टक्के जमीन द्रव्योत्पादक पिकाखाली आहे, त्याचप्रमाणें कर्नाटकांत १४ टक्के जमीन व महाराष्ट्रांत अवघी ८ टक्के जमीन द्रव्योत्पादक पिकाखाली आहे. हे आकडे १९४२–४३ सालांतील मुद्दाम दिले आहेत. १९४४–४५ सालांतील विचार करतां कपाशीची लागवड गुजराथ व कर्नाटक यांचे मानानें महाराष्ट्रांत बरीच कमी करण्यांत आली आहे. उत्पादनाचा विचार करतांना महाराष्ट्रानें कपाशीखालील क्षेत्र कमी करून सुमारें १ लक्ष, ५० हजार टन धान्य जास्त निर्माण केलें. त्याचप्रमाणें कर्नाटकानें सुमारें ३ लक्ष, ७१ हजार टन धान्य जास्त निर्माण केलें व तूट भरून काढून कांहीं भाग दुसऱ्या भागांस देण्याजोगी परिस्थिति निर्माण केली. गुजराथमध्यें मात्र धान्याचा तुटवडा वाढला, तो २ लक्ष, ६९ हजार टनांवरून ३ लक्ष, १६ हजार टनांवर गेला. गुजराथ हा कर्नाटकाप्रमाणेंच सुपीक प्रांत असून येथें उत्पादन कमी झालें.

या आकड्यांवरून कोणकोणत्या भागांत कसकसा प्रयत्न झाला याचाही कयास करता येईल. याबरोबरच कोणकोणत्या भागांत विहिरींना देणगी, तगाई काय प्रमाणांत देण्यांत आली, पेंडीचें वाटप कसें करण्यांत आलें यांचे जिल्हावार आकडे उपलब्ध असते तर नक्की अंदाज बांधतां आला असता परंतु हे आकडे उपलब्ध नाहींत. सर्वसाधारण उत्पादनावरूनच अनुमान काढावयाचें झाल्यास कर्नाटकाकडे जास्त लक्ष होतें असें म्हणावयास पाहिजे. गुजराथमध्यें खाद्यधान्याचे उत्पादनासाठी अवश्य तेवढें कपाशीचें पीक कमी करण्यांत आलें नाहीं असेंही म्हणावें लागेल व शक्यता असतांना धान्योत्पादन न करतां द्रव्योत्पादक पिकें केलीं असेंही म्हणावें लागेल. योग्य नियोजन करण्याची काळजी

केली नाहीं एवढें ह्यावरून खात्रीनें ठरेल व खाद्यधान्याचा प्रश्न सोडवितांना पुढें एवढे निर्विवाद सुचवितां येईल.

### परिस्थिति सुधारण्याचे उपाय

वरील प्रमाणें खाद्यधान्याबाबतची परिस्थिति आहे व ती निदान पुढें तरी टळावी असा प्रयत्न करणें आवश्यक आहे. याबाबत दुमत होण्याचा संभव नाहीं. असे प्रयत्न कोणते करतां येतील त्याचा विचार करूं.

कोणत्याही पिकांचें उत्पादन वाढविण्याचे ठराविक उपाय म्हणजे शेताची प्राथमिक मशागत करणें, पिकांचें बेणें चांगलें निरोगी व पूर्णपणें उगवणारें असें वापरणें, त्या पिकाचे वाढीस आवश्यक असें खत पुरविणें, वेळचे वेळीं आवश्यक पाणी देणें, रोगापासून संरक्षण करणें, पिकांत अन्य प्रकारचीं गवतें वगैरे वाढूं न देणें, व पिकास आवश्यक तेवढा हवेचा पुरवठा करणें हे होत. यांतील चांगलें बीं वापरणें, रोगापासून संरक्षण करणें, अन्य प्रकारचीं गवतें वाढूं न देणें, हवेचा पुरवठा करणें, शेताची प्राथमिक मशागत करणें, वगैरे शेतकऱ्यांचे कष्टावर अवलंबून असणारीं कामें शेतकरी करूं शकतो व आणीबाणीचे वेळीं सुशिक्षित नागरिक जरी स्वार्थीपणानें वागला तरी शेतकरी आणीबाणीचे व अडचणीचे वेळीं खात्रीनें प्रामाणिकपणें पिकाची व शेताची त्याच्या शक्तीच्या मर्यादेंत असलेलीं सर्व कामें करतो. त्याच्या मर्यादेंत नसणाऱ्यां गोष्टी म्हणजे सध्यां तरी दोन आहेत व त्या म्हणजे खताचा व पाण्याचा पुरवठा या होत. यांतच सध्यांच्या दुष्काळी वातावरणांत चांगल्या बियांचा तुटवडा याचीही भर पडली आहे. भांडवलाची शेतकऱ्यांस नेहमींच अडचण असते म्हणून त्याचा प्रारंभीं उल्लेख नाहीं. सरकारास जास्त धान्य उत्पादन करण्यासाठी उत्पादन करणाराजवळ असणाऱ्या उणीवा भरून काढल्या पाहिजेत व त्या काढल्या तरच उत्पादन वाढेल. सरकारनें ही तजवीज केली म्हणजेच उत्पादन करणारानें श्रम केले तर त्यापासून फलनिष्पत्ति होईल व सरकारचें इच्छित कार्य पार पडेल. सध्यांचें सरकार जरी सदिच्छेनें प्रेरित असलें तरी सुद्धां नोकरवर्ग जुन्याच वळणांतला आहे. सध्यांचा खाद्यधान्याचा प्रश्न सोडविण्याचा विचार करतांना या सर्वांचा विचार करावा लागेल. हा प्रश्न समाधानकारकपणें सोडविण्यास वरील सर्व बाबी सहाय्यभूत झाल्या पाहिजेत. या गोष्टी सहाय्यभूत झाल्यास खाद्यपदार्थांच्या तुटीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटणार आहे.

वरील सर्व गोष्टींची साधकबाधक चर्चा करावयाची म्हणजे एक ग्रंथच होण्याजोगा आहे. या सर्वांचा विचार न करतां फक्त सरकारी मदत, अधिकारी वर्ग, बीं-बियाणें, खतें व पाणी यांचाच विचार या लेखांत करावयाचें योजलें आहे.

शेतकी करणाराजवळ पैसा कमी व यामुळे त्यास वारंवार पैशाची जरूर लागते ही गोष्ट नव्यानें सांगावयाचें कारण नाहीं. यासाठीच तगाई नांवाची कर्जें पूर्वींच्या व हल्लींच्या आमदानींत दिलीं जात आहेत. हीं कर्जें देण्याचा उद्देश शेतकऱ्यांना मदत व्हावी असा असतो परंतु अर्ज, विनंत्या, ज्या खात्यामार्फत हीं कर्जें मिळावयाचीं त्या खात्यांतील अधिकाऱ्यांची निष्क्रियता व प्रथमतः कर्ज कोणत्या सबबीवर नाकारतां येईल याची चौकशी करण्याची प्रवृत्ती ही आड येतात. त्यांतून चुकून एकादा शिल्लक राहिल्यास त्याच्या प्रश्नाचा विचार होतो व त्यासही इतका वेळ लागतो कीं, शेवटीं ज्या कामासाठी त्यानें पैसा मागितला तें काम होऊन गेल्यावर तो हातीं येतो. या प्रकारचीं अनेक उदाहरणें देतां येतील. सध्यां सरकारमार्फत कांहीं ठराविक खाद्यपिकें करण्याबाबत देणगी देण्यांत येते. या देणगीचीही हीच तऱ्हा. सन १९४६ च्या




ही दिपवाळी आमचे कंपनीचे विमेदार, भागिदार, एजंट व हितचिंतक यांना आनंदाची व सुखावह जावो.

**इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें**

या कंपनीची विमा पॉलिसी व एजन्सी नेहमींच किफायतशीर असते. या दिपवाळीचे सुमुहूर्तावर भरपूर कमिशन व सढळ अटीवर एजन्सी स्वीकारून कामास प्रारंभ करून अर्थोत्पादनास सुरुवात करा.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

स्पेशल एजन्ट
एन. आर. वझे अगर अ. ना. गाडगीळ
२२७ कसबा, पुणें २ सेक्रेटरी

★ दिपवाळीकरतां ★
**सकस ताजा चक्का**
**सुगंधी तेलें, उटणी**
आमचेकडेच घ्या.
म. गो. कुलकर्णी,
फडनवे चौक, ७८६ सदाशिव पेठ, पुणें.

**'देवल' भांडीं**
दिवाळीच्या आनंदांत भर घालण्यासाठीं
'देवल' भांडीं खरेदी करा.
पुणें येथें मिळण्याचा पत्ता:—
'देवल' भांड्याचें दुकान,
गोसले हॉलजवळ, लक्ष्मी रोड, पुणें.

उन्हाळ्यांत केलेल्या ज्वारीच्या पिकाबाबत सरकारी देणगी म्हणून मिळावयाची सुमारें १५० रुपयांची देणगी अद्यापपर्यंत मिळावयाची आहे. याच प्रकारें विहिरीबाबतच्या पैशाची व्यवस्था आहे. अशा रीतीनें चांगल्या योजना सरकारनें करून शेतकऱ्यांना त्याचा मुळींच उपयोग होत नाहीं.

वरील प्रकारची मदत देतांना लहान शेतकरी व मोठा शेतकरी असाही भेद कधी कधी होतो. लहान शेतकऱ्यांना मदत करावी असा सरकारी दंडक असल्याचें सांगण्यांत येतें. याचवेळीं मदतीची परतफेड करण्याइतकी पात्रताही मदत घेणाराचे अंगांत असावयास पाहिजे असेंही सांगण्यांत येतें. गरिबी व पात्रता या दोनही गोष्टी क्वचितच एकत्र असतात व ही मदत दिली जाण्याची वेळ फारच क्वचित निर्माण होते. साहजिकच उत्पादन होत नाहीं. जास्त उत्पादन पाहिजे असल्यास उत्पादनास आवश्यक असणारे गुण ज्यास मदत द्यावयाची त्याचे जवळ असावयास पाहिजेत. उदाहरणार्थ, धान्य उत्पादन करण्याची धमक व साधनें त्याच्या जवळ पाहिजेत व तो या कामांत मदत करण्यास तयार असला पाहिजे. इतके गुण असल्यावर उत्पादन होऊं शकेल व अशा ठिकाणीं मदत केल्यास सरकारास नक्की धान्य मिळेल. याबाबत ज्याचे जवळ साधनें असून अन्नधान्यें निर्माण करण्याची पात्रता आहे व तशी इच्छा आहे अशांना मदत पाहिजे असल्यास व ती केल्यास जास्तींत जास्त धान्योत्पादन होईल असें वाटतें.

दुसरा प्रश्न म्हणजे बीं-बियाणयाचा होय. चांगल्या प्रकारचें बीं सरकारनें बहुतेक धान्य घेतल्यानें व काढणीचे वेळींच बीं काढून ठेवण्याची प्रथा न ठेवल्यानें बियाचा तुटवडा पडतो. यासाठीं बियाचा साठा सरकारनें करून ठेवणें व तो वेळच्या वेळीं शेतकऱ्यांना देणें आवश्यक आहे. सध्या बीं देण्याची योजना आहे. परंतु बियाचा पुरवठा मात्र त्या त्या ठिकाणीं होत नाहीं. तो अगाऊ योजना करून आणवून ठेवणें आवश्यक आहे. शेतकऱ्यांना बीं-बियाणें देण्याची व्यवस्था असून पुरवठ्याची व्यवस्था नाहीं. यासाठीं लागणारे बीं-बियाणें पुरविण्याइतकीं सरकारी प्रयोगक्षेत्रें वाढवावीत व तेथें आवश्यक तेवढें चांगलें धान्य पिकवावें व योग्य प्रकारें व्यवस्था ठेऊन त्या त्या भागास लागणारे बीं घरावे व पेरणीच्या हंगामाचे आधी पुरवठा करावा अशी याबाबत योजना करतां येण्याजोगी आहे.

खताच्या पुरवठ्याबाबत मात्र बरीच अडचण आहे व यांत काळा बाजारही होत आहे. याचा अर्थ वरील प्रकारांत होत नाहीं असें नाहीं. या बाबतचा काळा बाजार मात्र उल्लेखनीय आहे. खताचा पुरवठा पीक पाहून करणें अगत्याचें आहे व यानेंच पिकें वाढणार आहेत. मुळांतच खतांचा तुटवडा आहे. त्यांतच जनावरांची संख्या कमी झाल्यानें शेणखताचाही तुटवडा आहे. अशा स्थितींत असलेली पेंड कितीही वाटली तरी कमीच पडणार आहे. या वर्षांत अमोनियम सल्फेटच्या वाटणीबाबत असेंच झालें. भाताच्या पिकास कोकणांत या खताची अत्यंत आवश्यकता, परंतु वाटणीचे वेळीं कोकणचे वाट्यास हें फारसें आलेंच नाहीं. पिकांचे उत्पादनाचे आकडे अन्यत्र आहेत, त्यावरूनही हेंच दिसून येईल. उत्पादनाची साधनें उपलब्ध झाल्याखेरीज द्रव्योत्पादक पिकें अथवा खाद्यधान्याचीं पिकें निर्माण होऊन या दिवसांत तरी तुटवडा भरून काढून शिल्लक टाकण्याइतकें धान्य निर्माण होणार नाहीं.

### पाणी पुरवठा

आतां शेवटीं पाण्याच्या प्रश्नाकडे वळूं. या प्रश्नाचा जरी योग्य पद्धतीनें निकाल लागून अवश्य त्या ठिकाणीं व पद्धतीनें पुरवठा झाला तरी सुद्धां सध्यां भासत असलेली तूट भरून निघेल.

खाद्यपदार्थांच्या उत्पादनाच्या दृष्टीनें पाणी पुरवठ्याचा विचार करतांना त्या पिकाची कालमर्यादा पहावी लागेल. महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक अगर कोकण, कोणताही भाग घेतला तरी खाद्यपदार्थ पिकविण्याचे मुख्य हंगाम दोन. एक खरीपाचा व दुसरा रब्बीचा. हे दोनही हंगाम फेब्रुआरीचे आसपास संपतात. अर्थातच खाद्यपदार्थांचा विचार करतांना फेब्रुआरी अखेरच्या पाणीपुरवठ्याचा प्रामुख्यानें विचार करावयास पाहिजे. नद्या व तळी यांचा विचार करता कायम पाण्याच्या पिकांचीच व्यवस्था त्या पाण्यावर केलेली असते व कायम पिकें पिकून उरेल ती जागा खाद्यपदार्थास उपयोगी पडते. या दृष्टीनें विचार करतां लहान लहान बंधारे व विहिरी याच खाद्यपदार्थ पिकविण्याचे कामीं मुख्यतः उपयोगी पडणाऱ्या आहेत व यावरच सरकारनें ताबडतोबीनें भर द्यावयास पाहिजे.

विहिरींची संख्या सध्या सुमारें ३ लक्ष, १० हजार आहे व त्यांवर सुमारें ६ लक्ष एकर जमीन भिजत आहे. या विहिरी गुजरात ४२,००० महाराष्ट्र १,९०,००० कर्नाटक ३६,००० व कोकण ४२,००० त्याप्रमाणें विभागल्या आहेत. या विहिरिंवर सरासरीनें प्रत्येकी २ एकर जमीन भिजत आहे. या दोन एकरांत खाद्यपदार्थच नक्की पिकविले जात आहेत असें मात्र नाहीं. या विहिरी जर पुऱ्या पडत नसतील तर आणखी विहिरी खणून सुमारें ६ ते ७ लक्ष टनाची पडणारी तूट भरून काढण्याजोगी आहे. पाणी दिलेले रब्बीचे हंगामांतील पिकास सुमारें १ टनपर्यंत धान्य निघतें व हें पाणी फेब्रुआरी पर्यंतच लागतें. एकंदर जमीन पाहतां चांगलें खत व पाणी दिल्यास एवढें पीक काढणें अशक्य होईल असें वाटत नाहीं.

विहिरींची वाढ महाराष्ट्रांत तरी फार मोठ्या प्रमाणावर होणें शक्य आहे. सह्याद्रीवर पडणारा पाऊस व सह्याद्रींत मुरणारा पाऊस यांचा विचार करतां आणखी २ लक्ष विहिरी सहज खणतां येणार आहेत. महाराष्ट्राचा विचार करतां महाराष्ट्राचे पश्चिम बाजूस सह्याद्रीवर सुमारें १०० ते १२५ इंच पाऊस साधारणपणें पडतो. हा भाग सुमारें ४०० मैल लांब व २५ मैल रुंद आहे. त्यानंतरच्या २५ मैलांच्या भागांत सुमारें ५० इंच पाऊस पडतो, त्यानंतरच्या २५ मैल भागांत सुमारें ३० इंच पाऊस पडतो व त्यापुढील भागांत सरासरीनें १५ इंचच पाऊस पडतो असें मानण्यास हरकत नाहीं. या प्रत्येक पट्ट्यांत पडणाऱ्या पावसाचे टनामध्यें अथवा ग्यालनमध्यें रूपांतर केल्यास फारच मोठी संख्या होईल. १ टन पाणी म्हणजे २२४ ग्यालन होत. ४०० मैल × २५=१०,००० चौ. मैल. १ इंच पाऊस १ एकरावर पडल्यास त्याचें वजन अदमासे १०० टन होतें. १ मैलावर पडल्यास ६४,००० टन होतें. १०,००० चौ. मैलावर १ इंच पाणी पडल्यास त्याचे वजन ६४ कोटि टन होईल. याप्रमाणें १२५ इंच पावसाचे ८,००० कोटी टन होईल. याच प्रमाणांत इतर भागांत पडलेल्या पाण्याचा विचार केल्यास पुढील भागांत ३,२०० कोटि टन, त्यानंतरच्या भागांत आणखी २,००० कोटि टन याप्रमाणें पाऊस पडतो. म्हणजे सर्वसाधारणपणें १३,००० कोटि टन पाणी पावसाचे रूपानें सह्याद्रीच्या पूर्वेस महाराष्ट्रांत पडतें. यांतील सुमारें ४ इंचपर्यंत पाणी किमान आंत मुरत असावे असा अंदाज आहे. श्री. कानिटकर यांच्या “ड्राय फार्मिंग इन इंडिया” ह्या पुस्तकांत मुरमाड भागांत तीस टक्केपर्यंत पाणी मुरतें असा उल्लेख आहे. त्यांत वाहून जाणारें पाणी वगळलें आहे. तें जमेस धरलें तरी ४ इंचपर्यंत पाणी

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. ४८३ तारेचा पत्ता "Cencobank" पोस्टबॉक्स नं. ११

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



—महाराष्ट्रांतील नवीन साखर कारखाना—

## दी डेक्कन ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लिमिटेड, पुणें

मुख्य कचेरी : ३६१ बुधवार चौक, पुणें. ★ फॅक्टरी व इस्टेटस : चाकोरा, पो. माळशिरस (सोलापूर)

संचालक मंडळाचे अध्यक्ष :

मि. व्ही. वाय. कोल्हटकर, एम्. कॉम्. (मुंबई), एम्.एस्सी. (अर्थशास्त्र) लंडन, बडोदें सरकारचे आर्थिक सल्लागार, प्रतापसिंह कॉलेज ऑफ कॉमर्स, बडोदें.

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल :
रु. १०,००,००० (दहा लाख)
खपलेलें भांडवल : रु. ५,१२,००० च्यावर.
कंपनीची एकूण मालमत्ता : रु. ११,००,००० च्यावर.

शेअर-विक्री जोरांत चालू असून लवकरच मिळणाऱ्या नफ्याचे, भागीदार व्हा. अधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा :

मेसर्स चितळे मुतालिक ॲन्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.



दि

## ब्रिटिश इंडिया

जनरल इन्शुअरन्स कंपनी लि.

(स्थापना १९१९)

आग, मरीन, अपघात इत्यादि सर्व प्रकारचे विमे स्वीकारतो.

आयुष्याचे विमे लवकरच स्वीकारले जातील.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे.पी.

: पुणें शाखा : मोती माणिक मॅन्शन, लक्ष्मी रोड.

: हेड ऑफिस : मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.



## दि स्टेट बँक ऑफ कुरुंदवाड ज्यूनिअर, लिमिटेड.

हेड ऑफीस : माधवपूर-वडगांव (बेळगांवजवळ)

स्थापना : १९३४

अधिकृत भांडवल : रु. १,००,०००
खपलेलें भांडवल : रु. ५५,०७०
खेळतें भांडवल : रु. ९,००,०००

बँक चालू, सेव्हिंग व मुदतीच्या ठेवी स्वीकारते. चालू खात्यावर ½ टक्का व्याज. सेव्हिंगवर १॥ टक्का व्याज. मुदतीच्या ठेवींचे दर : एक वर्ष २ टक्के; ३ वर्षें २॥; व पांच वर्षें ३ टक्के.

कॅशक्रेडिट, सोनें चांदी गहाण, माल गहाण, स्थावरावर लांब मुदतीचीं हप्त्यानें कर्जें देणें, चेक-हुंडीचा व्यवहार, वगैरे बँकिंग व्यवहार केला जातो.

शाखाः—मैंदर्गी व दुधनी (सोलापूरजवळ)

ग. द. साठे, बी. ए.
मॅनेजर.

मुरण्यास हरकत नाहीं. म्हणजे, एकूण सुमारें ७५० कोटि टन पाणी संबध महाराष्ट्राचे भूगर्भांत आहे असा कयास यावरून निघतो. एका विहिरीवर २ एकर याप्रमाणें क्षेत्र भिजत आहे. त्याचा विचार केल्यास, पावसाळा वजा केल्यास, जास्तींत जास्त ३० वेळां पाणी शेतकरी शेतास देतो व पाणी साधरणपणें २ इंच भरतो या मानानें विचार करतां एका एकरास एकवेळेस २०० टन पाणी लागतें. त्या मानानें ३० वेळेस ६,००० टन पाणी लागेल, दोन एकारास १२,००० टन पाणी लागेल व तेवढे एक विहिरीतून १ वर्षांत निघत आहे. दोन लक्ष विहिरींतून सध्या २४० कोटि टन पाणी निघत आहे व आणखी ५०० टन तरी पाणी जमीनीत आहे. एवढे महाराष्ट्रांत निघणें शक्य आहे, त्यामानानें आणखी चार लक्ष विहिरी तात्विक दृष्ट्या खणणें शक्य आहे. त्यांवर एका विहिरीस २ एकर प्रमाणें ८ लक्ष एकर जमीन भिजविणें शक्य आहे. विहिरी खणावयास वेळ लागेल व त्याचप्रमाणें एवढा खर्च करावयाचा तर त्यास अनुषंगिक असें संशोधन करणेंहि अगत्याचें आहे.

## तावडतोब उत्पादन वाढवणारा उपाय

तावडतोबीचा, तात्कालिक व या हंगामांतही उपयोगी पडणारा व कायमही उपयोगी पडणारा असा उपाय म्हणजे नद्यांच्या पाण्यावर मळी व आसपासच्या जमिनींतून पिकें काढणें हा होय. हा उपाय याच हंगामांत उपयोगी पडणारा आहे. मुंबई प्रांतांतील मळी जमिनींचा विचार करतांना नद्या व खोरीं यांचा विचार करावा लागेल. मुंबई प्रांतांतील महत्त्वाचीं नद्यांचीं खोरीं पुढील-प्रमाणें आहेत. साबरमती, माही, नर्मदा हीं खोरीं पूर्णपणें गुजराथ-मध्यें आहेत. तापी नदीचें खोरें खानदेश व गुजराथमधील. सुरत भागांत आहे. गोदावरी, भीमा व कृष्णा हीं खोरीं महाराष्ट्र व कर्नाटक मिळून आहेत. या प्रत्येक खोऱ्यांत पडणारें पाणी त्या त्या नदींतून वहात जातें. साबरमती नदीचें खोरें ४,८०० चौ. मैल, माहीचें ४,२०० चौ. मैल, नर्मदेचें खोरें सुमारें ४८,००० चौ. मैल आहे. परंतु त्यांतील अवघे ५,००० चौ. मैल गुजराथेंत आहे. परंतु याच ५,००० चौ. मैलांत नदी सपाटीवरून वहात असल्यानें त्याचा जास्तीत जास्त फायदा गुजराथेंत मिळत आहे. तापी नदीचें खोरें २०,००० चौ मैल आहे. या नदीस गीर्णा नदी मिळाली आहे. या खोऱ्यांत दोनही खानदेश, सुरतचा दक्षिण भाग व नाशिक जिल्ह्यापैकीं ६-७ तालुके यांचा समावेश होतो. त्यांत गीर्णा व तापी यामधील भाग चांगला व सुपीक आहे. गोदावरी नदीचें खोरें नाशिक व नगर या जिल्ह्यांतून आहे. या नदीसच प्रवरा नदी मिळते. या भागांत गोदावरी व प्रवरा या दोनही नद्यांस कालवे आहेत. या खोऱ्यांचें क्षेत्र ५,६०० चौ. मैल आहे. या नंतरचें व महाराष्ट्रांतील सर्वांत मोठें खोरें म्हणजे भीमा नदीचें आहे. हें खोरें एकंदर २४,००० चौ. मैलांचें आहे. यांतून वाहणाऱ्या नद्यांची एकंदर लांबी सुमारें १,३०० मैल आहे. या खोऱ्यांत मोठाल्या नद्या पुढील प्रमाणें आहेत. घोड, कुकडी, भीमा, मुळामुठा, नीरा, माण व सिना. यांतील सिना व माण या नद्या सोडल्यास बाकीच्या सह्याद्रीच्या मूळ रांगेपासून निघाल्या आहेत. हें सांगण्याचें मुख्य कारण म्हणजे या भागांत १०० ते १२५ इंच पाऊस आहे. याचेंच द्योतक म्हणून या भागांत मुळशी, खडकवासले, भाटघर आदिकरून मोठीं व इतर अनेक लहान लहान धरणें आहेत. नीरा नदीच्यासारखे दूरवर पसरणारे कालवे आहेत. याचा अर्थ असा आहे कीं, या नदीच्या खोऱ्यांत पाणी नेण्यासाठीं लागणारी सपाटी आहे व अशा रीतीनें हें खोरें सर्वांत मोठें आहे. कृष्णा खोऱ्याचा विस्तार २१,००० चौ. मैलांवर आहे. परंतु महाराष्ट्रभर ही नदी फार मोठ्या वेगानें वहात आहे. या नदीच्या उगमापाशीं सुमारें २५० इंचापर्यंत पाऊस आहे परंतु आवश्यक ती सपाटी नाहीं. या खोऱ्यांत सातारा, विजापूर, धारवाड, बेळगांव हे जिल्हे येतात. भीमेच्या खोऱ्यांत पुणें व सोलापूर हें प्रामुख्यानें येतात व यालगतचे नगर, विजापूर, सातारा हे जिल्हे येतात.

## भीमा नदीवर बंधारे घाला

सर्व खोऱ्यांचा विचार करतां भीमा नदीचें खोरें हें तावडतोब प्रयत्नांस लागण्यास सोपें आहे व २० ते २५ फुटांपर्यंत बांध या नदीस घालता येण्याजोगे आहेत. या नदीचे पात्रास उतार बेताचा आहे व पाण्याचा पुरवठा भरपूर आहे. त्याचप्रमाणें नीरा वगैरे नद्यांचे पात्रांतूनही बारमाही वाहणारें पाणी आहे. भीमा नदीचा उगम सुमारें १२५ इंच पाऊस असलेल्या भागांत व सुमारें ४,३०० फूट उंचीवर होतो. तेथून सुमारें ४० मैलांत ही नदी २,००० फूट उंचीपर्यंत म्हणजे १,५०० फूट खाली येते. तेथून पुढें २५० मैलांत मात्र या नदीस उतार फारच कमी आहे. तो म्हणजे अवघा ६०० फुटांचा आहे. व या ६०० फुटांत नदी मात्र २५० मैल जाते. हा उतार मैलास दोन-अडीच फूट याप्रमाणें सरासरीनें पडतो. दर पांच मैलास २० ते २५ फूट उंचीचे पक्के बांध या नदीस घातल्यास सुमारें तीस बंधारे घालावे लागतील व प्रत्येक बंधाऱ्यावर प्रत्येक काठावर कमींत कमी १,२०० ते १,५०० एकर जमीन भिजवता येईल. राजेगांव येथील शेतावर सध्या याप्रमाणें बंधारा नसताही भीमा नदीचें पाणी देण्यांत येत आहे. सध्याच्या त्या शेतावर असलेल्या पाणी काढण्याच्या साधनांनीं फक्त ३५० एकरच जमीन भिजणें शक्य आहे. हें साधन वाढविल्यास खात्रीनेंच १,२०० ते १,५०० एकर जमीन भिजविता येईल. याचप्रमाणें समोरचे काठावरचीहि जमीन भिजविता येईल. भीमा नदीच्या पात्राचा व भोवतालच्या सपाट प्रदेशाचा विचार करता नदीचे पात्रांतून सुमारे १०० फूट पाणी वर उचलल्यास दोन्ही बाजूची १ मैल म्हणजे ६४० एकर जमीन भिजली जाईल. याप्रमाणे दर मैल पात्रास १,२८० एकर जमीन वर सुचविल्याप्रमाणें बंधारे घातल्यास फेब्रुआरीपर्यंत भिजविता येतील. जर वर सुचविलेली ३० बंधाऱ्यांची संपूर्ण योजना अमलांत आणली तर सुमारें तीन लक्ष एकर जमीन पाण्याखाली येईल व निदान दीड लक्ष टन तरी जादा धान्य निर्माण होईल व सध्याच्या २॥ शेराच्या प्रमाणानें ( ८ माणसास १ टन धान्य ) बारा लक्ष लोकांना वर्षभर धान्य पुरेल. धान्योत्पादनाचा व भीमेचें पाणी इंजिन पंपानें भरण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊनच वरील सूचना केली आहे. सरकारनें या योजनेमध्यें तावडतोबीचा उपाय म्हणून अवश्य लक्ष घालावें व महाराष्ट्रांतील अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यास मदत करावी.

वर सुचविल्याप्रमाणें ३० धरणें व त्यावर १०० फूटपर्यंत पाणी उचलणारे पंप बसविल्यास व नळ वगैरे टाकल्यास एकूण सुमारे सहा लक्ष एकर जमिनीस पाणी पोहोचूं शकेल व धान्याचें दुर्भिक्ष कमी होईल.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४, व बुधवार चौक, पुणें

## मांडवल उभारणीवर नियंत्रण


### औद्योगिक व बिगर-औद्योगिक कंपन्यांची मांवडल उभारणी

फाजील चलन-विस्तारास आळा घालण्याच्या उद्देशानें भांडवल उभारणीवर हिंदुस्थान सरकारनें प्रथम १७ मे, १९४३ रोजीं निर्बंध घातले परंतु कारखाने, शेती इत्यादींत भांडवल योग्य प्रमाणांत गुंतविलें जावें ह्या दृष्टीनें हें नियंत्रण पुढें टिकविण्यांत आलें. नियंत्रण प्रथमतः बसविलें तें डिफेन्स ऑफ इंडियाच्या ९४ अ नियमाखालीं बसविण्यांत आलें. तें पुढें १९४६ च्या २९ व्या ऑर्डिनन्सनें चालू ठेवलें गेलें. त्याचेंच रूपांतर करणारें एक बिल असेंब्लींत मार्च, १९४७ मध्यें मांडण्यांत आलें, त्यास कायदेशीर स्वरूप येईपर्यंतच्या काळासाठी २५ मार्च, १९४७ रोजीं एक ऑर्डिनन्स काढण्यांत आला. इकडे, बिलाचें १९ एप्रिल १९४७ रोजीं बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें. १ आक्टोबर १९४७ ते ३१ मार्च अखेरच्या मुदतीमधील भांडवल नियंत्रणाचा तपशील खालीं दिला आहे.

वरील १८ महिन्यांच्या मुदतींत ४८४ कोटी रुपयांच्या भांडवल उभारणीसाठी १,६१४ अर्ज सरकारकडे गेले. त्यांपैकीं, १३७ कोटी रुपयांचे १,४६८ अर्ज ब्रिटिश हिंदुस्थानांतील होते व ४७ कोटी रुपयांचे १४६ अर्ज संस्थानांतील होते. एकूण १,१८५ कंपन्यांना ३८० कोटी रुपयांच्या भांडवल उभारणीची परवानगी मिळाली. त्यांतील ६०% कंपन्या व ५९% भांडवल कारखान्यांसाठी होतें.

युद्धकाळांतील २८½ महिने भांडवल नियंत्रण चालू होतें. ह्या मुदतींत २६१ कोटी रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी देण्यांत आली. परंतु, युद्धोत्तरच्या १८ महिन्यांत ३८० कोटी रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी दिली गेली. त्यावरून, युद्धोत्तर काळांतील भांडवल उभारणीमधील वाढीची कल्पना येईल.

**निर्वासितांच्या कर्जरोख्यांवरील व्याज**—पश्चिम पंजाब, सिंध, सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान येथील सरकारी खजिन्यांकडून जें सरकारी कर्जरोख्यांवरील व्याज मिळावयाचें असतें तें व्याज हिंदी संघराज्यांतील कोणत्याही सरकारी खजिन्याकडून अगर पब्लिक डेट ऑफिसकडून मिळण्याची सोय हिंदी सरकारनें केली आहे. ही सवलत जें व्याज आज रुजू झालें आहे किंवा जानेवारी १९४८ पर्यंत रुजू होईल तेवढ्यापुरतीच आज तरी देण्यांत आली आहे.





आजच्या गंभीर परिस्थितींत विमा उतरविणें अत्यंत आवश्यक आहे. कुटुंबवत्सल लोकांचें तर तें आद्य कर्तव्य आहे.

विश्वभारती विमा कंपनी आपणांस वरील सर्व काळजींतून मुक्त करील अशी आम्ही आपणांस ग्वाही देतों.

**⁂ आग ⁂ आयुर्विमा ⁂ मोटर अपघात**
**⁂ मरिन ⁂ वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ⁂**

| चेअरमन व मॅनेजिंग डिरेक्टर | मॅनेजिंग डिरेक्टर |
| --- | --- |
| श्री. रामराव गणपतराव विजयकर | श्री. चंद्रशंकर गि. द्विवेदी |

बाहेरगांवीं त्याचप्रमाणें मुंबईमध्यें एजन्सीसाठीं लिहा

# विश्वभारती

**इन्शुअरन्स कंपनी लि०**

नोवल चेंबर्स, पारसी बझार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

ब्रँचीस् व ऑर्गेनायझिंग ऑफिसीस्:—अहमदाबाद, सुरत, नागपूर, पुणें, मद्रास, गुंतुर, कलकत्ता, मंगलोर, कराची, बडोदें, भडोच, भावनगर.

पुणें शाखा—४१ शुक्रवार, पुणें शहर.



# दि बँक ऑफ कराड, लि.

कराड ( जि. सातारा )

( स्थापना : १२-३-१९४६ )

**पहिल्या नऊ महिन्यांतील प्रगति**

| | |
| --- | --- |
| अधिकृत भांडवल .... | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल ... | २,५०,००० रु. |
| वसूल केलेलें भांडवल.... | १,२५,००० रु. |
| ठेवी .... | १०,८०,००० रु. |
| एकूण खेळतें भांडवल.... | १२,२२,००० रु. |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

म. वि. खंडकर
मॅनेजर

# कंपनी कायद्यांतील एक शंका स्थान

## डायरेक्टरांना कंपनी-नफ्याचा जादा वांटा ?

लेखक:—श्री. स. वा. दातार, बी. एस्‌सी., एलएल्‌. बी., पुणें.

कंपनीच्या डायरेक्टरांना जी फी मिळते तिजबरोबर किंवा त्या फी पैकीं कांहीं भाग म्हणून कंपनीच्या नफ्यांतील कांहीं टक्के डायरेक्टरांना वाटून देणें कायद्यास धरून होईल काय ? कंपनी कायद्याच्या मुख्य कलम विभागांत डायरेक्टरांना कोणत्याहि प्रकारचा पगार अथवा अन्य लाभ मिळविण्याचा मार्ग नमूद केलेला नाहीं.

नोंदलेल्या कंपन्यांची अंतिम मालकी त्यांच्या भागदारांची असते. कंपनीचे नित्याचे कारभारावर भागदार वर्गाचे हिताचे दृष्टीनें नियंत्रण ठेवण्यासाठीं सदर भागदारांनीं आपल्या पैकींच कांहीं लोकांना विशेष अधिकार व कामगिरी दिलेली असते. डायरेक्टरांना कंपनीचा व्यवहार पाहण्यासाठीं जो कालव्यय करावा लागतो, त्याची फेड म्हणून कांहीं रक्कम दिली जाते.

डायरेक्टरांना कंपनीच्या नफ्यापैकीं कांहीं टक्के नफा वाटून द्यावयाचें ठरवलें, तर कोणी सभेला उपस्थित राहो अथवा न राहो, डायरेक्टर झाल्याबद्दलच त्याला वरील नफ्याचा भाग मिळूं लागेल. अशा स्वरूपानें डायरेक्टर पद हें नफ्याचें स्थान ( ऑफिस ऑफ प्रॉफिट ) होतें कीं काय ? हा मोठा प्रश्न आहे. एकादाच भाग धारण करणारा भागदार आणि बरेचसे भाग धारण करणारा भागदार यांना प्रत्येक भागापाठीमागें सुटणाऱ्या नफ्यामध्यें त्यामुळें विन हिशेबी तफावत पडते; व कंपनीच्या मालकी हक्काच्या अंशभागांतही वैषम्य उत्पन्न होतें. ही गोष्ट कंपनी कायद्याच्या तात्त्विक भूमिकेशीं विसंगत वाटते.

डायरेक्टरांची भूमिका ट्रस्टींच्या भूमिकेसारखी समजली जाते. कंपनीच्या अनेक भागदारांना सर्वांनाच कांहीं कंपनीच्या कारभारावर देखरेख ठेवणें शक्य नसतें व त्या सर्वांकडे देखरेखीचे अधिकार ठेवणें व्यवहार्य व इष्ट नसतें. यासाठीं एकंदर भागदार संघाच्या वतीनें डायरेक्टर हे आपल्या नियंत्रणाखालीं व मार्गदर्शनाखालीं कंपनीचा कारभार चालू ठेवण्याचें कार्य करतात. ह्याकामीं एकप्रकारें ते प्रत्येक भागदाराचे मुखत्यार व विश्वस्त असतात. म्हणून डायरेक्टरांचे हितसंबंध सामान्य भागदारांच्या हितसंबंधांशीं अविरोधी असणें तत्त्वत: आवश्यक असल्यामुळें, डायरेक्टरांना कंपनीच्या नफ्यांत यथान्याय डिव्हिडंड व्यतिरिक्त अन्य वांटा मिळणें आजपर्यंत फारसें कोणी संमत मानलेलें नाहीं.

### दुसऱ्या बाजूची विचारसरणी

डायरेक्टरांना कंपनीच्या नफ्यांत कांहीं अंशभाग ठेवल्यास कंपनीचे कारभारांत अधिक लक्ष घालून कंपनीस जास्तीत जास्त नफा मिळवून देण्यास ते अहर्निश झटूं लागतील अशी कल्पना आतां पुढें येऊं लागली आहे. वास्तविक डायरेक्टर पदासाठीं कांहीं किमान रकमेचे भाग घेणें आवश्यक ठरविलें असतें तें ह्यासाठीच. शिवाय मॅनेजिंग एजंट, मॅनेजर अथवा मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांना पगाराबरोबर नफ्यांतील टक्केवारी ठरवून दिलेली असतेच. तेव्हां अधिकारावरील व्यक्ति कंपनीला जास्तीत जास्त नफा मिळविण्याच्या खटपटींत असतातच. कंपनीस उगाच पोकळ नफा दाखवून भागदारांची फसवणूक करूं नये अशी काळजी घेणें सुद्धां जरूर असतें आणि ती सर्व भागदार संघातर्फें डायरेक्टर घेत असतात. अशा स्थितींत डायरेक्टरांपुढेंही नफ्यांतील अंशभागाचें आमिष असणें कित्येकांना पसंत वाटत नाहीं. परंतु कंपनीच्या नफ्याची अंतिम मालकी भागदार संघाकडेच असते. तेव्हां त्या नफ्याचा मन मानेल तसा विनियोग करण्यास भागदार संघास अधिकार नि:संशय आहे. भागदार संघाच्या संमतीनें कंपनीस आपला नफा हवा त्या रीतीनें खर्च करावयास कोठल्याच कायद्याची आडकांठी येणें कठीण आहे. आजसुद्धां कित्येक हजारांचा नफा, कंपन्या देणग्या देण्यांत खर्च करीत आहेतच ना ? मग कंपनी कारभाराच्या नियमावलींत स्पष्ट निर्देश करून कंपनी डायरेक्टरांच्या फीच्या भरीला त्यांना कंपनीच्या नफ्याचा कांहीं अंशभाग देण्यास हरकत कोणती ? कोणीहि भागदार कंपनीची नियमावली समजाऊन घेऊनच कंपनीमध्यें आपला पैसा गुंतवीत असतो, असा कायद्याचा संकेत असल्यामुळें त्या नियमावलींत ग्रथित केलेल्या शर्तींना भागदारांची संमति असतेच. अशा प्रकारच्या उघड करारास कांहीं आडकांठी असणें न्याय्य वाटत नाहीं. मग, डायरेक्टरांच्या फीमध्यें ठराविक कमाल रकमेच्या जोडीला नफ्यांतील टक्केवारी देणें ह्यांत गैर काय आहे ?

कोणताहि कायद्याचा प्रश्न उपस्थित झाल्यावर अंतिम कोर्टाच्या निर्णयाशिवाय त्याची अखेरची तड लागत नाहीं. तोंपर्यंत उलटसुलट युक्तिवाद चालूच राहतात. केवळ नियमावलींत एकादा नियम ग्रथित केला म्हणूनच कांहीं तो वज्रलेप होत नाहीं. कायद्याचे प्रश्न निर्णयासाठीं कोर्टापुढें न्यावयास या हरकती प्रतिबंध करूं शकत नाहींत. ह्या दृष्टीनें ह्या बाबतींत अंतिम कोर्टाचें योग्य तें मार्गदर्शन जितक्या लवकर होईल तितकें इष्टच ठरेल !





झगझगीत शुभ्र प्रकाश

करितां

हेलियम बॅटरीज

टॉर्च करितां वापरा

कारखानदार:—

हेलियम प्रॉडक्टस (इंडिया) लि.

५१३ शनवार, पुणें २

## बांधकामासाठी सिमेंट, का चुनखडीचा चुना ?

### तुंगभद्रेवरील धरणाबाबत मतभेद मिटविण्यासाठी पंचाची नेमणूक

मद्रास इलाखा व निजामचें राज्य यांच्या सरहद्दीवर तुंगभद्रा-नदीवर जें मोठें धरण होणार आहे त्या बाबतींत कांहीं महत्त्वाचे वादग्रस्त प्रश्न उपस्थित होऊं पहात आहेत. त्यापैकीं एक आतां उजेडांत आला आहे व तो म्हणजे बंधाऱ्याचे कामाला सिमेंट वापरावें का चुनखडीचा चुना वापरावा ? हिंदुस्थानांत जीं कांहीं लहानमोठीं पाठ बंधाऱ्यांची कामें आजपर्यंत झालीं, त्यांचेकरितां चुनखडी किंवा चुनखडी मिश्रित सुरखी वापरण्यांत आलेली आढळते. महाराष्ट्रांत तर सर्वच बांधकामें सरसकट चुन्यामध्येंच झालेलीं आहेत व त्या कामांमध्यें कोणतीही कमताकद किंवा इतर दोष नजरेस आलेला नाहीं. उदाहरणार्थ, सातारा जिल्ह्यांतील भोरचें धरण, नगर जिल्ह्यांतील भंडारधारा धरण, नाशीकमधील दारणा धरण व इतर किंचित लहान धरणें हीं सर्व चुन्यामध्येंच बांधलीं गेलीं आहेत व विशेष म्हणजे हा चुना स्थानिक खाणींतून किंवा जमीनीवरून गोळा केलेली चुनखडी भाजून केलेला आहे. त्यामध्यें कोणतेंही मिश्रण नाहीं.

मद्रास स्थापत्य शास्त्रज्ञांचें पहाणें आधुनिक प्रवृत्तीवर आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, धरणाचें काम शक्य तितक्या लवकर पुरें करावें व पिकास पाणी लवकर देण्यास सुरवात करावी. सिमेंट चुन्यापेक्षां अत्यंत थोड्या काळांत ताकद प्रकट करतें व तें कारखान्यांतून विशिष्ट व ठरावीक गुणांचें मिळूं शकतें. त्याचें उलट चुनखडीचा चुना भाजण्यास वेळ लागतो, त्याचे गुणांत फेरफार पडतो व त्यानें केलेलें बांधकाम लवकर सशक्त होत नाहीं. त्याची भाजणी, मळणी व कामांत पेरणी फार धोक्याची होऊं नये म्हणून अत्यंत कसोशीची देखरेख ठेवावी लागते. सिमेंट आयतें मिळूं शकेल पण चुना दगदग करून तयार करावा लागेल.

या उलट निजाम राज्यांतील स्थापत्य विशारदांना वाटतें कीं चुना व त्याचे गुण-अवगुण आपणांस पूर्णपणें अवगत आहेत व आजपर्यंतचीं चुन्याचीं बांधकामें भक्कम राहिलीं आहेत. चुना स्थानिक माल-मसाल्यांपासून तयार करतां येतो व त्याची उत्पत्ती व दर्जा सर्वस्वी आपल्या हातांत राहातो. सिमेंट वापरल्यानें आपण दुसऱ्याचे आहारीं जातो. जागेवर मिळणाऱ्या चुन्यांत कांहीं प्रमाणांत सुरकी म्हणजे भाजलेल्या विटांची पूड मिसळण्यांत येईल पण त्या बाबत त्यांना विशेष त्रास किंवा दगदग वाटत नाहीं.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, मद्रासला तयार मिळत असलेलें सिमेंट व त्यांत थोड्या प्रमाणांत सुरकी मिसळून केलेला चुना वापरावा असें वाटतें व निजाम हैद्राबादला चुना व त्यांत सुरकी मिळवून केलेला चुना वापरणें चांगलें असें प्रतिपादितें. सिमेंट वापरण्यानें थोडा खर्च जास्त येईल पण बांधकाम त्याप्रमाणांत शीघ्रतेनें होईल असें मद्रासचें मत दिसतें. काम पुरें होण्यास थोडाफार विलंब झाला तरी सर्व मजुरी आपल्याच राज्यांत व आपल्या प्रजाजनांना मिळेल असें हैद्राबादला वाटणें सहाजिकच आहे.

वरीलप्रमाणें मतभेद उत्पन्न होणारच, म्हणून मद्रास-हैद्राबाद यांमध्यें जो तुंगभद्रा धरणासंबंधी करारनामा झाला आहे त्यामध्यें लवादाची तरतूद केली गेली आहे व तिला धरूनच हें प्रकरण सर. एम. विश्वेश्वर अय्या यांचेकडे निकालाकरितां धाडण्यांत आलेलें आहे.


**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि

**बँक ऑफ इंडिया, लि.**

**स्थापना १९०६**

खपलेलें भांडवल :— ३,००,००,०००.
वसूल झालेलें भांडवल :— १,५०,००,०००.
राखीव फंड :— २,००,००,०००.
मुख्य कचेरी :—ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :— मुंबई:— बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीक:—वांद्रे व अंधेरी. अहमदाबाद:—भद्र (मुख्य शाखा) इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :—क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य शाखा ), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूर:—किंग्जवे व इतवारी बाजार. पुणें:—लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), हैद्राबाद ( सिंध ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :— १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :—सर कावसजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ, के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता.

चालू ठेवींचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें.

श्री श्री श्री श्री श्री

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

१८० सदाशिव पेठ, पुणें

संचालक मंडळ

१ श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
( चेअरमन ) पुणें २.
२ डॉ. वि. बा. फाटक,
एल. आर. सी. पी., एम. आर. सी. एस., लोंडन
३ दि. ब. नि. चिं. लिमये, सी. बी. ई.,
ॲडव्होकेट, सोलापूर
४ डॉ. र. ग. ठकार,
एल. एम. ॲन्ड एस., पुणें
५ श्री. अण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख,
जमिनदार व व्यापारी, पुणें २
६ श्री. म. रा. तांबे, बी. ए., एल. सी. ई.,
रि. चीफ अकौंटंट, बॉंबे कॉर्पोरेशन, दादर
७ श्री. रा. बा. भट,
पुणें ४
८ रा. ब. भा. ल. मोडक,
एम. सी. ई., एम. इन्स्ट. सी. ई.,
आय. एस. ई. ( रि. ), पुणें ४
९ श्रीमंत ग. वि. साळवेकर,
बी. ए., सरदारगृह, मुंबई २
१० डॉ. रा. ह. भडकमकर,
एम. ए., एम. डी. पुणें ४
११ श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे
बी. ए., एलएल. बी., पुणें २ ( अधिकारपरत्वें )

दर एकरीं कमीत कमी सहा टन साखर निघावी, तसेंच शुभ्र व दाणेदार साखर तयार करतां यावी याकरितां सिंडिकेटनें नवीन एक हजार टनांची सेमी इलेक्ट्रिक मशिनरी खरेदी केली आहे. स्पिरिट करण्यालाहि लवकर सुरवात होईल.

**आमच्या सर्व भागीदारांना व ठेवीदारांस ही दिपवाळी सुखाची व भरभराटीची जावो.**

सी. जी. आगाशे आणि कंपनी,
मॅनेजिंग एजंट्स.

( पॅरमाउंट लि. )

श्री श्री श्री श्री श्री

# ★ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ★

मुख्य कचेरी:- लक्ष्मीरोड, पुणें

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल:— | रु. ५०,००,००० | वसूल झालेलें भांडवल:— | रु. १६,००,००० |
| खपलेलें भांडवल:— | रु. ३२,००,००० | रिझर्व्ह व इतर फंड:— | रु. ३,९०,००० |

एकूण खेळतें भांडवल:— रु. २,००,००,०००

## -: संचालक मंडळ :-

श्री. धों. कृ. साठे, ( चेअरमन ), श्री. वा. पुं. वर्दे ( व्हा. चेअरमन ), श्री. श्री. गो. मराठे, श्री. न. ग. पवार, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते, श्री. मो. रा. ढमढेरे.

- ※ चालू खात्यावर द. सा. द. शें. अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
- ※ सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शें. १॥ टक्का व्याज मिळतें.
- ※ मुदती ठेवीची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
- ※ सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था केली आहे.

— ट्रस्टी आणि एक्झिक्यूटरचे व्यवहाराबाबत चौकशी करावी. —

बँकेच्या शाखा:—डेक्कन जिमखाना ( पुणें ), खडकी, मुंबई ( फोर्ट, गिरगांव व दादर ), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर ( पे ऑफिस ), नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण इत्यादि.

**दिपवाळी निमित्त आमच्या भागीदारांना व खातेदारांना आम्ही अभीष्ट चिंतितों.**

चिं. वि. जोग
मॅनेजर.




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.